• पुणे, शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 80 • वर्ष ४ थे, अंक ८० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



शुल्कमाफीसाठी चंद्रकांत दादा ॲक्शन मोडवर
P३

श्रीलंकेचा मोठा विजय
१२



> पंतप्रधान मोदी हे महान नेते असून, ते भारतात उत्तम कामगिरी करत आहेत. ते दीर्घकाळापासून खूप चांगले मित्र असून, व्हाईट हाऊसमध्ये त्यांची उपस्थिती हा मोठा सन्मान आहे. मोदी हे वाटाघाटी करण्यासाठी खूप कठोर असून, त्यांच्या जवळपासही कोणी नाही."
> **— डोनाल्ड ट्रम्प,** अमेरिकी राष्ट्राध्यक्ष

# शस्त्रसज्जता व्यापारवृद्धी

## मोदी-ट्रम्प भेटीत महत्त्वपूर्ण निर्णय



> रशिया-युक्रेन युद्धात भारत तटस्थ आहे, असे सगळ्यांना वाटते. तथापि, भारत हा शांततेच्या बाजूने आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनाही युद्धाचे उपाय युद्धभूमीवर शोधता येत नाहीत, असे सांगितले होते. हा युद्धाचा काळ नाही. हे युद्ध थांबावे यासाठी ट्रम्प यांनी केलेल्या प्रयत्नांना मी पाठिंबा देतो. यात ते लवकरात लवकर यशस्वी होतील.
> **-नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिका दौऱ्यावर असून, शुक्रवारी त्यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी द्विपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली असून, विविध क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावरही भर देण्यात आला. बैठकीदरम्यान रशिया-युक्रेन युद्धावरही चर्चा झाली असून, ते संपवण्यासाठीच्या उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली.

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इतिहासातील सर्वात मोठा ट्रेड रूट (व्यापारी मार्ग) देखील जाहीर केला. त्यांनी सांगितले की, दोन्ही देश या व्यापार मार्गाच्या निर्मितीसाठी काम करत आहेत. हा मार्ग भारतात सुरू होऊन नंतर इस्रायल, इटली आणि अमेरिकेपर्यंत येईल. याकडे चीनच्या रोड अँड बेल्ट प्रोजेक्टला आव्हान म्हणून पाहिले जात असल्याने या घोषणेला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला एफ-३५ लढाऊ विमाने पुरवण्याची घोषणाही केली आहे. "या वर्षापासून, आम्ही भारताला अब्जावधी डॉलर्सची लष्करी सामग्री विक्री करणार आहोत. आम्ही भारताला एफ-३५ स्टेल्थ लढाऊ विमाने पुरवण्याचा मार्गही मोकळा करत आहोत," असे ट्रम्प म्हणाले.

ट्रम्प आणि मोदी यांच्यात अमेरिकेत भारताचे आणखी दोन नवीन दूतावास सुरू करण्याबाबत एक मोठी घोषणाही करण्यात आली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, "लवकरच बोस्टन आणि लॉस एंजेलिसमध्ये दोन दूतावास सुरू होणार आहेत. या दूतावासांमुळे भारत आणि अमेरिकेतील जनतेशी असलेले संबंध अधिक मजबूत होतील." अमेरिकेत राहणारे भारतीय आपल्यासाठी खूप महत्वाचे आहेत यावरही पंतप्रधानांनी यावेळी भर दिला.

यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, "दोन्ही देशांनी २०३० पर्यंत त्यांचा द्विपक्षीय व्यापार ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे दोन्ही देशांना फायदा होईल. या व्यापार कराराला अंतिम रूप देण्यासाठी दोन्ही देश काम करत आहेत." पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या बैठकीदरम्यान, तेल आणि गॅस खरेदीबाबत एक मोठा करार झाला आहे.

### खास भेट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खास भेट दिली आहे. त्यांनी पंतप्रधान मोदींना कॉफी टेबल बुक 'अवर जर्नी टुगेदर' भेट म्हणून दिले. त्यावर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची स्वाक्षरी असून त्यावर लिहिले आहे की, मिस्टर प्राइम मिनिस्टर, तुम्ही ग्रेट आहात. ३२० पानांच्या या पुस्तकात 'हाउडी मोदी' आणि 'नमस्ते ट्रम्प' कार्यक्रमांची ठळक वैशिष्ट्ये आहेत. या दरम्यान दोन्ही नेते एकमेकांना पाठिंबा देताना दिसले. २०१९ मध्ये ह्युस्टनमधील फुटबॉल स्टेडियममध्ये 'हाउडी मोदी' रॅली आयोजित करण्यात आली होती, ज्यात ५० हजारांहून अधिक भारतीय-अमेरिकन सहभागी झाले होते. यावेळी पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प या दोघांनीही भाषणे केली होती.

### राणाचे प्रत्यार्पण

२००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वुर राणाच्या प्रत्यार्पणाला डोनाल्ड ट्रम्प यांनी मान्यता दिली. पंतप्रधान मोदी यांच्याशी झालेल्या भेटीनंतर व्हाईट हाऊसमध्ये संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना ट्रम्प यांनी हा निर्णय जाहीर केला आणि भविष्यात आणखी प्रत्यार्पणाचे संकेत दिले. "आम्ही एका अतिशय हिंसक माणसाला (तहव्वुर राणा) ताबडतोब भारतात परत पाठवत आहोत. याबाबत आमच्याकडे बऱ्याच विनंत्या आल्या आहेत, आम्हाला भारताबरोबरची स्थिती सुधारायची आहे, असे ट्रम्प म्हणाले. २१ जानेवारी रोजी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रत्यार्पणाला विरोध करणारी याचिका फेटाळून लावली. राणा सध्या लॉस एंजेलिस येथे तुरुंगात आहे. त्यामुळे आता राणाच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने नमूद केलं की सर्व कायदेशीर प्रक्रिया संपली असून त्याच्या हस्तांतरणाची तयारी सुरू आहे.

### चीन प्रश्नी हस्तक्षेप नाकारला...

ट्रम्प यांनी भारत आणि चीन सीमावादात मध्यस्ती करण्याचा प्रस्ताव दिला, तो भारताने वेळ न दडवता फेटाळून लावला. सीमावाद हा द्विपक्षीय मुद्दा असून आम्ही आमच्या स्तरावर सर्व गोष्टी सोडविण्यास सक्षम आहोत, असे भारताने स्पष्टपणे सांगितले. चीन हा ही जगातील प्रमुख देश असून, आम्हाला चीनसोबत चांगले संबंध ठेवायचे आहेत. कोरोना काळापर्यंत शी जिनपिंग यांच्याशी आमचे चांगले संबंध होते. त्यानंतर परिस्थिती थोडी बिघडली. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, शेजारील देशांशी आमचे जे काही प्रश्न आहेत, त्यांना सामोरे जाण्यासाठी आम्ही नेहमीच द्विपक्षीय चर्चेचा मार्ग अवलंबला आहे. आम्हाला तिसऱ्या पक्षाची गरज नाही.

### बांगलादेशचा निर्णय मोदींवर

पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात बांगलादेश मुद्द्यावर चर्चा झाली. बांगलादेशासंदर्भातील निर्णयही पंतप्रधान मोदींवर सोपवण्यात आला आहे. अमेरिकी राष्ट्रीय गुप्तचर विभागाचे संचालक तुलसी गबार्ड यांच्याशी मोदी यांनी चर्चा केली आहे. गेल्या वर्षी बांगलादेशात विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसक आंदोलनानंतर शेख हसीना यांचे सरकार कोसळले होते. त्यांना ला देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला होता. यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांना हंगामी सरकारचे प्रमुख करण्यात आले. युनूस अमेरिकेच्या नेत्या हिलरी क्लिंटन यांचे निकटवर्तीय मानले जातात. ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्याबद्दलही युनूस यांनी टीका केली होती.

# राज्यभर सल मुंडेंना मात्र वरचे पद



**नवी दिल्ली :** संतोष देशमुख हात्याप्रकरणी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यावरून आंदोलनाने महाराष्ट्रभर रान पेटले असले तरी आज धनंजय मुंडे यांना पक्षांतर्गत व्यवस्थेमध्ये बढती मिळाली. कार्यकारणी मध्ये त्यांचे वर्णी लावत त्यांना एक प्रकारे प्रशस्तीपत्र देण्यात आल्याचे दिसून येते. आजच्या राष्ट्रवादीच्या बैठकीमध्ये धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्या बद्दलचा निर्णय घेतला जाईल असे सांगितले जात होते राजीनामा स्वीकारण्याचा किंवा नाही याबाबत अजित पवार या बैठकीमध्ये काहीतरी भूमिका घेतील असे मानले जात होते प्रत्यक्षात राजीनामाबद्दल अजित पवार यांनी आहे तेच भूमिका कायम ठेवत उलट पक्ष धनंजय मुंडे यांना बढती देण्याचा प्रयत्न केला आहे या माध्यमातून पक्ष ठाम पणाने धनंजय मुंडे यांच्या पाठीमागे आहेत हाच संदेश देण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते.

तर राष्ट्रवादीचे दुसरे नेते छगन भुजबळ यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांची देखील वर्णी कार्यकारणी मध्ये लावण्यात येत असल्याचे दिसून आले. अंजली दमानिया यांनी मात्र आज पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणी केली आहे मुंडे हे सरकारमध्ये असेपर्यंत कुठलाही तपास पुढे जाणार नाही त्यामुळे मुंडे यांना मंत्री पदापासून बाजूला व्हावेच लागेल असे ठाम भूमिका पुन्हा एकदा दमानिया यांनी घेतली

# 50 कोटी!!

## निम्म्या भारताने साधली स्नानाची पर्वणी



**नवी दिल्ली :** 144 वर्षानंतर येणाऱ्या महा कुंभमेळ्यामध्ये तब्बल पन्नास कोटी भाविकांनी कुंभ स्नान केल्याची नवी आकडेवारी समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महा कुंभमेळ्याची परभणी सुरू आहे. यामध्ये आजपर्यंत जवळपास 50 कोटी भाविक यात्रेकरू पर्यटक यांनी हजेरी लावली आणि त्रिवेणी संगमांमध्ये स्नान केले असे आकडेवारी उत्तर प्रदेश सरकारने जाहीर केले आहे यामुळे हा जगातील मोजक्या सर्वात मोठ्या इव्हेंट पैकी एक समूह कार्य असल्याचे सांगितले जाते.

प्रयागराज मध्ये गेल्या 32 दिवसांपासून महा कुंभमेळा सुरू आहे हा महा कुंभमेळा 144 वर्षानंतर एकदाच घेत असल्यामुळे हिंदू धर्मात याच्याबद्दल प्रचंड असता आणि आकर्षण निर्माण झाले होते गेल्या 32 दिवसांमध्ये या कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांची संख्या आकडेवारी आणि आठवडा निहाय जाहीर करण्यात आली आहे पहिले पाच आठवड्यामध्ये दहा कोटी यात्रे करून मी येथे हजेरी लावली त्यानंतरच्या प्रत्येक आठवड्यामध्ये सुमारे आठ ते नऊ कोटी भाविकांनी प्रयागराज मध्ये हजेरी लावल्याचे नोंद झाली आहे.

भारत देश हा 140 कोटी लोकसंख्येचा देश आहे त्यापैकी 110 हिंदू लोकसंख्या आहे प्रयागराज मध्ये 50 कोटी भाविक दाखल झाले म्हणजे जवळपास निम्मा भारत या ठिकाणी येऊन गेला असे मानले जाते प्रयागराज मते परदेशी पाहुण्यांचे देखील वर्दळ मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे मौनी अमावस्येनंतर वसंत पंचमी ही एक स्नानाचे तिथे पार पडली आता शेवटचा अमृतकुंभ स्नान योग म्हणून महाशिवरात्रीचा मानला जातो त्यामुळे त्या दिवशी देखील प्रचंड गर्दी होईल असे मानले जाते सध्या प्रयागराज रेल्वे स्टेशन हे काही दिवसांकरिता बंद ठेवण्यात आले असून जवळपास आणीबाणीची परिस्थिती येथे लागू करण्यात आली आहे म्हणजे प्रशासन अलर्ट मोडवर असून प्रयागराजच्या आजूबाजूच्या कुठल्याही रस्त्यावर वाहतूक कोंडी होणार नाही याची थेट जबाबदारी तेथील अधिकाऱ्यांवर देण्यात आले आहे अधिकार 24 तास ऑन ग्राऊड रस्त्यावर असावेत असे आदेश मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांनी दिले आहेत.

# दरी वाढतेय!




**नवी दिल्ली :** नाशिकच्या पालकमंत्री पदावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू गिरीश महाजन यांच्यातील दरी पुन्हा एकदा वाढत असल्याचे दिसून येत आहे नाशिक मधील कुंभमेळा काही महिन्यातच भरत आहे त्याच्या नियोजनावरून या दोन्ही मंत्र्यांनी आपापल्या हातामध्ये कमान घेण्याबद्दलची एक प्रकारची सुप्त रसखेच सुरू केले असल्याचे चित्र दिसते गिरीश महाजन यांनी नुकतीच प्रशासनाची बैठक घेतल असताना आज स्वतः एकनाथ शिंदे यांनी स्वतः नाशिक येथे जाऊन

प्रशासनाची बैठक घेतली पुढील दोन दिवस ते येथील पूर्ण कुंभमेळ्याच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवणार आहेत.

नाशिकचे पालकमंत्री पद एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे असावे अशी मागणी होत असताना तेथे गिरीश महाजन आणि छगन भुजबळ यांनी देखील दावे ठोकले परंतु सरते शेवटी यामध्ये भाजपाने आपले विश्वासू आणि भाजपाचे मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पालकमंत्री पदाची सूत्रे देत या दोन्ही पक्षांवर ती कडी केली.

एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सर्वच अनुयायांना हा घाव वर्मी लागला असून नाशिक वर आपले वर्चस्व राहावे यासाठी त्यांची प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळेच नाशिकच्या प्रस्थान बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काही विशेष लक्ष घालत असल्याचे दिसून येते.

एकीकडे हे चित्र असताना महाविकास आघाडी मधील देखील दरी आता सभागृहातील पक्षनेते पदावरून वाढत असल्याचे दिसून येत आहेत विधान परिषदेतील पक्षनेते पद हे काँग्रेसकडे राहावे अशी भूमिका काँग्रेसने मांडली आहे तर दुसऱ्या सभागृहातले पद हे शिवसेनेकडे देऊन त्याची तडजोड करावी असे सूत्र त्यांनी मांडले आहे.



# देशभरातील सहकार तज्ज्ञ पुण्यात...!

## सहकार तज्ज्ञांची परिषद; जगभरातून १३ देशांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिकटॅब आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था (वामनिकॉम) पुणे येथे मोठ्या दिमाखात करण्यात आले, यामध्ये भारतासह जगभरातील १३ देशातील सहकार क्षेत्रातील दिग्गज मान्यवर, नेते, धोरणकर्ते आणि सहकारी तज्ज्ञ एकत्र आले होते. परिषेदेचे उद्घाटन दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अप्राका (ए.पी.आर.ए.सी.ए), बँकॉकचे महासचिव डॉ. प्रसून कुमार दास, आणि पी.आर हैदराबादचे महासंचालक आय.ए.एस डॉ. जी. नरेंद्र कुमार, आय.आय.एम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, सानासा श्रीलंकेच्या व्यवस्थापकीय संचालक समदानी किरीवांडेनिया आणि सिकटॅब व वामनिकॉमच्या संचालक डॉ. हेमा यादव आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील परिषदेला भारताच्या कानाकोपऱ्यातून सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांनी विशेष उपस्थिती लावली होती. परिषदेचे आभार डॉ. शंतनू घोष यांनी केले.

### केंद्रिय सहकार राज्यमंत्र्यांच्या हस्ते आज समारोप

● १५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३, वा. तीन दिवसीय परिषदेच्या समारोप होईल. समापन समारंभाचे प्रमुख पाहुणे मुरलीधर मोहोळ, भारत सरकारचे सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री असतील. या कार्यक्रमात भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाचे सहसचिव सिद्धार्थ जैन, आणि डॉ.उमाकांत दास, इंस्टिट्यूट ऑफ रूरल मॅनेजमेंट आनंद (आय.आर. एम. ए.) संचालक, यांच्यासह सन्माननीय अतिथी देखील उपस्थित असतील. समापन भाषण डॉ. हेमा यादव, संचालक, वामनिकॉम आणि सिकटॅब देतील.

“ सहकार चळवळ केवळ आर्थिक उपक्रमांपुरती नाही, हि चळवळ म्हणजे समाजातील लहानमोठ्या समुदायांना सशक्त करणे, सामाजिक समानता सुनिश्चित करणे आणि टिकाऊपणा वाढवणे आहे. ही परिषद भविष्याच्या दृष्टीने एक महत्वाचे पाऊल आहे. जिथे डिजिटल परिवर्तन आणि सहकारी तत्त्वे लवचिक अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी काम करेल.

**— डॉ. हेमा यादव** संचालिका, सिकटॅब व वामनिकॉम

“ सहकार क्षेत्रात भारताचा मोठा टक्का आहे. आम्ही भारतासारख्या बलाढ्य अर्थव्यवस्था असलेल्या देशाच्या बाजूला राहतो. सहकार क्षेत्रातील अनेक बारकावे आम्ही भारत देशाकडून शिकत आहेत. श्रीलंका देश भारताला सदैव सहकार क्षेत्रात मोठे होताना पाहताना आम्हाला त्याचा आनंद होईल. आशिया खंडातील भारत देशाने जगभरात त्याचे नाव लौकिक केले आहे.

**— समदानी किरीवांडेनिया** सानासा श्रीलंकेच्या व्यवस्थापकीय संचालक

### सहकारी संस्थांच्या माध्यमातून समृद्धी आणणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिकटॅब परिषदेचे उद्घाटन



“ राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (सिक्कटॅब) ची स्थापना १९५८ मध्ये झाली. ही संस्था दरवर्षी २०० हून अधिक कार्यक्रम आयोजित करते. सहकार क्षेत्रात शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे देशभरातील क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन आणि अल्पकालीन कार्यक्रम तसेच दरवर्षी सात ते आठ हजार व्यक्तींना प्रशिक्षण देते. सदरील संस्था नऊ दशकांहून अधिक काळ सहकारी संस्थांना प्रोत्साहन आणि बळकट करण्यात आघाडीवर आहे.

**— सावित्री सिंह** एन.आय.आर.डी एन.सी.यु आयच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी

“ सहकार क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे भारताच्या खेडे गावापासून ते शहरांपर्यंत मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्द झाल्या आहेत. भारतात आलेली हरती क्रांतीने देशाला वेगळ्या स्थावर ती घेवून गेली. आता सर्वात महत्वाचे म्हणजे डिजिटल क्रांतीमुळे शहर आणि गाव यांना जोडण्यासाठी डिजिटल हे महत्वाचे माध्यम बनले आहे. डिजिटल क्षेत्रात नवनवीन होणारी संशोधन यामुळे सहकार क्षेत्राला डिजिटलमुळे मोठी ताकद मिळाली आहे. डिजिटलमुळे सहकार क्षेत्र जगभरात पोहचले असून याचा फायदा सहकार क्षेत्राला झाला आहे.

**— डॉ. प्रसून कुमार दास** महासचिव बँकॉक

“ भारत देश हा जगाचा मध्यबिंदू बनला आहे. जेव्हा डिजिटलायझेशनचा विचार केला जातो तेव्हा ते यु. पी. आय. असो किंवा डी. सी असो, यामध्ये भारताचा जगभरात दबदबा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे मोठ्या प्रमाणात ते कृषी अर्थव्यवस्था आहे. तिला तिचे बळकटीकरण करण्यासाठी म्हणून तिला कनेक्टिव्हिटी अत्यंत महत्वाची आहे. त्यामध्ये गावांपैकी सर्वात लहान गावांना मोठ्या गावाशी जोडण्याचा निर्णय घेतला गेला तेव्हा सहकार क्षेत्रात त्याचा फायदा झाला.

**— डॉ. भीमराया मेत्री** आय.आय. एम नागपूरचे संचालक

## पुण्यात काय घडतंय...

### संविधान जागर ग्रंथमालिकेचे प्रकाशन



- **आयोजक :** 'आंतर भारती,' पुणे आणि 'गोल्डनपेज पब्लिकेशन
- **ग्रंथमालिकांचे नाव:** 'भारतीय धर्मनिरपेक्षता : चिंतन आणि चिकित्सा', 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता : संविधानिक मूल्यत्रयी', 'मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे : एक चिकित्सक अभ्यास', 'आर्थिक न्याय : संकल्पना, संविधान आणि अर्थकारण', 'सामाजिक न्याय : संविधान आणि समाज' आणि 'राजकीय न्याय : प्रतिनिधित्व आणि राज्यसंस्थेचे उत्तरदायित्व'
- **संपादक:** माजी संमेलनाध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख
- **प्रमुख उपस्थिती:** ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरू, ज्येष्ठ पत्रकार किशोर बेडकीहाळ, ज्येष्ठ विचारवंत गौतमीपुत्र कांबळे, प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. असीम सरोदे
- **कार्यक्रमाचे अध्यक्ष:** ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर
- **संयोजक:** अंजली कुलकर्णी, अमृता खेतमर आणि प्रदीप खेतमर

- **कुठे :** एस. एम. जोशी फाउंडेशनचे मुख्य सभागृह, नवी पेठ, पुणे
- **कधी :** शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी, सकाळी १० वाजता
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य खुला

### वनराईचे वार्षिक स्नेह संमेलन



- **वनराई संस्थेचे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री, पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांचे यंदा जन्मशताब्दी वर्षानिमित्त**
- **स्नेहसंमेलनात काय:** पुणे, वनराई इको क्लब अंतर्गत वनराई पर्यावरण शिक्षण कार्यक्रम
- **सहभाग:** ५० शाळेतील ४०० हून अधिक विद्यार्थी
- **स्नेहसंमेलनाची वैशिष्ट्ये:** कलेच्या माध्यमातून पर्यावरणीय संदेश देण्याचे अनोखे चित्रकला सादरीकरण, पर्यावरणीय संदेश देणारी गीते,पर्यावरण जागरूकतेवर आधारित संदेश देणारी नाटिकांचे सादरीकरण, पर्यावरणाच्या क्षेत्रातील सृजनशील आणि शैक्षणिक प्रकल्पांची देवाणघेवाण

- **कुठे :** सानेगुरुजी स्मारक मंदिर, पर्वती पायथा, पुणे
- **कधी :** १५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९:१५ ते दुपारी ३:००
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य खुला

### मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा बक्षिस वितरण



- **आयोजक :** समर्थ भारत अभियान आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट
- **हस्ते:** महामंडलेश्वर श्री अभिषेक चैतन्यगिरी स्वामी ऋषीकेश (संन्यास आश्रम केरळ)
- **प्रमुख उपस्थिती:** जयतंराव कुलकर्णी ( रामदासी संस्थान सज्जनगड चिंचवड शाखा), सुधीर क्षीरसागर (अध्यक्ष दासबोध अभ्यास मंडळ)

- **कुठे :** महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे रमापुरुषोत्तम संकुल
- **कधी : रविवार दि १६ फेब्रुवारी सायं ६ वा.**
- **शुल्क : प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य खुला**

### आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचा समारोप



- **स्नेहसंमेलनात काय:** वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्थान
- **प्रमुख उपस्थिती:** मुरलीधर मोहोळ (केंद्रिय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री), डॉ. उमाकांत दास (संचालक आय.आर.एम.ए.), सिध्दार्थ जैन (सहसचिव, भारत सहकार मंत्रालय)
- **निमंत्रक:** डॉ. हेमा यादव (संचालक वामानिकॉम आणि सिकटॅ

- **कुठे :** ज्युबिली हॉल वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रबंधन संस्थान गणेशखिंड रोड
- **कधी : शनिवार** १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३:००
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य खुला

# डॉ. मोहन धारियांचा उलगडला संघर्षमय प्रवास



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या जन्मशताब्दी दिनाच्या औचित्याने पुढील वर्षभरामध्ये महाराष्ट्रातील जवळपास 200 गावांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे जलसंधारणाची आणि ग्रामीण विकासाचे उपक्रम राबवले जाणार आहेत. त्याचबरोबर डॉ. धारिया यांचे कार्य पुढील पिढ्यांसमोर यावे यासाठी वनराई तर्फे विविध उपक्रम वनराई राबविणार आहे. भविष्यातील पर्यावरण, हवामान, प्रदूषण आदी संकटे विचारात घेता वनराई संस्थेच्या वतीने त्याविषयीची चर्चा व परिसंवादाचे आयोजन केले होते. यामध्ये पुण्यासह, महाराष्ट्रातील आणि भारतातील भविष्यातील समस्या निर्माण होणार आहेत, त्याविषयीच्या उपाययोजना काय करता येतील याचा आढावा घेण्यात आला.

यावेळी वनराईचे विश्वस्त सागर धारिया, साधना धारिया श्रॉफ, सचिव अमित वाडेकर, बबन कांकीरड उपस्थित होते.

**जन्मशताब्दी**

अमित वाडेकर म्हणाले की, डॉ. धारिया यांची खासदार अथवा केंद्रीय मंत्री म्हणून केलेली लोकसभा आणि राज्यसभांमधील भाषणे ग्रंथ स्वरूपात प्रकाशितदेखील केली जाणार आहेत. आजच्या काळामधील परिस्थितीला अनुसरून असणाऱ्या प्रामुख्याने धोरणात्मक पातळीवर राष्ट्रीय मुद्द्यांवरचे त्यांचे विचार होते त्याचेही डॉक्युमेंटेशन केले जाणार आहे.

“ चार दशकांपूर्वी पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया तथा आदरणीय अण्णांनी भारतभूमीला पुन्हा एकदा 'सुजलाम् सुफलाम्' बनवण्याच्या ध्यासातून 'वनराई'ची स्थापना केली. लोकचळवळीतून हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्याबरोबरच जलसमृद्ध, स्वच्छ, हरित, जैववैविध्यपूर्ण आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या सशक्त असा भारत घडवण्यासाठी 'वनराई' आज देशपातळीवर कार्यरत आहे.

**— सागर धारीया** विश्वस्त वनराई

# सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी फुटणार

## विठ्ठलवाडीचा उड्डाणपूल मार्चपर्यंत तर गोयलगंगाला मे चा मूहूर्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात सर्वात वाहतूक कोंडीचा मार्ग म्हणून ख्याती असलेल्या सिंहगड रस्त्यावरील वाहनचालकांची या वाहतूक कोंडीतून आता लवकरच सुटका होणार आहे; या रस्त्यावरील दोन किलोमीटर लांबीचा विठ्ठलवाडी ते फनटाईमपर्यंतचा सर्वात मोठा उड्डाणपूल मार्च अखेरपर्यंत खुला होणार आहे. त्याचा फायदा दररोज सहा ते सात लाख प्रवाशांना होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तर गोयलगंगा ते प्रकाश इनामदार चौकापर्यंतचा दीड किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल मे महिन्याच्या अखेरीपर्यंत सुरु होणार आहे.

विठ्ठलवाडी ते फनटाईमपर्यंतचा २,१२० मीटर (सुमारे २ किमी) लांबीचा सिंहगड रोड वरील शहरातील सर्वात मोठा उड्डाणपूल मार्च अखेरपर्यंत खुला होणार आहे. तर, गोयल गंगा चौकापासून प्रकाश इनामदार चौकापर्यंतचा १,५४० मीटर (१.५ किमी) लांबीचा दुसरा उड्डाणपूल मे अखेरपर्यंत सुरू होईल.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या, सात-सूत्री कार्यक्रमांतर्गत, पुणे महानगरपालिका हे प्रकल्प पूर्ण करत आहे.

त्यामुळे सिंहगड रस्त्यावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना राजाराम पुलापासून पुणे-बंगळूर महामार्गापर्यंत होणाऱ्या वाहतूक कोंडीतून लवकरच सुटका मिळणार आहे. या पुलांमुळे, धायरी ते स्वारगेट आणि स्वारगेट ते धायरी असा प्रवास करणाऱ्या वाहनांना जलद गतीने प्रवास करता येईल. विठ्ठलवाडी ते फनटाईम उड्डाणपूल आणि गोयल गंगा चौक ते प्रकाश इनामदार चौक या दरम्यान सध्या डांबरीकरणाचे काम सुरू आहे, जे १५ दिवसांत पूर्ण होईल.

गेल्या दोन दशकांमध्ये, सिंहगड रस्ता परिसरात वेगाने शहरीकरण झाले असून, खडकवासला धरणापर्यंत विकास झाला आहे. तसेच, पुणे-बंगळूर महामार्गालगतच्या लोकसंख्येतही मोठी वाढ झाली आहे. मात्र, या भागांना शहराशी जोडणारा एकच मुख्य रस्ता आहे. ३ किमी लांबीच्या राजाराम पूल ते धायरी या मार्गावर चार ते पाच मोठी वळणे असल्यामुळे, सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, पीएमसीने उड्डाणपूल प्रकल्प प्रस्तावित केला, जो आता अंतिम टप्प्यात आहे.

### कशामुळे होतेय वाहतूक कोंडी

- सिंहगड रस्ता परिसराचे वेगाने शहरीकरण
- नागरीकरणाने खडकवासला परिसर व्यापला
- पुणे- बंगळूर महामार्गालगतही लोकसंख्येत वाढ
- शहराशी जोडणारा एकच मुख्य रस्ता
- तीन किलोमीटरच्या मार्गावर तीन ते चार मोठी वळणे
- सकाळी आणि संध्याकाळी चाकरमान्यांमुळे होतेय सर्वाधिक गर्दी
- खडकवासला, सिंहगड किल्ला यामुळे पर्यटकांचे आकर्षण वाढले

“ 'हे उड्डाणपूल पाच महत्त्वाच्या चौकांतील अडथळे दूर करतील, ज्यामुळे प्रवासाच्या वेळेत लक्षणीय घट होईल. प्रकाश इनामदार चौक, हिंगणे चौक, संतोष हॉल चौक, माणिक बाग चौक आणि गंगा भाग्योदय चौक या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी कमी होईल.

**— संदीप पाटील,** कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग

# प्रा. डॉ. संजय तांबट यांनी पदभार स्वीकारला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ. संजय तांबट यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचा अधिष्ठाता म्हणून पदभार स्वीकारला. कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्र- कुलगुरू प्रा. डॉ.पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ.ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषद सदस्य श्रीमती बागेश्री



मंठाळकर, परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, प्रा. विनायक जोशी,प्रा. संदीप नरडेले, प्रा. योगेश बोराटे तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांची प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी नियुक्ती केल्यामुळे सदर पद रिक्त झाले होते. त्यामुळे कुलगुरूनी सदर शाखेच्या अधिष्ठाता पदावर डॉ. तांबट यांची नियुक्ती केली.

# मुठा परिसर स्वच्छतेने पुणेकरांनी साजरा केला 'व्हॅलेंटाईन डे'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुळा-मुठा सह्याद्रीच्या लेकी... वुई लव्ह मुळा-मुठा...ध्यास स्वच्छतेचा, ध्यास प्रगतीचा...नद्या वाचवा, जीवन वाचवा...असे फलक हातात घेत घोषणांसह महाविद्यालयीन युवक-युवती, शालेय विद्यार्थी आणि पुणेकरांनी मुठा परिसर स्वच्छतेने व्हॅलेंटाईन डे साजरा केला. एक हजारहून अधिक पुणेकरांनी मुठा नदी पात्रात एकत्र येत माय रिव्हर माय व्हॅलेंटाईन उपक्रमात सहभाग घेत मुठा नदी विषयी प्रेम व कृतज्ञता व्यक्त केली.

वर्शिप अर्थ फाउंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पुणेकर नदी परिसर स्वच्छ करून 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाईन' हा उपक्रम राबविण्याकरिता भिडे पूल परिसरात एकत्र आले. यावेळी माजी केंद्रीय मंत्री राजकुमार सिंग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर, परिमंडळ १ चे पोलीस



उपायुक्त संदीपसिंह गिल, अभिनेते प्रविण तरडे, प्रशासकीय अधिकारी आशा राऊत, निखील देशमुख, आशिष शेटे, अनिल सातव, नितीन देशपांडे, वर्शिप अर्थ फाउंडेशनचे संस्थापक पराग मते, सह संस्थापक राज देशमुख, व्यवस्थापन टीममधून आम्रपाली चव्हाण, समीर पौलस्ते, सुरज शिराळे, विद्यार्थी प्रतिनिधी अक्षना कांबळे, सानिका दळवी, यश आगवणे यांसह विविध धर्मांचे धर्मगुरु देखील उपस्थित होते.

मुळा-मुठा नदी स्वच्छतेविषयी यावेळी उपस्थितांनी शपथ घेतली. यामध्ये जपान, ब्राझील, रशिया, श्रीलंका या देशातील पर्यावरणप्रेमींनी देखील सहभाग घेतला. पर्यावरण रक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल नीलय उपाध्याय यांना यावेळी मुळा-मुठा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

राजकुमार सिंग म्हणाले, कोणत्याही नदीला मुक्तपणे प्रवाहित होऊ दिले नाही, तर संपूर्ण पर्यावरणाचा ऱ्हास होऊ शकतो. वाढते शहरीकरण आणि मानवी अतिक्रमण यामुळे नदी विषमय होत आहे. त्यामुळे आपण प्रत्येकाने याविषयी आत्मपरिक्षण करायला हवे. मुळा-मुठा नदी नीट आणि सुंदर ठेवणे, ही पुणेकरांची जबाबदारी आहे. यासाठी आज पुणेकर एकत्र आल्याचे चित्र प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.पराग काळकर म्हणाले, मुळा-मुठा ही पुण्याची वाहिनी आहे. नदीच्या काठाने माणसाचे जीवन विकसित झाले आहे. नदी हा मानवी जीवनाचा आवश्यक भाग असून पाण्यातील प्रदूषणाने अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. आपण एक पाऊल पुणे टाकून नदी सुधार आणि आरोग्याच्या दृष्टीने टाकायला हवे.

राज देशमुख म्हणाले, 'वसुधैव कुटुंबकम' या उक्ती प्रमाणे संपूर्ण मानवजाती एक परिवार असून या पृथ्वीतलावरील जल, मृदा, वायू, वनस्पती, वन औषधी जीव जंतू इत्यादी सर्व बाबीचा आपण मनुष्य म्हणून उपभोग घेतो.

# एव्हिएशन गॅलरीमुळे विद्यार्थ्यांच्या विकासाला भर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या एव्हिएशन गॅलरीला आणि महानगर पालिकेच्या पाळणाघराला पुणे महानगरपालिकेचे नव निर्वाचित आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी पहिल्यांदाच भेट दिली. यावेळी त्यांनी एव्हिएशन गॅलरीबद्दल बोलताना म्हणाले, "या एव्हिएशन गॅलरीमुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक विकासात वृद्धी होईल. पुण्यासारख्या शहरात असे गॅलरी असणे हे आजच्या पिढीला एक वरदानच आहे."

या एव्हिएशन गॅलरीचा आणखीन विध्यार्थ्यांना लाभ व्हावा या उद्देशाने रिटायर पायलेट आणि ISRO चे रिटायर वैज्ञानिक यांचे मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्याचा सल्ला देखील त्यांनी दिला.

**प्रशासन**

यावेळी पुणे महानगर पालिकेच्या स्वास्थ्य विभाग प्रमुख डॉ. कल्पना बळीवंत, पुणे महानगर पालिका बाग विभागाचे बाग व्यवस्थापक अशोक घोरपडे, पुणे महानगर पालिकेचे वरिष्ठ सामाजिक विकास अधिकारी आसंग पाटील, व्हॅन लियर फाउंडेशन अर्बन95चे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी आर्किटेक्ट आमिर पटेल, पाळणाघराचे शिक्षण, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांची अपेक्षा

# इतिहास, संस्कृतीचे सत्यदर्शन घडवणे हे सारस्वतांचे काम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "आपला इतिहास, परंपरा, संस्कृती यांच्याशी प्रामाणिक नसण्याची वृत्ती सध्या दिसून येत आहे. मात्र, आपल्या इतिहासाचे, संस्कृतीचे यथार्थ दर्शन सत्याचा अपलाप न करता घडवणे, हे सारस्वतांचे कर्तव्य आहे आहे", असे उद्गार विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी येथे काढले. मसापच्या स्वागतकक्षाला प्रा. द. के. बर्वे यांच्यासारख्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे नाव मिळाले, हे औचित्यपूर्ण आहे. तसेच बर्वे यांच्यासारख्या उत्तम शिक्षक,



लेखक, प्रकाशक असणाऱ्या संवेदनशील व्यक्तीचे नाव असणे, हे भाग्याचे आहे, असेही ते म्हणाले

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष राजीव बर्वे आणि त्यांच्या पत्नी मधुमिता बर्वे यांनी दिलेल्या देणगीतून साकारलेल्या, उत्तम लेखक, मराठीचे व्यासंगी प्राध्यापक आणि दिलीपराज प्रकाशन या संस्थेचे संस्थापक प्रा. द. के. बर्वे स्वागत कक्षाचे उद्घाटन विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

“ महाराष्ट्र साहित्य परिषद ही संस्था अर्थबळ आणि मनुष्यबळासह वैचारिक बैठकीच्या साथीने शतकोत्तर रौप्य महोत्सवाकडे घोडदौड करत आहे. मसापशी वैयक्तिक ऋणानुबंध जुळले आहेत. हे सारस्वतांचे स्थान आहे.दुसरीकडे सारस्वतांचीही जबाबदारी आहे, की त्यांनी आपला इतिहास, संस्कृतीशी प्रामाणिक राहून वाचकांना यथार्थ सत्यदर्शन घडवले पाहिजे"


**— विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर**

मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, राजीव बर्वे, डॉ. अश्विनी धोंगडे, ज्येष्ठ कथाकार, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेनलाचे माजी अध्यक्ष भारत सासणे, मसापाच्या प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, कार्यवाह प्रमोद आडकर व्यासपीठावर उपस्थित होते.

शंकर अभ्यंकर म्हणाले, महाराष्ट्र साहित्य परिषद ही संस्था अर्थबळ आणि मनुष्यबळासह वैचारिक बैठकीच्या साथीने शतकोत्तर रौप्य महोत्सवाकडे घोडदौड करत आहे. मसापशी वैयक्तिक ऋणानुबंध जुळले आहेत. हे सारस्वतांचे स्थान आहे.दुसरीकडे सारस्वतांचीही जबाबदारी आहे, की त्यांनी आपला इतिहास, संस्कृतीशी प्रामाणिक राहून वाचकांना यथार्थ सत्यदर्शन घडवले पाहिजे".

प्रा. द. के. बर्वे यांच्या नावाने मसापमध्ये स्वागतकक्ष असावा, यामागील भूमिका राजीव बर्वे यांनी स्पष्ट केली. "बर्वे कुटुंबासाठी आज सोनियाचा दिवस आहे. महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्थेच्या स्वागतकक्षाला वडिलांचे नाव मिळणे, याचा परम संतोष आहे.

#रा




छावा' या चित्रपटाचा 'फर्स्ट डे फर्स्ट शो' आयोजित करण्यात आला होता. सकाळी पावणेसहा वाजता आयोजित करण्यात आलेल्या या शोला प्रचंड प्रतिसाद मिळाला. यामध्ये तरुण आणि तरुणींची संख्या लक्षणीय होती. या चित्रपटाचा रिव्ह्यु दैनिक 'राष्ट्रसंचार'च्या वतीने देण्यात आला होता.

## अधिकारी, कर्मचारी यांना बक्षीसी देण्याची मागणी

**पुणे :** महापालिकेला २००० मध्ये पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अधिकारी आणि कर्मचारी यांना पाच हजार रुपये बक्षीसी देण्यात आली होती, आता महापालिका अमृतमहोत्सव साजरा करत असल्याने त्यांना साडेसात हजार बक्षीसी देण्यात यावी अशी मागणी पुणे महापालिका मागासवर्गीय कर्मचारी संघटनेने केली आहे. त्याबाबत संघटनेचे अध्यक्ष रुपेश सोनवणे यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना निवेदन देऊन ही मागणी केली आहे.




हल्ली भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही पण, आम्ही शेतकऱ्यांना 1 रुपयांत पीक विमा दिला. असे विधान महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली आहे यातून नवा वाद समोर येण्याची शक्यता आहे

## घरफोडीतील मुख्य आरोपीला पोलिसांनी केले अटक

**पुणे :** तरडे (ता.हवेली) येथील बंगला फोडून तिजोरीमधील चालूबाजार भावाप्रमाणे सुमारे 28 लाखांच्या सोन्या चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली होती. ही घटना रेल्वे कोलस वस्ती परिसरात घडली असून 1 फेब्रुवारीला सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घरफोडीतील मुख्य आरोपीला लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून तीन गुन्ह्यांची उकल करून सुमारे साडे 9 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यास पोलिसांना यश आले आहे. लोणी काळभोर पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संगतसिंग अजमेरसिंग कल्याणी (वय 45 , रा. थेऊर रस्ता, वृंदावन पॅलेस मंगल कार्यालयाशेजारी, थेऊर कोलवडी रोड, थेऊर, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. याप्रकरणी स्टीफनविक्टर वलेरवण लासराडो (वय 51, रा. प्लॉट नं. 524, रेल्वे कोलस वस्ती रोड, तरडे ता हवेली जि- पुणे, मुळ रा बिल्डींग नं 150, फ्लॅट नं.4 डी.4 था मजला रोड नं 1 ब्लॉक नं 3. अलअमादी गर्व्हनरिट, देश कवेत) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



पुणे

धडक: महाविद्यालयीन विद्यार्थीनींना मोफत शिक्षण देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय महायुती शासनाने घेतला आहे. मात्र; राज्यातील बहुतांशी शिक्षण संस्थांनी हा नियम धाब्यावर बसविल्याचे उघड झाले होते. त्याच्या तक्रारींचा डोंगर वाढल्यानंतर त्याची थेट राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी गंभीर दखल घेतली असून आज भल्या सकाळी त्यांनी गरवारे महाविद्यालयावर धडक मारली

## गाईच्या दुधात एक रुपयाने वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दूध पावडरला मागणी वाढल्यामुळे शेतकऱ्यांकडून घेण्यात येणाऱ्या दुधाच्या खरेदी दरात बहुतांशी सहकारी दूध संघ आणि खासगी दूध प्रकल्पांनी प्रतिलिटरला एक रुपयाने वाढ केली आहे. त्यामुळे गायीच्या दुधाचा खरेदी दर प्रतिलिटरला आता 32 रुपये झाला आहे. 11 फेब्रुवारीपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाल्याची माहिती दुग्धव्यवसायाच्या वर्तुळातून दिली. उन्हाळ्याची चाहूल लागली असून दैनंदिन दूध संकलनात सध्या किंचित घट येण्यास सुरुवात झाली आहे.

दूध पावडर आणि बटरची निर्यात सुरू असल्यामुळेही दुधाच्या खरेदीसाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. त्यामुळे गायीच्या दूध खरेदी दरवाढीला पाठबळ मिळाल्याचे सांगण्यात आले. गायीच्या दुधाचे खरेदी दर लिटरला 31 रुपयांवर स्थिरावलेले होते.

मात्र, दुधाच्या पावडरला मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे दूध पावडर उत्पादक आणि खासगी डेअऱ्यांकडून दुधाच्या खरेदी दरात वाढ करण्यात आली आहे. दुधाच्या खरेदी दरात वाढत्या स्पर्धेमुळे दूध संकलन टिकवून ठेवण्यासाठी पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघानेही (कात्रज डेअरी) गायीच्या दुधाच्या खरेदी दरात लिटरला एक रुपयांनी वाढ केली आहे.

# शुल्कमाफिसाठी चंद्रकांत दादा ॲक्शन मोडवर

## शिक्षण संस्थांनो सावधान...!: शिक्षण मंत्र्यांची सरप्राईज व्हिजिट !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाविद्यालयीन विद्यार्थीनींना मोफत शिक्षण देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय महायुती शासनाने घेतला आहे. मात्र; राज्यातील बहुतांशी शिक्षण संस्थांनी हा नियम धाब्यावर बसविल्याचे उघड झाले होते. त्याच्या तक्रारींचा डोंगर वाढल्यानंतर त्याची थेट राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी गंभीर दखल घेतली असून आज भल्या सकाळी त्यांनी गरवारे महाविद्यालयावर धडक मारली; त्यांच्या या अचानक भेटीमुळे उपस्थितांना गार हवेतही चांगलाच घाम फुटला. अशाच पध्दतीने राज्यातील किमान शंभर महाविद्यालयांना भेटी देण्याचा इशाराही त्यांनी दिला, त्यांच्या या इराद्यामुळे शिक्षण महर्षींचे धाबे दणाणले आहे. विद्यार्थीनींना या सवलतींचा लाभ मिळालायलाच हवा, त्यात हलगर्जीपणा केल्यास याद राखा कोणाचीही गय केली जाणार नाही असा निर्वाणीचा इशाराच त्यांनी दिला.

महायुती सरकारने घेतलेल्या मुलींच्या फी माफीसाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील ॲक्शन मोडवर आले असून, आज त्यांनी पुण्यातील गरवारे महाविद्यालयास अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे; यासाठी राज्य सरकारने व्यवसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे शूल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ कोर्सेसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूद देखील करण्यात आली होती. सदर निर्णयाच्या अंमलबजावणीतील शैक्षणिक संस्थांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी शासनाने दिशानिर्देश देखील जारी केले होते. तसेच, उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून भरारी पथक नेमून विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल घेतली जात होती.

सदर निर्णयाचा आतापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला, याचा प्रत्यक्ष आढावा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील घेण्यास सुरुवात केली असून, आज त्यांनी गरवारे महाविद्यालयास अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी थेट महाविद्यालयामधील विद्यार्थिनींशी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.

'कमवा आणि शिका' तत्वावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भत्ता वाढविण्याची मागणी काही विद्यार्थ्यांनी यावेळी केली असता; त्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही देखील यावेळी त्यांनी दिली. यावेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्चाव हे देखील उपस्थित होते.



### अजितदादांच्या संस्थेनेही केले होते उल्लघंन

- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार अध्यक्ष असलेल्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खराडी येथे एक महाविद्यालय आहे, या महाविद्यालयात फीसाठी पिळवणूक केली जात असल्याचे दाहक वास्तव माहिती सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांनी उजेडात आणले होते. वारघडे यांनी यासंदर्भात थेट राज्याच्या शिक्षण आयुक्ताकडे दाद मागत या महाविद्यालयाची 'दादागिरी'मोडीत काढली होती. त्याबाबतचे सविस्तर वृत्त दैनिक 'राष्ट्रसंचार'ने प्रकाशित केले होते, आजच्या या कारवाईने चंद्रकांतदादांनी अप्रत्यक्षपणे अजितदादांच्या शिक्षण संस्थेलाही एक प्रकारे इशाराच दिल्याचे बोलले जात आहे.



उच्च शिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने मुलींचे व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षण पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयाची राज्यात अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे, याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. मुलींनी देखील ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयात शासनाने नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून फी माफीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. जेणेकरून मुलींना या निर्णयाचा लाभ घेता येईल. तसेच, विद्यार्थिनींच्या अडचणी समजून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी आणि महाविद्यालय प्रशासन यांची संयुक्त समिती स्थापन करावी"
**— चंद्रकांतदादा पाटील,** उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

### शिक्षणमंत्र्यांनी केल्या या 'उच्च' सूचना

- पैशावाचून मुली शिक्षणापासून वंचित राहू नये
- विद्यार्थीनींना या सवलतीचा लाभ देण्यास पुढाकार घ्यावा
- वरिष्ठांनी अंमलबजावणीला प्राधान्य द्यावे
- विद्यार्थीनींनीही ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयात शासनाने नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा
- विद्यार्थी आणि महाविद्यालयांची संयुक्त समिती स्थापन करावी

# महापालिकेची थकबाकी 'ओव्हरफ्लो'

## पाणीपट्टीची तब्बल ७१४ कोटींची थकबाकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मिळकतकराच्या थकबाकीसाठी थकबाकीदारांचा 'बॅन्डबाजा' वाजवत असलेल्या महापालिका प्रशासनाने जलसंपदा विभागाची तब्बल ७१४ कोटी रुपयांची थकबाकी अडकवली असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे, त्यामुळे ही थकबाकी जमा करा अन्यथा पाणीसाठा कमी करु असा निर्वाणीचा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे.

जलसंपदा विभागाने पुणे शहराला खडकवासला धरणामधून ११.५० टीएमसी कोटा मंजूर केला आहे. मात्र, महापालिका मंजूर कोट्यापेक्षा सुमारे साडेपाच ते आठ टीएमसी पाणी जादा उचलत असल्याचे जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या तरतुदीनुसार अतिरिक्त पाणी वापर केल्यास दंड ठरवण्यात येतो. महापालिकेने २०१६ पासून या नियमबाह्य व मापदंडापेक्षा अतिरिक्त पाणी वापरावर दंडात्मक पाणीपट्टी भरणे बंधनकारक असूनही अद्याप कोणताही दंड जमा केलेला नाही.

तसेच २००५ पासून गेल्या १९ वर्षांत महापालिकेने प्रक्रिया केलेले पाणी जलसंपदा विभागाला दिलेले नाही. महापालिकेने साडेसहा टीएमसी पाण्यावर प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. हे प्रक्रिया केलेले साडेसहा टीएमसी व अतिरिक्त वापरलेले साडेसहा टीएमसी असे १३ टीएमसी पाणी जलसंपदा विभागाला ग्रामीण भागातील सिंचनासाठी आवश्यक आहे. याचाच अर्थ महापालिका दरवर्षी १३ टीएमसी पाणी प्रदूषित करीत असून, जलसंपदा विभागाने गेल्या पाच वर्षांत सातत्याने पाठपुरावा करूनही महापालिकेने दंड भरलेला नाही.

थकबाकी २५ फेब्रुवारीपर्यंत जमा न केल्यास टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठ्यात कपात करण्यात येईल. मंगळवार पेठेतील जलसंपदा विभागाचे कार्यालय दरवर्षी साठ हजार रुपये पाणीपट्टीपोटी भरत असते. ही पाणीपट्टी वाणिज्य प्रकारात मोडत आहे. त्यामुळे शहरात औद्योगिक वापरासाठी पाणी वापरले जात नाही हा महापालिकेचा दावा कुचकामी आहे. थकबाकी जमा केल्यानंतरच धरणांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात घेता येईल."
**— श्वेता कुऱ्हाडे,** कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

खडकवासला धरणातून दिल्या जाणाऱ्या पाणीपट्टीपोटी महापालिकेकडे ७१४ कोटी रुपयांची थकबाकी आहे. ती न मिळाल्याने जलसंपदा विभागाने आता थेट पाणी कपातीचाच इशारा दिला आहे. येत्या २५ फेब्रुवारीपर्यंत थकबाकी जमा न केल्यास त्यानंतर टप्प्याटप्प्याने पुणे शहराचा पाणीपुरवठा कमी करण्यात येईल, असा सज्जड दम जलसंपदा विभागाने महापालिकेला दिला आहे. या संदर्भात खडकवासला प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे यांनी महापालिकेला नोटीस बजावली आहे.

महापालिकेकडे चालू वर्षाची १७३.८५ कोटी रुपयांची पाणीपट्टी थकलेली आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने एकूण ७१४ कोटी ६० लाख रुपयांची थकबाकीची नोटीस गेल्या महिन्यातच बजावली होती. महापालिकेने या नोटिशीनंतर तातडीने २०० कोटी रुपये विभागाकडे जमा करावे, अशी मागणीही त्यात करण्यात आली होती.

# पीएमपी'च्या ८५० चालकांचे प्रशिक्षण पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्रीय सडक परिवहन संस्था (सीआयआरटी) येथे जानेवारी महिन्यापासून हे प्रशिक्षण सुरू आहे. आतापर्यंत ८५० चालकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, पहिल्यांदाच संपूर्ण महिन्यांत 'पीएमपी'चा एकही अपघात झाला नाही, ही सुखद बाब घडली आहे. वाढत्या अपघातांमुळे मागील काही महिन्यांपासून पीएमपीवर टीकेचा भडिमार होत होता. त्याची गंभीर दखल घेत पीएमपी प्रशासन स्व-मालकीच्या चालकांसह ठेकेदारांच्या सर्व चालकांना प्रशिक्षण देणे सुरू केले आहे.

पीएमपीच्या चालकांकडून होणाऱ्या चुकांमुळे दैनंदिन ३ ते ४ अपघात होत होते. त्यामुळे अधिकाऱ्यांपासून चालकांपर्यंत नागरिकांकडून सतत टीका होत होती. त्यामुळे पीएमपीच्या वतीने सर्व चालकांना रस्ते वाहतुकीचे नियम व कायदे, प्रवाशांची सुरक्षितता, बसमधील तांत्रिक बाबी यांसह अन्य मुद्द्यांवर प्रशिक्षण देण्याचे ठरविले होते. त्यानुसार सीआयआरटीकडून चालकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याचा फायदा झाला असून, अपघाताला ब्रेक लागला आहे.

पीएमपीकडे स्वमालकीचे आणि ठेकेदार असे एकूण जवळपास तीन हजार चालक आहेत. या सर्व चालकांना टप्प्याटप्प्याने (५० ची एक बॅच) प्रशिक्षण सुरू आहे. त्यामध्ये बसचालकाची मानसिक स्थिती यासह प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कसे वागावे, कसे बोलावे, कसे राहावे, यासह रस्ते वाहतुकीचे नियम काय, त्याचे कायदे काय, सीएनजी बस, इलेक्ट्रिक बस कशी चालवावी अन्य आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत आहे.


# काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात

## अनन्वय'तर्फे राहुल घोरपडे यांना अनोखी गीत सुमनांजली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात...' देवा घरोटं घरोटं' 'असेन मी नसेन मी;" रोज रात्री आमच्या घरात' नदी काठावर कर्दळीचे बन' आदी रचना सादर करत चतुरस्र संगीतकार राहुल घोरपडे यांना 'अनन्वय' च्या वतीने गीत सुमनांजली वाहण्यात आली.



राहुल घोरपडे हे भावसंगीतकार असूनही त्यांना शास्त्रीय संगीताची उत्तम जाण होती. त्यांनी संगीतबद्ध केलेल्या रचना सोप्या असल्या तरी त्यांची मांडणी अनवट आणि अतिशय प्रभावी असे. त्यांच्या संगीत रचनांचे साधेसोपे कोडे कुणालाच सुटले नाही. शब्दातील भाव ओळखून स्वरातील भाव ते सहजतेने सांभाळत असत. ते जन्मत:च प्रतिभाश्रीमंत संगीतकार होते, असे भावोद्गार संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकारांनी व्यक्त केले.

राहुल घोरपडे यांच्यावर अनेक संगीतकारांचे संस्कार होते. विशेषत: श्रीनिवास खळे आणि पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचा प्रभाव अधिक होता. ते साहित्य-काव्याचे मर्मज्ञ ज्ञानी होते. निरपेक्ष भावनेतून शिकायला मिळणार हा स्वार्थ घेऊन मी अनेकदा त्यांच्या रचना गायलो आहे."
**— पंडित शौनक अभिषेकी**

चतुरस्र संगीतकार राहुल घोरपडे यांना 'अनन्वय' च्या वतीने गीत सुमनांजली वाहण्यात आली. द बॉक्स येथे आयोजित सांगीतिक कार्यक्रमात पंडित रघुनंदन पणशीकर, पंडित शौनक अभिषेकी, प्रसिद्ध गायक रवींद्र साठे, ज्येष्ठ गायिका अनुराधा मराठे यांच्यासह अनुराधा कुबेर, राजीव बर्वे, मनिषा निश्चल, सौरभ दफ्तरदार, मनिषा पवार, मीनल पोंक्षे, कुमार करंदीकर यांचा सहभाग होता. कलाकारांना विजय उपाध्ये, कुमार करंदीकर, केदार परांजपे, आदित्य आपटे, विनित तिकोनकर, निलेश श्रीखंडे यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाची संकल्पना डॉ. माधवी वैद्य यांची होती. राहुल घोरपडे यांच्या संगीताचे चाहते, अनेक गायक, संगीतकार, संगीत संयोजक यांची भावभिजलेली उपस्थिती या कार्यक्रमास लाभली.







संत ज्ञानेश्वर महाराज रचित 'सावळे परब्रह्म' यासह कुसुमाग्रज, कवयित्री बहिणाबाई, आरती प्रभू, शांता शेळके, इंदिरा संत, कवी ग्रेस, दत्ता हलसगीकर, डॉ. राहुल देशपांडे या कवींच्या रचना 'माझ्या मातीचे गायन;" काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात;" माझी माय सरसोती;" देवा घरोटं घरोटं;'असेन मी नसेन मी;" रोज रात्री आमच्या घरात;" झाला सूर्यास्त राणी;" येता जाता तिने छळावे;" देहू आळंदीचे देव;" पंढरपुरीचा निळा;'आलो इथे कशाला?;'अंधार असा घनभारी;' 'किती तुला आठवावे;" नदी काठावर कर्दळीचे बन' आदी रचना सादर करण्यात आल्या.

आठवणींना उजाळा देताना पंडित शौनक अभिषेकी म्हणाले, राहुल घोरपडे यांच्यावर अनेक संगीतकारांचे संस्कार होते. विशेषत: श्रीनिवास खळे आणि पंडित हृदयनाथ मंगेशकर यांचा प्रभाव अधिक होता. ते साहित्य-काव्याचे मर्मज्ञ ज्ञानी होते. निरपेक्ष भावनेतून शिकायला मिळणार हा स्वार्थ घेऊन मी अनेकदा त्यांच्या रचना गायलो आहे.

पंडित रघुनंदन पशणीकर म्हणाले, शब्दांचा योग्य अर्थ ओळखून चाल देणे हा निसर्गाचा चमत्कार राहुल घोरपडे यांना साधला होता. अनुराधा मराठे म्हणाल्या, कविता, गीतांना चाली लावण्यात राहुलचा वेगळाच दृष्टीकोन असायचा. त्याने संगीतबद्ध केलेली गाणी सादर करणे सोपे नसायचे. त्यासाठी खूप तयारी लागायची. शब्दांवर जोर, मिंडचे प्रकार, अवरोही जागा गळ्यावर चढविण्यासाठी सराव करायला लागायचा.

अनन्वय हे राहुल घोरपडे यांच्या सुरांचे मुक्तांगण होते. कवीला अभिप्रेत अर्थ समजून उमजून शब्दोचाराच्या ऱ्हस्व-दीर्घासह काव्य संगीतबद्ध करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. अशा भावना सोनाली श्रीखंडे यांनी मांडल्या.

## At a Glance

### मकोका' कारवाईतील सराईताकडून पिस्तूल जप्त

**पुणे :** महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) केलेल्या कारवाईत जामीन मिळवून कारागृहातून बाहेर पडलेल्या गुंडाकडून गुन्हे शाखेने पिस्तुलासह काडतूस जप्त केले. लोणी काळभोर भागात ही कारवाई करण्यात आली. अनिकेत गुलाब यादव (वय २२, रा. सोपाननगर, कदमवाक वस्ती, लोणी काळभोर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. यादव याच्याविरुद्ध लोणी काळभोर पोलिसांकडू महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये कारवाई केली होती. त्यानंतर यादव येरवडा कारागृहात होता. न्यायालयाकडून त्याने जामीन मिळविला. त्यानंतर तो कारागृहातून बाहेर पडला. यादव याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे पोलीस कर्मचारी बाळासाहेब सकटे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडून देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि काडतूस जप्त करण्यात आले. पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहायक पोलीस निरीक्षक मदन कांबळे, उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, बाळासाहेब सकटे, रमेश मेमाणे, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, ऋषीकेश ताकवणे यांनी ही कारवाई केली. मकोका कारवाईत जामीन मिळालेले सातशे सराइत कारागृहातून बाहेर पडले आहेत. त्यांच्या हालचालीवर नजर ठेवण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. गुन्हे शाखेने जामीन मिळवून बाहेर पडलेल्या गुंडाची यादी तयार केली .

# लाईफलाईनला मिळणार 'दिशा' !

## 'पीएमपीएमएल'च्या ताफ्यात नव्या हजार बसेस, महापालिकांसह 'पीएमआरडीए' उचलणार 'भार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहर, उपनगर आणि जिल्ह्यातील लाखो प्रवाशांची 'लाईफलाईन' असलेल्या 'पीएमपीएमएल'च्या ताफ्यात लवकरच एक हजार नव्या बसेस दाखल होणार आहेत; खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच त्यासंदर्भात दोन्ही महापालिकांसह पीएमआरडीए आणि पीएमपी प्रशासनाला तसे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रशासनाला नवी 'दिशा' मिळणार असून प्रवाशांचा प्रवासही अधिक सुखकर आणि जलदगतीने होणार आहे.

शहरातील सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात एक हजार बस दाखल होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. यातील ५०० बस पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) तर पुणे महापालिका ३०० आणि पिंपरी-चिंचवड महापालिका २०० बस देणार आहेत. यामुळे पीएमपीने प्रवास करणाऱ्यांची सोय होणार आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच पीएमआरडीएची हद्द वाढली आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता सध्या पीएमपीकडे असलेल्या बस कमी पडत आहे. पीएमपीला सहा हजार बसची आवश्यकता आहे. मात्र, पीएमपीकडे केवळ दोन हजार बस उपलब्ध असून, त्यातील काही बस जुन्या झाल्याने दुरुस्तीसाठी जातात. यातील बहुतांश बस या खासगी ठेकेदारांच्या आहेत.

शहराचा वाढत असलेला विस्तार आणि प्रवाशांची वाढत असलेली संख्या लक्षात घेत शहरातील सार्वजनिक वाहूतक व्यवस्था सक्षम करण्यासाठी पीएमपीला नव्याने एक हजार बस दिल्या जातील, अशी घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केली होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत पीएमआरडीए, पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमपीएमएलचे अध्यक्षांची बैठक घेतली. या बैठकीत शहरासाठी तातडीने एक हजार बस खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी ही माहिती दिली.

पीएमपीला दिल्या जाणाऱ्या बसमध्ये ५०० बस या पीएमआरडीए कडून दिल्या जाणार आहेत. तर पुणे महापालिका ३०० आणि पिंपरी-चिंचवड महापालिका २०० बस देणार आहे. एका बसची किंमत ही ४८ लाख रुपयांपर्यंत असून, त्यानुसार यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तयारी या बैठकीत तीनही संस्थांच्या प्रमुखांनी दाखविली आहे. या बस सीएनजीवरील असणार आहेत. पीएमपीला नव्याने बस मिळाल्यानंतर अनेक महत्त्वाच्या मार्गावरील फेऱ्यांमध्ये वाढ होईल. तसेच सध्या ३०० ते ३५० बस सतत नादुरुस्त होत असल्याने त्या ताफ्यातून काढाव्या लागणार आहेत, असेही अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी सांगितले.



### अशी आहे सद्यस्थिती...!

- प्रवाशांची दैनंदिन संख्या - **१२ ते १३ लाख**
- दररोजचे सरासरी उत्पन्न - **दीड ते पावणेदोन कोटी**
- स्वमालकीच्या बसेस- **८००**
- भाडेतत्वावरील बसेस- **१०००**
- आलेक्ट्रा बसेस- **७००**
- मार्गावर धावत असलेल्या बसेस- **२००० ते २१००**
- दररोजचे ब्रेकडाऊनचे प्रमाण- **४० ते ५० टक्के**

### असा मिळणार निधी...!

| संस्थेचे नाव | बसची संख्या | मिळणारा निधी ( कोटीत) |
|---|---|---|
| पीमआरडीए | ५०० | २४० |
| पुणे महापालिका | ३०० | १४४ |
| पिंपरी-चिंचवड | २०० | ९६ |

### संचलन तूट देण्यास 'पीएमआरडीए'चा नकार

- पीएमआरडीएच्या हद्दीत पीएमपी सेवा देत असल्याने पीएमपीला येत असलेल्या संचलानातील तुटीमध्ये पीएमआरडीने देखील हिस्सा उचलावा, अशी मागणी केली जात होती. दोन्ही महापालिकांनी याबाबत पीएमआरडीए कडे प्रस्ताव देखील ठेवला होता. मात्र, संचलनातील तूटीचा हिस्सा देण्यास पीएमआरडीने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांनाच पीएमपीची संचलनातील ७६६ कोटी रुपयांची तूट भरून द्यावी लागणार आहे.






सध्याच्या परिस्थितीत बसेसची संख्या आणि प्रवासी यांचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे सणासुदीच्या आणि यात्रांच्या काळात अक्षरश: आणीबाणीची परिस्थिती निर्माण होत असते. मात्र; आता नव्या बसेस ताफ्यात दाखल झाल्यास हा ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. त्यातून प्रशासनाचे उत्पन्नही निश्चितच वाढणार आहे.

— **दीपा मुधोळ मुंडे, अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालिका पीएमपीएमएल**

मी दररोज पीएमपीच्या बसने प्रवास करत असतो, बस वेळेवर तर कधी मिळतच नसल्याने कामावर पोचण्यास उशीर होत असतो. त्यामुळे लेटलतीफचा शिक्का आमच्या माथी बसला आहे. नव्या बसेसचा माध्यमातून अधिक जलदगतीने होण्यास मदत होणार आहे. मात्र; प्रशासनाने त्याची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवशकता आहे.

— **बाबू शेख, प्रवासी येरवडा**



# सद्गुरु शंकर महाराज समाधी स्थळाच्या खालून मेट्रो मार्ग नको

### शहरातील ३५ गणेशोत्सव मंडळांचे पुणे मेट्रो आणि पालकमंत्र्यांना निवेदन





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वारगेट ते कात्रज हा मेट्रोचा भुयारी मार्ग धनकवडी येथील शंकर महाराज समाधीच्या खालून जात आहे. मेट्रोच्या या मार्गामुळे शंकर महाराजांच्या समाधी स्थळाला धोका पोहोचू शकतो, त्यामुळे हा भुयारी मार्ग थोडा सरकवून घेतल्यास धोका होणार नाही आणि लोकांच्या भावना ही दुखावल्या जाणार नाहीत. असे निवेदन पुण्यातील ३५ गणेशोत्सव मंडळांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पुणे मेट्रो च्या संचालकाना दिले आहे.

अखिल मंडई मंडळ, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, श्री गुरुजी तालीम गणेशोत्सव, श्री तुळशीबाग गणपती, केसरी वाडा सार्वजनिक गणेशोत्सव, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणेशोत्सव मंडळ, लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट, हुतात्मा बाबू गेनू मंडळ ट्रस्ट, पासोड्या विठोबा मंदिर, कै.लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट, साईनाथ मंडळ ट्रस्ट, श्री गजानन मंडळ ट्रस्ट, अकरा मारुती चौक मंडळ, महाराष्ट्र तरुण मंडळ, वीर शिवराज मंडळ, सेवा मित्र मंडळ, अकरा मारुती कोपरा गणेशोत्सव मंडळ, गुरुदत्त मित्र मंडळ, विधायक मित्र मंडळ, श्री हनुमान मंडळ प्रतिष्ठान, जनार्दन पवळे संघ, थोरले बाजीराव मंडळ, तरुण शिव गणेश मित्र मंडळ, राष्ट्रीय साततोटी हौद मंडळ, वीर हनुमान मित्र मंडळ, वैभव मित्र मंडळ, महाराष्ट्र तरुण मंडळ सिटी पोस्ट, फणी आळी तालीम मंडळ इत्यादी मंडळांनी पुढाकार घेतला आहे.

अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात म्हणाले, भूमिगत मेट्रो धनकवडी येथील सद्गुरु शंकर महाराज समाधीच्या खालून जाणार नाही, यासाठी योग्य मार्ग काढावा. पवित्र समाधीखाली भूमिगत मेट्रो ट्रॅक असणे ही धार्मिक आणि भावनिक दोन्ही दृष्टिकोनातून चिंतेची बाब आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो लोक मठात दर्शनासाठी येतात. विकास गरजेचा आहे, परंतु भक्तांच्या भावनांचा आदर देखील करायला हवा.

# मालवाहतूकदार संघटनेचा आज 'आरटीओ'वर मोर्चा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या आठ ते दहा दिवसांपासून परिवहन विभागातील रिक्षा, टॅक्सी, बस आणि ट्रक आदी वाहनांचे फिटनेस सर्टिफिकेटची ऑनलाईन पावती निघत नाही. त्याचा मोटारचालकांना जबरदस्त फटका बसत असून वाहने रस्त्यावर आणता येत नाही. त्याच्या निषेधार्थ आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मालवाहतूकदार संघटनेच्या वतीने उद्या (शनिवारी) प्रादेशिक परिवहन कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे असा इशारा मालवाहतूकदार संघटनेचे अध्यक्ष बाबा शिंदे यांनी दिला आहे.

यासंदर्भात आरटीओ प्रशासन आणि परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना निवेदन देऊनही त्याची दखल घेतली जात नाही असा आरोप करुन शिंदे म्हणाले; गेले आठ-दहा दिवसापासून राज्यातील परिवहन संवर्गातील रिक्षा टॅक्सी बस ट्रक इत्यादी वाहनांचे फिटनेस सर्टिफिकेट पासिंग ऑनलाइन पावती निघत नसल्यामुळे पूर्णतः थांबलेला आहे. यामुळे वाहन चालकांना त्यांचे वाहन रोडवर आणता येत नाही. याचा आर्थिक फटका राज्यातील वाहतूकदारांना बसत असून राज्य सरकारकडे आम्ही मॅन्युअल पावती करून वाहनांच्या पासून करून देण्याबाबत विनंती केली होती.

परंतु याबाबत कोणतीही कारवाई आजपर्यंत झालेली नाही. तसेच आम्ही ज्या वाहनांचे गेल्या दहा दिवसात पासिंग संपले आहे अशा वाहनांना एक महिना मुदतवाढ देण्याबाबत राज्य सरकारला पत्र देण्यात आले आहे परंतु कोणतेही कारवाई सरकारने केलेली नाही याच्या निषेधार्थ आज दुपारी चार वाजता संगम पूल ते वाहतूक घरांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे असा इशाराही शिंदे यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

# विद्यापीठात उंदरांचा उच्छाद

## विद्यार्थी रुग्णालयात

## उपसभापती थेट वसतिगृहात

**पुणे :**पुणे: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सातत्याने काही ना काही वाद प्रवाद होत आहेत. आज विद्यापीठातील वसतिगृहामध्ये उंदरांनी अक्षरशः उच्छाद मांडला गेल्या अनेक दिवसांपासून उंदरांच्या सुळसुळाटाकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे आता परिस्थिती अबाक्याच्या बाहेर गेली आहे असे म्हणत विद्यार्थ्यांनी अक्षरशः टाहो फोडला.

या प्रकारामुळे संवेदनशील मानला जाणाऱ्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी थेट विद्यापीठाकडे कुच करून या सर्व प्रकाराची माहिती घेतली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये गेल्या काही महिन्यांपासून अस्वच्छतेचे प्रमाण वाढल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. वसतिगृह परिसरात उंदरांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून, त्यांच्या वाढत्या संख्येमुळे विद्यार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत वसतिगृहातील एका विद्यार्थ्याला उंदराने चावा घेतल्याने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित ही गंभीर समस्या लक्षात घेता, विद्यापीठ प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात अशा सूचना विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी वारंवार संबंधित प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी यावर ठोस उपाययोजना झालेली नाही. उंदरांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचे नुकसान होत असून, स्वच्छतेच्या अभावामुळे डास आणि इतर कीटकांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे महाराष्ट्रातील अग्रगण्य विद्यापीठांपैकी एक असून, येथे शिक्षण, संशोधन आणि नवकल्पनांसाठी विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. मात्र, अशा प्रकारच्या समस्यांमुळे विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवन आणि अभ्यासावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून द्यावे,

**डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती, विधानपरिषद**

# व्यवस्थापन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावेल

## शेखर सरदेसाई, संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, कायनेको उद्योग समुह यांचा विश्वास



फेबर इंफायनाइट कन्सल्टींगतर्फे आयोजीत 'फेबेक्स २०२५' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे उद्घाटन झाले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वेळेची आणि गुंतवणुकीची बचत करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे येत्या काळात आपण उत्कृष्ट कामगिरी साधू शकतो आणि म्हणूनच व्यवस्थापन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास कायनेको उद्योग समुहाचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर सरदेसाई यांनी आज व्यक्त केला. फेबर इंफायनाइट कन्सल्टींगतर्फे आयोजीत 'फेबेक्स २०२५' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे उद्घाटन करताना झालेल्या बीजभाषणात सरदेसाई बोलत होते.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील आणि महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत हे दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कायनाको उद्योग समुहाचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर सरदेसाई , फेबर इंफायनाइट कन्सल्टींगचे संचालक आकाश बोरसे , फेबर इंफायनाइट कन्सल्टींगचे संचालक जलय पांड्या , एम्बी इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मकरंद अप्पलवार आणि फेबर इंफायनाइट कन्सल्टींगचे संचालक विशाल कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी बोलताना कायनाको उद्योग समुहाचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर सरदेसाई म्हणाले की, एआय मुळे मशिन अधिक हुशार होत असून मनुष्याच्या निर्णय क्षमतेवर मशिन मात करेल की काय अशी शक्यता बळावत आहे. मनुष्यबळाचे श्रम वाचवून एआयमुळे अधिक क्षमतेने आणि अधिक प्रभावी पद्धतीने काम होत आहे.

महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील त्यांच्या दृकश्राव्य संदेशात म्हणाले की, शाश्वत विकासावर विशेष लक्ष केंद्रित करून आयोजित करण्यात आलेली ही राष्ट्रीय परिषद स्वावलंबन, नाविन्यपूर्ण व्यवसाय पद्धती आणि पर्यावरणाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

एम्बी उद्योग समुहाचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक मकरंद अपलवार त्यांच्या मनोगतात म्हणाले ,बदलत्या तंत्रज्ञानाचे व्यवस्थापन क्षेत्रावर होणारे परिणाम लक्षात घेऊन ऑपरेशनल एक्सलन्स, इंडस्ट्री ४.० आणि एन्व्हार्यन्मेन्टल, सोशल अँड गव्हर्नन्स (ESG) प्रॅक्टीसेस या संकल्पना केंद्रस्थानी ठेवून आगामी काळात उद्योगांनी वाटचाल करणे आवश्यक आहे .

यावेळी जागतिक दर्जाचे उद्योगपती आणि व्यवस्थापकांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी 'फ्युचर ऑफ मॅन्युफॅक्चरिंग एक्सलन्सः इंटरसेक्शन ऑफ इंडस्ट्री ४.० अँड ऑपरेशनल एक्सलन्स' आणि 'ऑपरेशनल एक्सलन्स इन द ईएसजी वर्ल्डः मर्जिंग परफॉर्मन्स विथ पर्पज' या विषयावर झालेल्या चर्चासत्रात उद्योग जगतातील अनेक अनुभवी मान्यवरांनी सहभाग नोंदवला.



डिजिटल परिवर्तन आणि शाश्वततेच्या शोधासाठी नवीन पिढीला आवश्यक ज्ञान आणि साधनांनी सुसज्ज करण्याच्या उद्देशाने 'फॅबेक्स २०२५' ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली असून या परिषदेमध्ये तंत्रज्ञानातील प्रगती, शाश्वत जीवन पद्धती आणि ऑपरेशनल उत्कृष्टतेवर प्रकाश टाकण्यात आला, भविष्यात असे प्रयोग सातत्याने होणे अपेक्षित आहे.

— **उदय सामंत, उद्योगमंत्री**

### रील्स स्पर्धेचे पारितोषिक वितरण

- "तिसऱ्या दिवशी दुपारी ३ ते ८ 'डेटा ड्रिव्हन अर्बनायझेशन'वरील चर्चासत्रात सीआरई मॅट्रिक्सचे अभिषेक किरण गुप्ता, जेएलएल इंडियाचे आर्कि. राहुल वैद्य विचार मांडतील. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे माजी व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित 'शहरी वाहतुकीचे आधुनिकीकरण: शहराच्या शाश्वत विकासात पुणे मेट्रोचे योगदान' यावर, तर स्मार्ट सिटी मिशनचे सहसचिव कुणाल कुमार 'स्मार्ट सिटीज मिशन: यश आणि भविष्यातील दिशा' यावर आपले विचार मांडणार आहेत. यावेळी 'रील्स' स्पर्धेचे पारितोषिक वितरण होईल," असे अपूर्वा कुलकर्णी यांनी नमूद केले.
- "दुसऱ्या दिवशी दुपारी २.३० ते ८ या वेळेत 'आर्किटेक्चरल कलात्मक चित्रीकरण' या विषयावर 'द आर्च आर्ट'च्या श्वेता हिंगणे यांची कार्यशाळा
- 'सस्टेनेबल सिटीज अँड डायनॅमिक अर्बन प्लॅनिंग टूल्स'वर निरमा युनिव्हर्सिटीचे संचालक उत्पल कुमार शर्मा यांचे मार्गदर्शन
- 'टाऊन प्लॅनिंग स्कीम्स-इफेक्टिव्ह अर्बन प्लॅनिंग मॉडेल फॉर लिव्हेबल कम्युनिटीज'वर व्हीके ग्रुपचे संचालक विजय साने यांचे सादरीकरण
- 'पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारे सामाजिक उपक्रम' या विषयावरील चर्चासत्रात वेस्टर्न रूट्सचे जयेश परांजपे, अर्बन स्केचर्सच्या गायत्री गोडसे, अमुक तमुकचे शार्दूल कदम, आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या यशोदा जोशी, ऐसी अक्षरे मासिकाचे प्रकाशक समीर बेलवलकर सहभागी होणार आहेत.

# पुणेकर अनुभवणार आकर्षक, नाविन्यपूर्ण व वास्तुकलेच्या डिझाईन्स

### चर्चासत्र

'बिल्डिंग द सिटी ऑफ टुमारो' या विषयावरील चर्चासत्रात 'क्रेडाई'चे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, सर जेजे कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य राजीव मिश्रा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सच्या पुणे चॅप्टरचे चेअरमन विकास अचलकर आपले विचार मांडणार आहेत. यावेळी 'लंडन ऑलिम्पिक पार्क' हा माहितीपट दाखवण्यात येणार आहे,"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** :आर्किटेक्चर, एन्व्हायर्नमेंट, इंटेरियर डिझाईन, टाऊन प्लॅनिंग व अर्बन डिझाईन क्षेत्रात कार्यरत पुण्यातील व्हीके ग्रुपच्या वतीने ५१ व्या वर्षपूर्तीनिमित्त 'व्हीकलेक्टिव्ह-बिल्डिंग द सिटी वि कॉल होम' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. गेल्या ५० वर्षांतील आकर्षक, नाविन्यपूर्ण व वास्तुकलेच्या डिझाईन्स व प्रकल्पाच्या संग्रहाचे प्रदर्शन पुणेकरांना अनुभवता येणार आहे. दि. २१, २२, २३ फेब्रुवारी २०२५ या दिवशी हे प्रदर्शन पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र, घोले रोड पुणे येथे सर्व पुणेकरांसाठी विनामूल्ये खुले असणार आहे, अशी माहिती व्हीके ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आर्कि. हृषीकेश कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर 'पुणे आणि शहरीकरण' याविषयी अनेक तज्ज्ञ मान्यवरांच्या चर्चासत्र, कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

याप्रसंगी व्हीके ग्रुपचे संस्थापक आर्कि. विश्वास कुलकर्णी, संचालिका आर्कि. अनघा पुरोहित-परांजपे, संचालिका अपूर्वा कुलकर्णी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या प्रदर्शनाला अधिकाधिक पुणेकरांनी, विद्यार्थ्यांनी, युवा व्यावसायिकांनी भेट देऊन वास्तुकलेचा आविष्कार अनुभवावा, अशी विनंती संयोजकांनी केली आहे.



### व्हीके ग्रुपच्या वतीने 'व्हीकलेक्टिव्ह-बिल्डिंग द सिटी वि कॉल होम' तीन दिवसीय प्रदर्शन

"व्हीके ग्रुपने आजवर दगडूशेठ गणपती मंदिरापासून ते सौदी अरेबियातील 'द लाईन' मेट्रोसिटी, लोणावळ्यातील ग्रीन बटरफ्लाय हिलस्टेशनपासून नाशिकमधील ग्रेप कंट्री रिसॉर्ट आणि पुण्यासह देशविदेशात अनेक टाऊनशिप्स, सरकारी प्रकल्पाच्या युनिक डिझाईन्स साकारल्या आहेत. या सर्व डिझाईन्स या प्रदर्शनात पाहता येणार आहेत. या प्रदर्शनाचे उद्घाटन येत्या शुक्रवारी (दि. २१) दुपारी ३ वाजता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहेत.

— **आर्कि. हृषीकेश कुलकर्णी, आर्किटेक्ट**

### 'लीडर्स ऑफ चेंज' सन्मान

- "उद्घाटन सोहळ्यावेळी पुण्याचे शहरीकरण व विकासाचे विविध पैलू यामध्ये महत्वाचे योगदान देणाऱ्या संस्थांना 'लीडर्स ऑफ चेंज' म्हणून सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये पुण्यातील मॉडेल समजले जाणारे मगरपट्टा सिटी कॉर्पोरेशनचे अध्यक्ष सतीश मगर, १२५ हुन अधिक वर्षांचा शैक्षणिक वारसा असलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, पुण्यातील प्रसिद्ध पीएनजी ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ, पुण्यातील सांस्कृतिक प्रतीक सवाई गंधर्व या वार्षिक उत्सवाचे संचालक मुकुंद संगोराम यांना निमंत्रित केले आहे.

» Selected

## मावळ तालुक्यात जीबीएसचा रुग्ण नाही; काळजी घेण्याचे आवाहन




**वडगाव मावळ :** मावळ तालुक्यात गुइलेन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) आजाराचे रुग्ण आढळून आलेले नाहीत. मात्र, प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शॅरन सोनवणे यांनी केले आहे. पुणे जिल्ह्यात जीबीएसचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. त्या अनुषंगाने मावळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कुलदीप प्रधान व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शॅरन सोनवणे यांनी मावळ तालुक्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना पत्र पाठवून गावात जनजागृती करून उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जीबीएसबाबत अफवा पसरविणे टाळावे आणि आरोग्य अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या व्यक्तीला जीबीएसची लक्षणे आढळली, तर ताबडतोब नजीकच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन मावळ तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सोनावणे यांनी केले आहे.

# शूट आऊट @ मावळ

## संत भूमीत गोळीबाराचा थरार !




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहू रोड :** पुणे जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. कोयता गँगचा धुमाकूळ सुरू असतांना खून दरोडे आणि चोरीच्या घटना देखील वाढल्या आहेत. संत नगरी असलेल्या देहू नगरीत देखील गुन्हेगारी वाढली असून मध्यरात्री गोळीबाराची घटना घडली आहे.

मावळच्या देहूरोडमधील ही घटना अंगावर शहारे आणणारी आहे. वाढदिवसाच्या पार्टीच्या वेळी एका व्यक्तीने अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारामध्ये एकाचा मृत्यू झाला तर दोघे जण जखमी झाले आहेत. देहूरोडच्या गांधीनगरमध्ये ही घटना घडली आहे. सर्वजण वाढदिवसाच्या पार्टीमध्ये एन्जॉय करत होते त्याचवेळी अचानक गोळीबार करण्यात आला. या घटनेमुळे मावळमध्ये खळबळ उडाली आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जुन्या भांडणाच्या वादातून हा गोळीबार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

### आनंद हवा; दहशत नको

● वाढदिवस पार्टी ही खरेतर आपली संस्कृती नाही . आपल्या देशाची संस्कृती मुळातच उत्सवप्रिय आहे. किती ते सण! वेगवेगळ्या धर्मांचे आणि जाती पंथांचे. सर्व सण उत्साहाने साजरे होतात. आणि मग भरपूर सुट्ट्या पण आल्याच साजरे करायला. एवढे सण असताना का माहीत नाही वाढदिवस साजरे करणे हा प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहे. पण या पार्ट्या आनंदोत्सव साजरा करण्यापेक्षा विपरीत काही प्रकार घडण्याकडे वळण घेत आहेत. जे समाजासाठी गंभीर आहे.

## जीबीएस अफवा टाळा व अधिकाऱ्यांना सहकार्य करा




### यासाठी या करा उपाययोजना...

- पाणी उकळून प्यावे.
- भाज्या आणि फळे पूर्णपणे धुऊन घ्यावीत.
- कच्चे किंवा कमी शिजलेले अन्न, खाद्यपदार्थ टाळावे.
- खाण्यापूर्वी आणि स्वच्छतागृह वापरल्यानंतर साबण व पाण्याने हात धुवावा.

## कुदळवाडीत अनधिकृत पत्राशेडवर कारवाईचा धडाका सुरूच



**पिंपरी :** चिखली, कुदळवाडी भागातील अनधिकृत बांधकामे व पत्राशेडवर महापालिकेकडून कारवाई सुरूच आहे. अतिक्रमणविरोधी कारवाईत बुधवारी (दि.12) ९३ एकर परिसरातील ५२८ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड पाडण्यात आली. गेल्या ५ दिवसांपासून सुरू असलेल्या या कारवाईत एकूण ४६५ एकर भाग अतिक्रमणमुक्त करण्यात आला आहे.

अतिक्रमणविरोधी कारवाई शनिवारी (दि.8) सुरू करण्यात आली होती. ती अद्याप कायम आहे. भंगार दुकाने, गोदामे, कारखाने आणि इतर अनधिकृत बांधकामे व पत्राशेड हटविण्याची मोहीम महापालिकेकडून सुरू आहे. कारवाईत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपायुक्त मनोज लोणकर, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, महेश वाघमोडे, अजिंक्य येळे, शीतल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि कर्मचारी सहभागी झाले. पोलिस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या नियंत्रणाखाली पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला.

महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडून कुदळवाडी येथे डीपी आरक्षण जागेतील अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत. यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.

## अतिक्रमण कारवाई; की नुसताच ढोंगीपणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहूगाव :** कॅन्टोमेंट बोर्डाच्या अतिक्रमण विरोधी कारवाईचा प्रश्न वारंवार ऐरणीवर येत आहे. रस्त्यावरच बेशिस्तपणे भाजीपाला विक्रीच्या लागणाऱ्या हातगाड्या, दुकानांच्या समोरील रस्त्यावर झेलेले अतिक्रमण याविषयी भाजी मंडईतील गाळेधरकांनी कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या. परंतु, त्याकडे बोर्डाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने भाजी मंडईतील गाळेधारक संतप्त झाले आहेत. बोर्डाकडून अतिक्रमण विरोधी केलेली कारवाई म्हणजे दिखावा असल्याची प्रतिक्रिया गाळेधारक व्यक्त करू लागले आहेत.

देहूरोड मेनबाजार पेठेतील भाजी मंडईलगत रस्त्यावरच पथारीवाले, हातगाड्यांचे अतिक्रमण होत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. त्यामुळे पादचारी, वाहनचालक यांना प्रवास करणे कठीण होत आहे. त्यामुळे संबंधित अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



### विक्रेत्यांवर कारवाई हवी

● हातगाड्या व पथारीवाले दररोज रात्री हातगाड्या बंद केल्यानंतर भाजीपाल्याचा कचरा रस्त्यावरच टाकून देतात. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. दररोज सकाळी आणि संध्याकाळी रस्त्यावर कचरा पडलेला दिसत आहे. त्यामुळे संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

### गाळेधारकांचा इशारा

● भाजी मंडईतील गाळेधारक प्रतिमहिना दीड हजार रुपये बोर्ड प्रशासनाला भाडे देत आहेत. या भागात अतिक्रमणधारकांविरोधात वारंवार लेखी तक्रारी केल्या असूनही बोर्ड प्रशासनने याची दखल घेतलेली नाही. त्यामुळे संतप्त गाळेधारक भाजी मंडई बंद ठेवून रस्त्यांवर उतरून रास्तारोको आंदोलन करणार आहेत.

## सांगवीत २१ फेब्रुवारी पासून ‘पवनाथडी’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना उत्तम बाजारपेठ उपलब्ध व्हावी; विपणन, विक्री कौशल्य विकसित व्हावेत, हा महापालिकेचा उद्देश आहे. त्यासाठी सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावर २१ ते २४ फेब्रुवारी दरम्यान पवनाथडी जत्रा आयोजित केली आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली.



पवनाथडी जत्रेच्या नियोजनासाठी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. पवनाथडी जत्रेत खाद्य पदार्थ, खेळणी, वस्तूंचे प्रदर्शन यासह विविध उपक्रमाची माहिती देणारे बचत गटांचे स्टॉल्स असतील. समाज विकास विभागामार्फत बचत गटांना विविध माध्यमातून संपर्क साधून अर्ज मागविण्यात आले आहेत. या अर्जांच्या संख्येचा आणि प्रत्यक्ष सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावरील जागेचा विचार करून स्टॉल्सधारकांचे योग्य पद्धतीने नियोजन करावे, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिल्या.

## जिल्ह्यात २१ फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मावळ:** पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी २१ फेब्रुवारी २०२५ च्या रात्री १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.



या आदेशानुसार कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाच्या चित्राचे

सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, अविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे, कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) विरुद्ध वर्तन करणे, कलम ३७ चे पोटकलम (३) अन्वये पाचपेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे तसेच पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यासदेखील प्रतिबंध करण्यात आला आहे.

## न्यू पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**आकुर्डी :** आकुर्डी चिंचवड एज्युकेशन सोसायटीच्या न्यू पुणे पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन प्राधिकरण मधील ग.दि. माडगूळकर नाट्यगृह येथे उत्साहात झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन जी.के.गुरुकुलचे संचालक ज्योती जयस्वानी यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेहसंमेलनात पहिल्या दिवशी पाचवी ते नववीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमांमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ विविध स्पर्धांमध्ये नावीन्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. स्नेहसंमेलनात दुसऱ्या दिवशी युकेजी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पिंपरी चिंचवड महापालिका उपायुक्त नीलेश भदाणे, संस्थेचे सचिव प्रदीप खंदारे, विश्वस्त अमृता खंदारे, स्कूलचे प्राचार्य आदींसह शिक्षक, पालक उपस्थित होते.

## शिवजयंतीनिमित्त आजपासून प्रबोधन पर्व



**पिंपरी :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त महापालिकेने शनिवारपासून (ता. १५) बुधवारपर्यंत (ता. १९) शहरातील वेगवेगळ्या पाच ठिकाणी ‘छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व’ आयोजित केले आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. विचार प्रबोधन पर्वात ‘शिवशंभू शौर्यगाथा’ महानाट्यासह ‘शाहिरीतून शिवदर्शन’, ‘सन्मान शिवरायांचा- रंग शाहिरी कलेचा’, ‘काव्यमय समाज प्रबोधन’, ‘व्याख्याने’, ‘ढोल पथक वादन’, ‘छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शाहिरी’, ‘जागर शिवचरित्राचा’ यांसह शालेय विद्यार्थ्यांच्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर आधारित निबंध, चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा, रक्तदान शिबिर अशा कार्यक्रमांचा समावेश आहे.

## रावेत ते तळेगाव दाभाडे बीआरटी मार्ग बांधण्याचे नियोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रावेत :** पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्याच्या वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पुढील 30 वर्षांसाठीच्या एकात्मिक वाहतूक आराखडा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे. दरम्यान 20,550 चौरस मीटर एवढ्या क्षेत्रासाठी हा आराखडा तयार करण्यात आला असून, पुढील 30 वर्षांत पीएमआरडीएच्या हद्दीत सहा नवीन बीआरटी मार्गचे जाळे नियोजित आहे.

यामध्ये रावेत ते राजगुरूनगर, गवळी माथा चौक ते शेवाळेवाडी, रावेत ते तळेगाव दाभाडे, चांदणी चौक ते हिंजवडी या 117 किमी मार्गाबरोबर लोणी काळभोर ते केडगाव, भूमकर चौक ते चिंचवड चौक या 46 किमी मार्गाचा समावेश आहे. या सहा नवीन बीआरटी मार्गामुळे पीएमआरडीएच्या हद्दीत वाहतुकीचा वेग वाढेल, असा निष्कर्ष काढण्यात आले आहे.



मात्र, सध्याची महामार्गाची अवस्था पाहता कोणत्याही ठिकाणी मुबलक जागा नाही. त्यामुळे आहे त्या मार्गावर रस्ता अरुंद पडत असून, वाहतूककोंडी होत आहे. त्यामध्ये आता बीआरटी बांधले, तर पुन्हा रस्ते अरुंद होऊन वाहतूक सुलभ न होता, कोंडीची शक्यता जास्त आहे.

### हे आहेत प्रस्तावित बीआरटी मार्ग

1. रावेत ते राजगुरूनगर
2. गवळी माथा चौक ते शेवाळेवाडी
3. रावेत ते तळेगाव दाभाडे
4. चांदणी चौक ते हिंजवडी
5. लोणी काळभोर ते केडगाव
6. भूमकर चौक ते चिंचवड चौक

**सध्याची बीआरटी संख्या**
**एकूण बीआरटी मार्ग – आठ**
**धावणाऱ्या बस – एक हजार**
**प्रवासी संख्या – सात लाख**

## पवना कृषक सेवाची निवडणूक स्थगित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव मावळ :** पवन मावळातील पवना कृषक सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुकीमधील एका उमेदवाराचा आकस्मिक मृत्यू झाल्याने २३ फेब्रुवारी रोजी होणारी संस्थेची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर आता संस्थेची निवडणूक प्रक्रिया पुन्हा राबविली जाणार आहे.

पवनानगर येथील पवना कृषक सेवा सहकारी संस्थेची निवडणूक येत्या २३ फेब्रुवारी रोजी होणार होती. अर्ज माघारीच्या प्रक्रियेनंतर संस्थेच्या एकूण १३ जागांसाठी ३२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले होते. त्यात सर्वसाधारण खातेदार, कर्जदार प्रतिनिधींच्या आठ जागांसाठी सर्वाधिक २१, महिला प्रतिनिधींच्या दोन जागांसाठी चार, अनुसूचित जाती व जमातीच्या



एका जागेसाठी दोन, मागास वर्ग प्रतिनिधीच्या एका जागेसाठी तीन, भटक्या जाती जमाती/ विशेष मागास प्रवर्गाच्या एका जागेसाठी दोन उमेदवारांचा समावेश होता. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटपही करण्यात आले होते. परंतु त्यातील सर्वसाधारण खातेदार मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या रमेश गणपत माळवदकर या उमेदवाराचे बुधवारी (ता.१२) आकस्मिक निधन झाले. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी आर.के. निखारे यांनी निवडणूक प्रक्रियेतील तरतुदीनुसार २३ तारखेला होणारी ही निवडणूक स्थगित केली आहे. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार निवडणुकीची नवीन तारीख घोषित करून निवडणुकीच्या संदर्भातील सर्व कामकाजास नव्याने प्रारंभ करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

❝ निवडणुकीसाठी अर्ज दाखल केलेल्या इतर सर्व उमेदवारांचे अर्ज कायम राहतील. त्यांना नव्याने अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्यांनी या निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याची नोटीस दिली असेल. त्यांना पुन्हा उमेदवारी अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच सध्या जे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत त्यांना आता नवीन प्रक्रियेत अर्ज मागे घेता येणार नाहीत.

**- आर. के. निखारे,** निवडणूक निर्णय अधिकारी

## पेटत्या ट्रकचा सिनेस्टाईल थरार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** मुंबई पुणे महामार्गावरून उर्से येथून निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथे जाणाऱ्या केबलसाठी लागणाऱ्या लाकडी ड्रमने भरलेले एका मालवाहू ट्रकला गुरुवारी (दि.13 ) सायंकाळी साडेसातच्या सुमारास आग लागली. चालकाने सावधगिरी बाळगत देहूरोड पोलीस ठाण्यामध्ये ट्रक नेला, पोलिसांची लागलीच तेथील पाण्याने ट्रकची आग विझवली. यामुळे मोठी दुर्घटना टळली.

आग थोडक्यात असताना गाडीतून धूर निघताना ट्रकच्या पाठीमागे असणारे दुचाकीस्वार यांनी चालकाला सावध केले. देहूरोड पोलीस ठाण्याजवळील असलेले सेंट्रल चौकात सिग्नल मुळे गर्दी होती. गर्दी बाजूला सारत दुचाकीस्वाराने जवळ असणाऱ्या पोलीस ठाण्यातच पेटलेले वाहन घेण्यास सांगितले.

गंभीर बाब म्हणजे यादरम्यान सुमारे एक तास उलटून गेल्या नंतरही कॅन्टोन्मेंट बोर्ड अथवा इतर कोणतेही अग्निशामक वाहन आले नव्हते.

### सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

● पेटलेले वाहन पाहून पोलिसांची धावपळ सुरू झाली. वरीष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे यांच्या आदेशान्वये उपस्थित असणाऱ्या सर्वच पोलिसांच्या मदतीने पाणी मारण्यात आली पंधरा मिनिटातच आग आटोक्यात आणण्यात पोलिसांना यश आले. मात्र एक तास उलटून गेल्यानंतरही कॅन्टोन्मेंट बोर्डाची अग्निशमन दल पोहोचलेच नसल्याने सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## जीवनाला कलाटणी देणाऱ्या परीक्षेत-कॉपीची कूप्रथा

**कॉपीमुक्त अभियान महत्वाचे .. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्याकडे फेब्रुवारी मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात.

बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी रोजी सुरु झाली असून ११ मार्च दरम्यान संपणार आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील



मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी बारावीची परीक्षा देणार आहेत.

ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले. मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला मात्र विद्यार्थी पंतप्रधानांचा हा संदेश कितपत अंमलात आणतील याबाबत शंकाच आहे.

कारण कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहावी बारावीच्या परीक्षेत तर कॉपीचा सुळसुळाट झालेला दिसून येतो.

### संपादकीय विशेष

# द्विपक्षीय राजकारण

**दिल्लीची निवडणूक हरियाणा आणि महाराष्ट्रापेक्षा खूपच गुंतागुंतीची होती. गेल्या तीन लोकसभा निवडणुकींमध्ये भाजपने दिल्लीत सातही जागा जिंकल्या होत्या; परंतु विधानसभा निवडणुकीत जनता भाजपला नाकारत होती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि 'आप' एकत्र येऊनही भाजपला शह देऊ शकले नाहीत. हरियाणाच्या निवडणुकीत 'आप' आणि काँग्रेसचे सूत जमले नाही. हरियाणामध्ये 'आप'ची जी परिस्थिती झाली, तीच दिल्लीमध्ये काँग्रेसची झाली. गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाचा झाडू कमळ साफ करत होता; परंतु आता मात्र कमळाने झाडू साफ केला आहे. भाजपला केवळ 'आप'हाच पर्याय आहे, असे चित्र तयार करण्यात येत होते. काँग्रेससह अन्य राजकीय पक्षांना 'आप'कस्पटासमान मानत होता. अखेर भाजपने दिल्लीच्या निवडणुकीत 'आप'चा तोरा उतरवला.**

दिल्लीत आम आदमी पक्षाच्या पराभवानंतर विरोधकांना पुन्हा एकदा भाजपला एकट्याने हरवणे अशक्य आहे, असे वाटू शकते. त्यामुळे पुन्हा एकदा 'इंडिया' आघाडीला बळकटी देण्याचे प्रयत्न सुरू होऊ शकतात. जे प्रादेशिक पक्ष काँग्रेसला कमकुवत करतात आणि काँग्रेसचा दुबळेपणा हाच ज्यांच्या वाढीचा मार्ग आहे, त्यांना रोखण्याची व्यूहनीती आता काँग्रेस आखत आहे. प्रसंगी भाजप जिंकला, तरी चालेल; परंतु प्रादेशिक पक्षांनी कुरघोडी करू नये, असे त्याचे धोरण दिसते. भाजपला नंतर शह देता येईल आणि भाजप-काँग्रेस अशी लढत होईल, असे राजकीय चित्र तयार करता येईल का, याचा काँग्रेस आता विचार करण्याची शक्यता आहे. दिल्ली हातून गेल्यानंतर 'आप'ला आता पंजाबमध्येही आव्हान मिळू शकते. काँग्रेसला दुबळे करून भाजपला पर्याय ठरण्याचा त्याचा मार्ग आता खडतर असेल. प्रादेशिक पक्षांवर मात करण्यासाठी काही ठिकाणी काँग्रेस मजबूत झाली तरी चालेल, अशी भाजपचीही इच्छा आहे.

आम आदमी पक्षाच्या दिल्लीतील पराभवाने पंजाबसारख्या राज्यामध्ये काँग्रेसला पुन्हा एकदा मजबूत होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. दलित आणि मुस्लिमांची काही मते मिळवण्यात यशस्वी झाल्यास भविष्यात मागासवर्गीयांची मतेही काँग्रेसकडे जाऊ शकतात. अशा प्रकारे, काँग्रेसच्या बळकटीकरणामुळे अनेक प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते.

उत्तर प्रदेशामध्ये समाजवादी पक्ष आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलासाठीही धोका वाढेल. काँग्रेस येथे मजबूत झाली तरी भाजपला आव्हान देण्याच्या स्थितीमध्ये असणार नाही. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस पुन्हा सत्तेत परतले; पण झारखंडमधील विजयाचे श्रेय झारखंड मुक्ती मोर्चाच्या रणनीतीला देण्यात आले. काही विधानसभा निवडणुकींमध्ये पराभव झाल्यानंतर मध्यंतरी काँग्रेसने दिल्लीत आम आदमी पक्षासोबत युती करण्याचा प्रयत्न केला; परंतु आम आदमी पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. 'इंडिया' आघाडीच्या मित्रपक्षांनी काँग्रेसऐवजी 'आप'चा प्रचार केला. शेवटी काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढवल्या आणि आम आदमी पक्ष दिल्लीत सत्तेबाहेर पडला. दिल्लीच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव अखिल भारतीय आघाडीत काँग्रेसची स्थिती मजबूत करू शकतो. 'इंडिया' आघाडीत समाविष्ट असलेले समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दलासारखे प्रादेशिक पक्ष आपल्या राज्यांमध्ये काँग्रेसची स्थिती मजबूत होऊ देऊ इच्छित नाहीत.

बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि झारखंडसारख्या राज्यांमध्ये काँग्रेस मजबूत होत चालल्याने प्रादेशिक पक्षांना फटका सहन करावा लागू शकतो. कारण काँग्रेसचा मुख्य मतदार मिळवून प्रादेशिक पक्ष अधिक मजबूत झाले आहेत. ही भीती लक्षात घेऊन आम आदमी पक्षाने दिल्लीमध्ये काँग्रेससोबत युती न करण्याचा निर्णय घेतला आणि याचा फटका आम आदमी पक्षाला सहन करावा लागला. दोन्ही पक्षांनी दिल्लीमध्ये एकत्र निवडणूक लढवली असती तर निकाल वेगळा असता. दिल्लीतील आम आदमी पक्षाचा पराभव हा प्रादेशिक पक्षांसाठी मोठा धक्का आहे. आता काँग्रेस हे सांगण्याचा प्रयत्न करेल की, त्यांच्या पाठिंब्याशिवाय प्रादेशिक पक्ष राज्यांमध्ये निवडणुका जिंकू शकत नाहीत. काँग्रेस एकट्याने निवडणुका लढवून सत्ता काबीज करू शकत नसली, तरी प्रादेशिक पक्षांचे समीकरण निश्चितच बिघडवू शकते. दिल्ली निवडणुकीच्या निकालानंतर 'इंडिया' आघाडीबद्दल उपस्थित केले जाणारे प्रश्न कमकुवत होऊ शकतात किंवा प्रादेशिक पक्ष एकत्र येऊन काँग्रेसला कमकुवत करण्याचा प्रयत्न करू शकतात आणि दिल्लीमध्ये भाजपला सत्ता मिळवण्यात यश आल्याबद्दल काँग्रेस जबाबदार असल्याचा आरोप करू शकतात.

आजघडीला भारतीय राजकारणामध्ये भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस हे दोनच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पक्ष आहेत. दोघांचे काही मित्रपक्ष असले, तरी दोघांचीही भूमिका समान आहे. भाजप आणि काँग्रेस या दोनही राजकीय पक्षांना आपापले राजकीय अवकाश व्यापायचे असेल, तर मित्रपक्षांचे राजकीय अवकाश काबीज करावे लागेल. या दोन्ही राजकीय पक्षांना आता परस्परांचे राजकीय अवकाश व्यापण्याची संधी फारच कमी आहे.

अशा परिस्थितीत भाजपवर मित्रपक्षांच्या खच्चीकरणाची टीका होत असली, तरी या टीकेकडे दुर्लक्ष करत जागा वाढवण्यावर त्याचा भर असतो. आता काँग्रेसलाही तसेच करावे असे वाटायला लागले आहे. मित्रपक्षांना जास्त जागा सोडल्याने आपल्याला यश कमी मिळते; आणि मतांचा टक्का घसरतो, असे जाणवते. भाजप काँग्रेसमुक्त भारताची भाषा करत असला, तरी त्यालाही काही ठिकाणी प्रादेशिक पक्षांच्या खच्चीकरणासाठी काँग्रेसची आवश्यकता लागते. दिल्लीचे उदाहरण त्यासाठी बोलके आहे. प्रादेशिक पक्षाची ताकद संपली, की देश खऱ्या अर्थाने द्विपक्षीय व्यवस्थेकडे वाटचाल करू शकेल. हे लगेच होईल, असे नाही; परंतु दिल्ली, हरियाणाच्या निवडणुकीच्या निकालाकडे त्या दृष्टीने पाहता येईल. नजिकच्या भविष्यात काँग्रेस पक्ष प्रादेशिक पक्षांच्या समतुल्य ताकद मिळवू शकला तरी देश द्विपक्षीय राजकारणाकडे जाऊ शकतो.

# सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान : मधुबाला

**बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे वर्णन केले जाते ती म्हणजे मधुबाला... यंदा त्यांची ९२ वि जयंती साजरी करण्यात आली . १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्याबाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबालावर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले.**

बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५६ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



# थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज

आध्यात्म

श्याम ठाणेदार
पुणे

आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती



आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब - श्रीमंत, स्त्री - पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!




### राशीभविष्य

- **मेष** : नोकरी–व्यवसायात अडचणी येतील. ऐकीव माहितीवर विश्वास ठेवू नका. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृषभ** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. आर्थिक प्राप्तीत वाढ होईल. प्रयत्नात सातत्य राखावं.
- **मिथुन** : ठरलेल्या मार्गाने वाटचाल करा. अनपेक्षित खर्चाचं प्रमाण वाढेल. वाद–विवाद टाळायला हवा.
- **कर्क** : जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होईल. प्रलोभनांपूसन दूर रहायला हवं. कामात मन एकाग्र करायला हवं.
- **सिंह** : कार्यक्षेत्रात ठरलेलं उद्दिष्ट पूर्ण करू शकाल. आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. विचारानं रहावं.
- **कन्या** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. स्थावर बाबतीत समाधान लाभेल. स्थावर प्रश्न मार्गी लागतील.
- **तूळ** : सहकाऱ्याच्या सूचना लक्षात घ्या. आर्थिक व्यवहारात हानी संभवते. प्रवासाचे बेत लांबणीवर टाका.
- **वृश्चिक** : अतिआत्मविश्वास बाळगू नका. इतरांशी सामंजस्य लाभदायक ठरेल. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **धनु** : नोकरीत कामाचा ताण राहील. ठरलेल्या भेटी लांबणीवर पडतील. वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल.
- **मकर** : बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावं. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. अचानक धनलाभाचे योग आहेत.
- **कुंभ** : ठरल्यानुसार महत्त्वाची कामं पार पडतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. समाधानी रहाल.
- **मीन** : नोकरीत बदली–बढतीच्या प्रयत्नांना चालना मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल. चिंता नसावी.

### सल्ला मोलाचा — स्टाईल, जरा हट के

सध्या लग्नसराई सुरू आहे. लग्न म्हणजे धम्माल, मजा, मस्ती... तेव्हा या सीझनमध्ये फॅशनेबल राहण्याची संधी साधा. त्यामुळे तुम्हीही देसी ड्यूड बनू शकता. धोतीसोबत काही एक्सपिरिमेंट्स करता येतील. चला तर, धोती कॅरी करण्याच्या प्रकारांविषयी जाणून घेऊ या...

* वेलवेट ट्यूक्सेडो आणि धोती तुम्हाला कूल लूक देईल.
* दोस्तांनो, तुम्ही एका परफ्युमची जाहिरात पाहिली असेल. त्यातला नायक सूटखाली चक्क लुंगी घालतो. तसं काहीसं तुम्हाला करता येईल. ब्लेझर, वेस्टकोट, टाय आणि त्याखाली धोती, कसा वाटेल हा लूक?
* एखाद्या कुर्त्यावर मस्त शेरवानी कॅरी करा. त्यासोबत धोती घाला.
* बंदगळा आणि धोती हे सुद्धा अनोखं कॉम्बिनेशन ठरतं.
* शॉर्ट शेरवानी आणि धोती हे सुद्धा अनोखं कॉम्बिनेशन आहे.

### १५ फेब्रुवारी — दिनविशेष


- १८६९ : प्रसिद्ध उर्दू कवी आणि शायर मिर्झा गालिब यांचं निधन.
- १९९५ : ब्रेल लिपीतील पहिलं वृत्तपत्र 'केसरी' या संस्थेने प्रकाशित झालं.
- २०१३ : लढवय्या कामगार नेता, कट्टर शिवसैनिक, माजी विधानसभा अध्यक्ष दत्ताजी नलावडे यांचं निधन.
- २०१४ : दिल्लीत राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.
- २०१८ : नीरव मोदी याच्या १७ मालमत्तांवर ईडीचे छापे. नीरव मोदी फरार. ईडीकडून त्याच्या ५१०० कोटींची संपत्ती जप्त.

### महत्त्वपूर्ण काही... — की बोर्डवरील उंचवटा

तुम्ही कधी लॅपटॉप आणि कॉम्प्युटरच्या की बोर्डवर नजर टाकली आहे का? स्पर्श केला आहे का? की बोर्डवरच्या एफ आणि जे या बटनांच्या खालच्या भागात रेषेसारखा एक उंचवटा असतो. तो कशासाठी असतो हे तुम्हाला माहीत आहे का? आपण टायपिंगसाठी की बोर्डचा वापर करतो. या उंचवट्यांमुळे तुमची बोटं की बोर्डवरून अगदी सहज फिरू शकतात. बोटांना आधार मिळतो आणि की बोर्डवर नजर न फिरवताही तुम्ही टायपिंग करू शकता. या रेषांमुळे बोटांना त्रास होत नाही. व्यावसायिक टायपिंग करणाऱ्यांच्या सोयीसाठी ही रचना करण्यात आली आहे. डाव्या हाताचं मधलं बोट एफ बटनावर असतं तेव्हा इतर बोटं ए, एस आणि डी या बटनांवर असतात. दुसरीकडे उजव्या हाताचं मधलं बोट जे या कीवर असतं तेव्हा इतर बोटं के, एल आणि कोलन या चिन्हांवर असतात. त्याचवेळी दोन्ही हातांचे अंगठे स्पेस बार वर असतात. यामुळे की बोर्डच्या सगळ्या बटनांवर तुम्ही अगदी सहजपणे बोटं फिरवू शकता. या दोन्ही बटनांवर उंचवटा करण्याची कल्पना जून ई बोटिश यांना सुचली. २००२ मध्ये त्यांनी या कल्पनेचं पेटंट घेतलं.

### आरोग्यमंत्र — सर्दी लांबते?

शरीराच्या पाच ज्ञानेंद्रियांपैकी नाक हे एक महत्त्वाचं इंद्रिय आहे. डोक्याच्या अग्रभागी असणाऱ्या या इंद्रियाचं आद्य कार्य गंधज्ञान हे असलं तरी वायुश्वासी आणि विशेषतः चतुष्पाद प्राण्यांमध्ये त्याचा उपयोग श्वसनासाठीही सर्रास केला जातो. अपृष्ठवंशी (पाठीचा कणा नसलेल्या) प्राण्यांना नाक नसतं. निम्न जलचर पृष्ठवंशीयांत नाकाचा उपयोग गंधज्ञानासाठीच केला जातो. श्वसनासाठी पाणी मुखावाटेच घेतलं जातं. यात घ्राणेंद्रिय आणि श्वसनेंद्रियं एकमेकांपासून वेगळी असतात. आपल्याला सामान्यपणे नाकाच्या बाबतीत सर्दी हा प्रकार होत असतो. सामान्य सर्दी हा वरच्या श्वसनमार्गाचा एक विषाणूजन्य संसर्गजन्य रोग आहे. तो प्रामुख्यानं नाकांवर परिणाम करतो.



नाकातून पाणी वहाणं यास सर्दी म्हणतात. तिची अनेक कारणं असू शकतात. त्यापैकी इन्फेक्शन आणि लर्जी अशी दोन प्रमुख आहेत. सर्दीमुळे घसा, सायनस आणि स्वरयंत्रावरही विपरीत परिणाम होऊ शकतो. विषाणूच्या संपर्कात आल्यानंतर दोन दिवसात सर्दीची चिन्हं आणि लक्षणं दिसू लागतात. यात खोकला, घसा खवखवणं, नाक वाहणं, शिंका येणं, डोकेदुखी आणि ताप यांचा समावेश असू शकतो. लोक सर्दीतून बहुधा सात ते दहा दिवसांत बरे होतात परंतु काही लक्षणं तीन आठवड्यांपर्यंत टिकू शकतात. कधीकधी त्या इतर लक्षणांमुळे न्यूमोनिया होऊ शकतो. म्हणूनच लांबणाऱ्या सर्दीकडे डोळेझाक करता कामा नये. सर्दी लांबली असेल तर वेळीच उपाय योजायला हवेत.

### पंचांग

**शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
माघ कृ. ३, नक्षत्र : उ. फाल्गुनी,
चंद्रराशी : कन्या, सुकर्मा योग,
सूर्योदय : ७.०९, सूर्यास्त १८.३७

### फॉरवर्डस

कधीही स्वत:च्या आकांक्षा गाडून टाकाव्या लागतात...

**ख्वाहिशों को हमने दिवार में चुनवा दिया! खामखां जिंदगी में अनारकली बनके नाच रही थी...**

### वाचा तर खरं

टूथपेस्ट म्हणजे दात स्वच्छ करण्यासाठी उपयुक्त ठरणारं लोशन, हे सगळेच जाणतात. पण याच टूथपेस्टचा उपयोग करून आपण नखांवरील पिवळी झाकही घालवू शकतो. ऑक्सिजनचा पर्याप्त पुरवठा न झाल्याने नखं पिवळी पडतात. हा पिवळसरपणा घालवण्यासाठी अर्धा चमचा लिंबाचा रस आणि एक चमचा टूथपेस्ट एकत्र करुन नखांवर लावा. दहा मिनिटांनतर हलक्या हाताने मसाज करून लेप काढून टाका. थंड पाण्याने हात धुवा. अपेक्षित परिणाम मिळेल.

### फिटनेस फंडा — काळजी नसावी

कोणालाच व्यायामाचं महत्त्व वेगळं सांगायला नको. तुमच्यापैकी अनेकजण नियमित व्यायाम करतात. शक्यतो जीम टाळत नाहीत. मात्र आजारपण, प्रवास किंवा इतर कामांमुळे अधूनमधून व्यायाम चुकतो. याचं वाईटही वाटतं. आपलं वजन वाढेल की काय, सगळी मेहनत पाण्यात जाईल की काय असे विचार मनात येतात. पण अधूनमधून व्यायाम चुकवल्यामुळे शरीर बेढब होत नसतं हे लक्षात घ्यायला हवं.



* तुम्ही तीव्र स्वरुपाचा व्यायाम करत असाल तर एखाद–दुसरा दिवस जीमला जाता आलं नाही तरी काळजी करू नका. एखाद्या दिवशी व्यायाम न केल्यामुळे तुमचं वजन वाढणार नाही. एखाद्या दिवसाची विश्रांती स्नायूंना आराम मिळवून देते. शिवाय त्यांची झीज भरून काढायलाही मदत होते. अर्थात कारणाशिवाय व्यायाम चुकवू नका.
* व्यायाम थांबवल्यानंतर लगेच वजन वाढत नाही. नियमित व्यायाम करत असाल, आठवड्यातले पाच ते सहा दिवस जीमला जात असाल तर लगेच वजन वाढणार नाही. अगदी आठवडाभर ब्रेक घेतला तरी काळजीचं कारण नाही. तंदुरुस्तीची पातळी पुन्हा गाठू शकता.
* विश्रांतीच्या काळात तीव्र स्वरुपाचा व्यायाम शक्य नसेल, जीमची सुविधा नसेल तर चालणं, धावणं, दोरीच्या उड्या मारणं याद्वारे फिटनेस टिकवून ठेवू शकता.

### खेचाखेची — स्पेशालिटी


छोटी कामं मी कधी करत नाही...
.
.
.
.
आणि मोठी कामं माझ्याकडून कधीच होत नाहीत...
.
.
यालाच म्हणतात टॅलेंट...!

### वेगळे काही

पाण्याखाली गेलेली प्राचीन शहरं, त्यांचे अवशेष हा जगभर औत्सुक्याचा विषय आहे. जसे की, चीनमध्ये १३०० वर्षांपूर्वी एक शहर पाण्याखाली लुप्त झालं होतं. शिचेंग नावाचं हे शहर मिंग आणि किंग राजवंशाच्या अधिपत्याखाली होतं. नैसर्गिक आपत्तींमुळे हे संपूर्ण शहर गायब झालं. एका धरणाचं बांधकाम करतेवेळी तज्ज्ञांना या शहराचे अवशेष मिळाले. पाण्यात चाळीस मीटर खोलीवर काही इमारतींच्या भिंती आणि मूर्ती तज्ज्ञांना आढळल्या. आजही हे अवशेष बघायला मिळतात. त्याचप्रमाणे युनायटेड किंग्डमध्ये टायनो हेलिंग नामक शहरही पाण्याखाली गेलं. आजही याचे अवशेष बघण्यासाठी अभ्यासकांची लगबग सुरु असते.

### समुपदेशन — यश नक्की मिळेल

आम्ही दोघी मैत्रिणींनी एकत्र येऊन तिच्या जागेमध्ये केटरिंग व्यवसाय सुरू केला. व्यवसायाचा चांगला जम बसला आहे. ग्राहकसंख्या अधिक असून नफ्याचं प्रमाणही चांगलं आहे. पण आत्तापर्यंत जीवाभावाची असणारी ही मैत्रीण आता भागीदारी संपवण्याची भाषा बोलतीये. मला व्यवसायातून बाहेर काढून स्वत:च्या बहिणीला सामावून घेण्याचा तिचा मानस आहे. हा विश्वासघात आहे. शिवाय या निर्णयामुळे मला मोठा आर्थिक फटका बसणार आहे. दुसरीकडे व्यवसाय सुरू करण्यासाठी माझ्याकडे जागा नाही. कामगारवर्गही तिने वळवून घेतला आहे. अशा स्थितीत काय करु?



– पैसा दिसू लागला की भलेभले भुलतात. त्यामुळे या धक्क्यातून लवकर सावरुन पुढील नियोजन कर. तुला कुठे वाव आहे याचा विचार कर. भाड्याने एखादी जागा बघ. ग्राहकांपर्यंत पोहोचणं शक्य नसेल तर मंगल कार्यालयात, हॉलमध्ये, मेसमध्ये अथवा विकेंड होम्सच्या स्कीममध्ये केटरिंग सेवा देण्याच्या संधींची चाचपणी कर. त्यासाठी नवीन टीमची जुळणी करावी लागेल. पण आता पाऊल मागे घेऊ नकोस. तुझं भांडवल, गुडवील घेऊन बाहेर पड आणि धडाडीने पुढे जा. एक दिवस मैत्रिणीला कृत्याचा पश्चाताप होईल असं यश मिळवण्याची स्वप्नं पहा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### चेर्नोबील प्रकल्पावर रशियाचा हल्ला

**नवी दिल्ली :** युक्रेनमधील चेर्नोबील अणुऊर्जा प्रकल्पामध्ये १९८६ मध्ये मोठी आण्विक दुर्घटना झाली होती, यानंतर प्रकल्पाच्या ठिकाणी अणुभट्टी ४ च्या अवशेषांचे संरक्षण करण्यासाठी 'न्यू सेफ कन्फाइनमेंट स्ट्रक्चर' उभारण्यात आले आहे. दरम्यान या इमारतीवर ड्रोन अदळल्याने स्फोट आणि आग लागल्याची घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी घडल्याची माहिती आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने दिली आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी हा हल्ला झाल्याची पुष्टी केली आहे.

### सीआरपीएफ जवानाकडून सहकाऱ्यांची हत्या

**नवी दिल्ली :** गुरुवारी मणिपूरमधील एका छावणीत एका सीआरपीएफ जवानाने आपल्या दोन सहकाऱ्यांची गोळ्या घालून हत्या केली. या हल्ल्यात आठजण जखमी झाले आहेत. दरम्यान, यानंतर या जवानाने आत्महत्या केली आहे. ही घटना गुरुवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील लामफेल येथील केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) छावणीत घडली. आरोपी हवालदार संजय कुमारने त्याच्या सर्व्हिस रायफलने गोळीबार केला, यामध्ये एका कॉन्स्टेबल आणि एका सब-इन्स्पेक्टरचा जागीच मृत्यू झाला.

# राज्य साखर संघाने माती कालवली

## ऊस उत्पादकांची खंत : हस्तक्षेप याचिकेवर मुदत मागितल्याने नाराजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**भवानीनगर :** एक रकमी एफआरपी कायम करण्याच्या उच्च न्यायालयातील याचिकेवरील निर्णय अंतिम असताना, राज्य साखर संघाने दाखल केलेल्या हस्तक्षेप याचिकेवर मुदत मागून राज्य साखर संघाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अन्नात माती कालावली आहे, असे मत शेतकरी कृती समितीचे संघटक विशाल निंबाळकर यांनी व्यक्त केले.

निंबाळकर म्हणाले, राज्य साखर संघ हा शेतकऱ्यांच्या पैशांवर चालतो. शेतकऱ्यांनी साखर कारखान्यांमध्ये उसाचे गाळप केल्यानंतर, त्यावर प्रति टन रक्कम साखर कारखान्यामार्फत साखर संघाला दिली जाते. ऊस उत्पादक शेतकऱ्याला एक रकमी एफआरपी मिळाली पाहिजे, यासाठी शेतकरी संघटना वेळोवेळी मागणी करत आहेत. एक रकमी एफआरपी कायम करण्याच्या उच्च न्यायालयातील याचिकेवरील निर्णय अंतिम असताना, राज्य साखर संघाने हस्तक्षेप याचिकेवर मुदत मागण्याची आवश्यकताच नव्हती. एक रक्कमी एफआरपीच्या कायद्यात बेकायदेशीर बदल केल्याप्रकरणी राज्य सरकारच्या अनागोंदी कारभारावर उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर गुरुवारी (दि. १३) या याचिकेवर निकाल लागण्याची शक्यता होती. मात्र राज्य साखर संघाने तीन वर्षांपूर्वी दाखल केलेल्या हस्तक्षेप याचिकेमध्ये म्हणणे मांडण्यास मुदत मागितल्याने उच्च न्यायालयाने पुढील आठवड्यात मंगळवारी सुनावणी ठेवली. राज्य साखर संघाकडून तीन वर्षांपूर्वी हस्तक्षेप याचिका दाखल केल्यानंतर वेळोवेळी झालेल्या सुनावणी दरम्यान आपली बाजू मांडणे गरजेचे होते.

गेल्या तीन वर्षांत राज्य साखर संघाकडून कोणताही पदाधिकारी, अधिकारी, वकील अथवा कर्मचारी यांनी सुनावणीस ऊपस्थित राहण्यास जाणीवपुर्वक टाळले. राज्यातील ऊस उत्पादक शेतक-यांच्या ऊसातून वर्षाला पाच कोटी रूपयांची वर्गणी संघाला मिळते. या संघाने कारखानदारीच्या हितासाठी आजपर्यंत कोणतेच पाऊल उचललेले नाही. राज्यातील सहकारी साखर कारखाने कवडीमोल दराने विकले जात असताना, त्याचा कधी चौकशी अहवाल तयार केला नाही. कारखान्याकडून होत असलेल्या भरमसाठ खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी ऊपाययोजना केली नाही, दोन कारखान्यांमध्ये अंतराची अट घालून त्याच साखर कारखान्यांना दुप्पट तिप्पट गाळप क्षमता वाढवून देत असताना, साखर संघ मुग गिळून गप्प आहे.

राज्यातील ऊस वाहतूकदार मुकादमांच्या फसवणुकीत संकटात सापडला असताना त्या प्रश्नात कधी लक्ष घातले नाही. राज्यातील साखर कारखान्यांचे कधीही कॉस्ट ऑडिट केले नाही. मात्र, शेतक-यांच्या बाजूने निकाल लागणार हे लक्षात आल्यानंतर हस्तक्षेप याचिकेवर म्हणणे सादर करण्यास वेळ मागून उस उत्पादक शेतक-यांच्या अन्नात माती कालविण्याचे काम केले. .

> या संघाने कारखानदारीच्या हितासाठी आजपर्यंत कोणतेच पाऊल उचललेले नाही. राज्यातील सहकारी साखर कारखाने कवडीमोल दराने विकले जात असताना, त्याचा कधी चौकशी अहवाल तयार केला नाही. कारखान्याकडून होत असलेल्या भरमसाठ खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी ऊपाययोजना केली नाही, दोन कारखान्यांमध्ये अंतराची अट घालून त्याच साखर कारखान्यांना दुप्पट तिप्पट गाळप क्षमता वाढवून देत असताना, साखर संघ मुग गिळून गप्प आहे.
>
> **-विशाल निंबाळकर,** शेतकरी कृती समितीचे संघटक

# अमेरिकेच्या घोषणेमुळे नाटोची चिंता वाढली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील सत्ताबदलामुळे जगातील अनेक समीकरणेही बदलताना दिसत आहेत. आता नाटोमध्येही मोठी खळबळ उडाली आहे. याचे कारण अमेरिकेचे संरक्षणमंत्री पीट हेग्स्टी यांनी केलेले एक वक्तव्य आहे.

यात त्यांनी असे म्हटले आहे की, अमेरिकेचे प्राधान्य युरोपचे रक्षण करणे हे नाही. अमेरिकेचे मित्र मानले जाणारे युरोपातील बहुतांश देश 'नाटो'मध्ये आहेत. अमेरिकेच्या वक्तव्यामुळे नाटो देशांची चिंता वाढली आहे. ट्रम्प यांच्या मंत्र्यांनी युक्रेनच्या ५० समर्थकांसोबत झालेल्या बैठकीत युरोपचे रक्षण करणे, हे आमचे प्राधान्य नसल्याचे स्पष्ट केले. त्याऐवजी अमेरिकेच्या सुरक्षेवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. अमेरिकेला आपल्याच सीमेवर धोका आहे. म्हणूनच आम्ही आपल्या सीमेचे रक्षण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, असे ते म्हणाले. इतकंच नाही तर रशियाने ताब्यात घेतलेली संपूर्ण जमीन आता आपण परत घेऊ शकणार नाही, असा स्पष्ट संदेशही त्यांनी युक्रेनला दिला. युक्रेनला नाटोमध्ये प्रवेश दिला जाणार नाही, असे ते म्हणाले.

नाटोमध्ये सहभागी असलेल्या सर्व सदस्य देशांच्या संरक्षणाची जबाबदारी सर्व देशांवर आहे. म्हणजेच नाटोच्या एखाद्या सदस्यावर दुसऱ्या शक्तीने हल्ला केला तर संघटनेत सामील असलेले सर्व देश त्याला प्रत्युत्तर देतात. हेच कारण आहे की रशियाच्या हल्ल्यानंतर युक्रेन सातत्याने आपल्याला नाटोचे सदस्यत्व देण्याची मागणी करत आहे. युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करणारी शक्ती म्हणून नाटो काम करणार नाही, असे अमेरिकेने स्पष्ट केले आहे. अशी कारवाई झाली तर त्याची किंमत युरोपातील जनतेला मोजावी लागेल, असे ते म्हणाले. अमेरिकेचे कोणतेही सैनिक यात सहभागी होणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### नाटोचा विस्तार

● नाटोची स्थापना १९४९ मध्ये झाली. सुरुवातीला त्यात १२ देशांची भर पडली आणि नंतर त्याचा विस्तार करण्यात आला. शीतयुद्धाच्या काळात रशियाकडून युरोपला असलेल्या धोक्यामुळे या संघटनेचा विस्तार झाला. रशियाला रोखण्यासाठी मुख्यत्वे ती काम करते. ७५ वर्षे जुनी ही संस्था सातत्याने विस्तारत आहे. नुकतेच स्वीडनने त्याचे सदस्यत्व घेतले असून एकूण सदस्यसंख्या ३२ वर पोहोचली आहे.

# शशी थरूर यांनी केले पंतप्रधान मोदींचे कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राहुल गांधी आणि जयराम रमेश यांच्यासारख्या काँग्रेस नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यावर निशाणा साधला आहे, तर पक्षाचे खासदार शशी थरूर यांनी त्याचे कौतुक केले आहे. ते म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना त्यांचे समर्थक सर्वात मोठे वाटाघाटीकार मानतात. ट्रम्प हे खूप मोठे वाटाघाटीकार आहेत, असे त्यांच्या संरक्षणमंत्र्यांनी काल म्हटले होते, परंतु ट्रम्प यांनी संयुक्त निवेदनात म्हटले होते की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्यापेक्षा मोठे वाटाघाटीकार आहेत. हे विलक्षण आहे. हा दौरा खूप चांगला झाला आहे. अमेरिकेने भारताला एफ-३५ लढाऊ विमाने विकण्याचे मान्य केले आहे. याचा भारताला मोठा फायदा होणार आहे, अशा शब्दांत थरूर यांनी या दौऱ्याचे कौतुक केले आहे.

ते म्हणाले की, भारताकडे राफेलसारखी लढाऊ विमाने आधीपासूनच आहेत. आता एफ-३५ ची भर पडल्याने ताकद आणखी वाढली आहे. डोनाल्ड ट्रम्प स्वत:ला कठोर सौदेबाज समजतात आणि त्यांना याचा अभिमान आहे. आता जर ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्यापेक्षा चांगले वाटाघाटीकार आहेत, तर ती मोठी गोष्ट आहे. डोनाल्ड ट्रम्प हे क्वचितच कोणाचेही कौतुक करणारे व्यक्ती आहेत. जर अशा व्यक्तीने भारताच्या पंतप्रधानांचे कौतुकही केले असेल तर ती चांगली गोष्ट आहे.

# डिजिटल करन्सीचा डॉक्टरांना मोह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या जगभरात आर्थिक व्यवहारांच्या पद्धतीत आमूलाग्र बदल होत आहेत. त्यात केंद्रस्थानी आहेत ती अतिशय वेगाने लोकप्रिय होणारी आभासी चलने आणि देशोदेशींचे डिजिटल चलन. जागतिक अर्थव्यवस्था आता पूर्वापार चालत आलेल्या रोखीच्या व्यवहारांकडून हळूहळू डिजिटल चलनांकडे वळत आहे. पण या आभासी चलनातील गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसवणुकीच्या घटना मात्र दिवसेंदिवस वाढत आहेत. या फसवणुकीतील डॉक्टर पेशातील देखील अडकत असून कोट्यवधींची फसवणूक होत आहे हे अत्यंत गंभीर आहे.

अशाच आभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने शहरातील एका प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञासह मित्राची दीड कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी जयपूरमधील एका डॉक्टरविरुद्ध चतु:शृंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जयपूरमधील डॉक्टरने आभासी चलनात गुंतवणुकीच्या आमिषाने अनेकांची फसवणूक केल्याची माहिती प्राथमिक चौकशीत मिळाली आहे. त्यादृष्टीने तपास करण्यात येत आहे.


याबाबत एका डॉक्टरने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार प्रसिद्ध त्वचाविकार तज्ज्ञ आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जयपूरमधील एका डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती चतु:शृंगी पोलिसांनी दिली.

**काय आहे प्रकरण :** तक्रारदार डॉक्टरची आरोपी डॉक्टरशी एका परिचितार्फत २०१९ मध्ये जयपूरमध्ये ओळख झाली होती. करोना संसर्ग काळात आरोपी डॉक्टरच्या नात्यातील एकाला करोना संसर्ग झाला होता. त्या वेळी पुण्यातील डॉक्टरांनी आरोपी डॉक्टरच्या परिचिताला मदत केली होती. ओळखीतून त्यांची आरोपीशी मैत्री झाली. डॉ. नागरने त्यांना आभासी चलनात दहा लाख रुपये गुंतविण्यास सांगितले. गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळेल, असे आमिष त्यांना दाखविण्यात आले होते. त्यानंतर तक्रारदार डॉक्टरच्या मित्राने एक कोटी ४९ लाख रुपयांची रक्कम त्याला गुंतविण्यास दिली. रक्कम गुंतविण्यात आल्यानंतर त्यांना परतावा देण्यात आला नाही. त्यानंतर त्यांनी त्याच्याकडे पैसे परत मागितले. तेव्हा त्याने पैसे देण्यास नकार दिला, तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.




# उजनी धरणात वाळू माफियांवर कारवाई; २ कोटी ६० लाखांचा फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** पुणे आणि सोलापूर जिल्ह्यात वाळू माफियांवर जोरदार कारवाई करत प्रशासनाने उजनी पाणलोट क्षेत्रात मोठी धडक दिली. इंदापूर तालुका ते बिटरगाव वांगी या परिसरात वाळू उपसा करणाऱ्या १३ बोटी पकडून बुडवण्यात आल्या, तर ३ सक्शन बोटी जप्त करण्यात आल्या. या कारवाईमुळे वाळू माफियांना तब्बल २ कोटी ६० लाखांचा फटका बसला आहे.

पुणे व सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सोलापूरचे महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे सामान्य प्रशासन तहसीलदार श्रीकांत पाटील व इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या नेतृत्वाखाली महसूल व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने उजनी जलाशयात इंदापूर तालुक्यातील माळवाडी जॅकवेल ते करमाळा तालुक्यातील बिटरगाव वांगी येथे पाठलाग करून वाळू माफियांच्या १३ बोटी पकडल्या व त्या बुडवून नष्ट केल्या. माळवाडी जॅकवेल जवळ तीन सक्शन बोटी पकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

या कारवाईमध्ये इंदापूरचे निवासी नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, करमाळा निवासी नायब तहसीलदार विजय लोकरे, इंदापूर मंडळ अधिकारी श्याम झोडगे, माळवाडी मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, मंडल अधिकारी काटी मल्लाप्पा ढाणे, ग्राम महसूल अधिकारी अशोक पोळ, भूषण सुरवडकर तसेच तहसील कार्यालय करमाळा येथील सहाय्यक महसूल अधिकारी जितेंद्र कदम, ग्राम महसूल अधिकारी चंद्रकांत नावाडे, गोरक्षनाथ ढोकणे, यादव ठोंबरे, मंगलसिंग गुसिंगे, इंदापूर तालुक्यातील पोलीस पाटील सुनील राऊत, प्रदीप भोई, अरुण कांबळे, विजयकुमार करे व बाळासाहेब कडाळे तसेच पोलीस कर्मचारी विनोद रासकर, लक्ष्मण सूर्यवंशी, होमगार्ड गणेश वडवे, भारत लोखंडे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथील द्रोण सर्वेअर संकेत बाबर यांनी भाग घेतला.

# संभल दंगलखोरांची पोस्टर्स लावली; उत्तरप्रदेश सरकारची मोठी कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लखनौ :** संभलमधील जामा मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान झालेल्या हिंसाचारप्रकरणी योगी सरकार कडक झाले आहे. हिंसाचारातील डझनभर आरोपींना अद्याप अटक न झाल्याने संभल पोलिसांनी शहरात पोस्टर्स लावण्यास सुरुवात केली आहे. शहरात सर्वत्र ७४ जणांचे पोस्टर लावण्यात आले आहेत. २४ नोव्हेंबर रोजी संभलमध्ये मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान हिंसाचार उसळला होता. पोलिसांवर जोरदार दगडफेक आणि जाळपोळ करण्यात आली. गोळीबारात चार तरुणांचा मृत्यू झाला. मात्र, पोलिसांनी या तरुणांचा मृत्यू गोळीबार किंवा त्यांच्या गोळ्यांनी झाल्याचा इन्कार केला होता.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झालेल्या हिंसाचाराच्या छायाचित्रांपासून बनवलेले पोस्टर आरोपींची ओळख पटविण्यासाठी ठिकठिकाणी लावण्यात आले आहेत. अतिरिक्त पोलिस अधीक्षक श्रीश चंद्रा यांनी पत्रकारांना सांगितले की, सीसीटीव्हीमध्ये दिसणारे लोक हिंसाचारात थेट सहभागी होते. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही, त्यामुळे त्यांची ओळख पटविण्यासाठी जनतेची मदत घेण्यासाठी पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

या ७४ गुन्हेगारांची ओळख पटविण्यासाठी विश्वासार्ह पुरावे देणाऱ्या खबऱ्यांना रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. चंद्रा म्हणाले की, संभलच्या शहरी भागातच नव्हे तर जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

## फूट पडेल असा कोणताही आदेश नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बार असोसिएशनमध्ये उपेक्षित अनुसूचित जाती आणि जमातींना आरक्षण देण्याची वकिलांची मागणी वैध आणि गंभीर आहे, परंतु जाती-धर्माच्या आधारावर समाजात फूट पडेल असा कोणताही आदेश देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. कर्नाटकातील काही वकिलांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी हे निरीक्षण नोंदवले.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठाने उपेक्षित समाजातील वकिलांना बार बॉडीमध्ये आरक्षण देण्याची मागणी करणारी याचिका गंभीर असल्याचे म्हटले आहे. बार असोसिएशनमध्ये सामाजिक विविधताही महत्त्वाची आणि आवश्यक आहे, पण अशा संस्थांना जाती-धर्माच्या आधारे विभाजित राजकीय व्यासपीठ बनू देऊ शकत नाही, याची न्यायालयाला जाणीव आहे, असेही ते म्हणाले.

# अलाहाबादियाची न्यायालयात धाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** बीयर बाइसेप्स नावाने प्रसिद्ध युट्यूबर रणवीर अलाहाबादियाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली. 'इंडिया गॉट लेटेंट' शो दरम्यान, दिलेल्या अश्लील विधानांविरोधात त्याच्यावर विविध राज्यांमध्ये एफआयआर दाखल करण्यात आलीय. आता अश्लीलतेच्या आरोपांवर दाखल झालेल्या एफआयआर विरोधात रणवीर अलाहाबादियाने कोर्टाची पायरी चढलीय.

रणवीर अलाहबादिया कॉमेडी शो इंडियाज गॉट लॅटेंटमध्ये गेस्ट म्हणून पोहोचला होता. तिथे त्याने एका कंटेस्टेंटशी पालकाबद्दल अश्लील प्रश्न विचारला. बघता बघता हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला. यावरून रणवीरवर लोक खूप भडकले.

प्रचंड टीकेनंतर रणवीरने व्हिडिओ पोस्ट करत माफी मागितली. तो म्हणाला- "माझी कॉमेंट न केवळ चुकीची होती तर ती अजिबात विनोदी नव्हती. मी इथे माफी मागायला आलो आहे. माझा निर्णय चुकीचा होता, असे करणे कूल नव्हते. पॉडकास्ट प्रत्येक वयातील लोक पाहतात. मी असा व्यक्ती बनू इच्छित नाही, जो ती जबाबदारी खूप हलक्यामध्ये घेतो. या संपूर्ण अनुभवातून माझी शिकवण हिच असेल की, मी या प्लॅटफॉर्मला उत्तम पद्धतीने चालवेन. मी वचन देतो की, मी उत्तम व्यक्ती बनेन. मी व्हिडिओ मेकर्सना सांगितले आहे की, त्यातील असंवेदनशील हिस्सा हटवावा. अखेरीस मी हे सांगू इच्छितो की, मला दु:ख आहे. मी अपेक्षा करतो की, एक माणूस म्हणून तुम्ही मला माफ कराल."

## ज्वालामुखीचा उद्रेक...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



माउंट एटना — इटलीच्या माउंट एटना येथे ज्वालामुखीचा उद्रेक झाला असून, त्यातून वाफ आणि राख उसळत आहे.

## गतवर्षीच्या तुलनेत यंदा साखरेचं उत्पादन १० टक्क्यांनी घटणार

# यंदाचा गळीत हंगाम १०० दिवसांचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** नुकत्याच संपलेल्या वर्षात पर्जन्यकाळ वाढल्यानं त्याचा थेट परिणाम यंदाच्या गळीत हंगामावर झाला असून यंदाचा गळीत हंगाम गेल्या पाच वर्षात सर्वात कमी कालावधीचा ठरणार आहे. राज्याचा गळीत हंगाम मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संपण्याची शक्यता असून दरवर्षीच्या साखर उत्पादनापेक्षा यंदा १० टक्क्यांनी साखरेचं उत्पादन घटणार आहे. तसंच राज्यातील २०० सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांपैकी २० कारखान्यांची धुराडी बंद झाली आहेत. परिणामी कमी दिवसांच्या गळीत हंगामामुळे साखर उद्योगावर आर्थिक संकट येण्याची शक्यता या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

गतवर्षी सप्टेंबर अखेर झालेल्या धुवांधार पावसामुळे आणि निवडणुकीचा हंगाम असल्यामुळे राज्यातील साखर कारखाने नोव्हेंबर २५ तारखेनंतरच सुरू झाले. यंदाच्या गळीत हंगामाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यातील अनेक सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी आपली गाळप क्षमता वाढवल्यामुळे राज्यात दिवसाकाठी ९ लाख ७० हजार मेट्रिक टन उसाचं गाळप करण्यात आलं. २०२३-२४ यावर्षीच्या गाळप हंगामात राज्यातील २०७ सहकारी खासगी साखर कारखान्यांकडून १०७३ लाख मेट्रिक टन उसाचं गाळप झालं होतं. यातून ११० लाख मेट्रिक टन साखर उत्पादन राज्यात झालं होतं तर १०.२७ इतका साखर उतारा राहिला होता. तर यंदाच्या गळीत हंगामात ११ फेब्रुवारी पर्यंत २०० कारखान्यांकडून ९ लाख ७० हजार मेट्रिक टन प्रति दिन याप्रमाणे ७०९ लाख मेट्रिक टन गाळप आतापर्यंत पूर्ण झालं आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ९५० लाख मेट्रिक टन गाळप पूर्ण होईल असा अंदाज साखर तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

सद्यस्थितीला राज्यातील २०७ खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांपैकी २० कारखाने बंद झाले असून सर्वाधिक सोलापूर जिल्ह्यातील १७ तर नांदेड जिल्ह्यातील तीन कारखान्यांचा यामध्ये समावेश आहे. यंदा ९.२०% इतका साखर उतारा मिळाला असून गतवर्षीच्या तुलनेत यंदा उताऱ्यात ही घट झाली आहे.

#रा




सहा लाख कोटींचा घटस्फोट : जगातील सर्वात महागडा घटस्फोट बिल गेट्स आणि त्यांची पत्नी वाइफ मिलिंद यांच्यात झाला.

## पूजा खेडकर 'सेफ ' : सर्वोच्च स्थगिती

**नवी दिल्ली :** माजी आयएएस प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. पूजा खेडकर यांच्या अटकेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. खेडकर यांच्यावर २०२२ मध्ये लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पात्रता मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप आहे. ओबीसी आणि दिव्यांग प्रवर्गातील आरक्षणाचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने पूजा खेडकर यांना जानेवारी महिन्यात दिलासा दिला होता. त्यावेळी त्यांच्या अटकेला १४ फेब्रुवारीपर्यंत स्थगिती देण्यात आली होती. तसेच माजी प्रशिक्षणार्थी आयएएसविरोधात उच्च न्यायालयाच्या आदेशावर उत्तर दाखल करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने दिल्ली पोलिसांना आणखी वेळ दिला आहे. याशिवाय सर्वोच्च न्यायालयानेही खेडकर यांना तपासात सहकार्य करण्याचे आदेश दिले आहेत.

| | |
|---|---|
| ०-१० करोड | १ दिवस |
| १०-२० करोड | २ दिवस |
| २०-३० करोड | ६ दिवस |
| ३०-४० करोड | ८ दिवस |
| ४०-५० करोड | १० दिवस |

महा कुंभामध्ये स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या आजपर्यंत ५० कोटी इतकी नोंदविण्यात आली. मागील काही दिवसात किती कोटी भाविकांनी कुंभ स्नान केले याचेही इन्फोग्राफिक्स महा कुंभाची महादिव्यता दर्शवितात.




## ऐतिहासिक आंदोलनाला दोन वर्षे पूर्ण

**नवी दिल्ली :** गेल्या वर्षभरापासून खनौरी आणि शंभू सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत. या शेतकरी संघटनांसोबत आज केंद्र सरकारच्या प्रतिनिधींची बैठक होणार आहे. या बैठकीत एमएसपीवरील हमी कायद्यासह अनेक मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी सलग तीन दिवस शेतकऱ्यांनी शक्तिप्रदर्शन केले होते. गुरुवारी शंभू सीमेवर शेतकऱ्यांनी मोठी महापंचायत आयोजित केली होती. शेतकरी आंदोलन २.० ला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ही महापंचायत आयोजित करण्यात आली होती. पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील हजारो शेतकरी या महापंचायतीत सहभागी झाले होते.



चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चव्हाण या आगामी ऐतिहासिक मालिकेत ऋणी दरॉय राजा सोमेश्वर यांचे भूमिका करणार आहेत सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन वर ही मालिका प्रसारित होईल.

## नोटा दाबण्यात बिहारची आघाडी

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, मागील दोन सार्वत्रिक निवडणुकांच्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नोटावरील मतदान कमी झाले आहे. बिहारमध्ये नोटाचे बटण सर्वाधिक दाबण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनमधील (ईव्हीएम) 'नोटा' या पर्यायाला २०१३ पासून गेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वात कमी मतांची टक्केवारी मिळाली आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली आहे. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदा नोटा हा पर्याय आणण्यात आला होता.

# पुलवामाच्या स्मरणाने पुन्हा देश हळहळला

## ४० सीआरपीएफ जवानांना श्रद्धांजली : त्यानंतरच झाला होता एअरस्ट्राईक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या ४० सीआरपीएफ जवानांना श्रद्धांजली वाहिली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "२०१९ मध्ये पुलवामामध्ये आपण गमावलेल्या धाडसी वीरांना श्रद्धांजली. येणाऱ्या पिढ्या त्यांचे बलिदान आणि राष्ट्राप्रती त्यांचे अढळ समर्पण कधीही विसरणार नाहीत."

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही श्रद्धांजली वाहिली आणि या हल्ल्याला "दहशतवादाचे भ्याड कृत्य" असे संबोधले. "दहशतवाद हा संपूर्ण मानवजातीचा सर्वात मोठा शत्रू असून, संपूर्ण जग त्याच्या विरोधात एक झाले आहे. सर्जिकल स्ट्राईक असो किंवा एअरस्ट्राईक, मोदी सरकार दहशतवाद्यांवर 'शून्य सहनशीलता' धोरण ठेवून मोहीम राबवून त्यांचा पूर्णपणे नाश करण्याचा निर्धार करत आहे," असेही अमित शाह यांनी म्हटले आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही पुलवामा दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. एक्सवरील एका पोस्टमध्ये योगी म्हणाले की, भारतमातेच्या शूर पुत्रांचे बलिदान आपल्याला दहशतवादाविरुद्ध एकत्रितपणे लढण्याची प्रेरणा देते. पुलवामा येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व अमर शूर सैनिकांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि सलाम! भारतमातेच्या शूर सुपुत्रांचे बलिदान आपल्याला दहशतवादाविरुद्ध एकत्रितपणे लढण्याची प्रेरणा देते. जय हिंद, असे योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे.



"२०१९ मध्ये पुलवामामध्ये आपण गमावलेल्या धाडसी वीरांना श्रद्धांजली. येणाऱ्या पिढ्या त्यांचे बलिदान आणि राष्ट्राप्रती त्यांचे अढळ समर्पण कधीही विसरणार नाहीत."
—नरेंद्र मोदी, पंतप्रधान

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी एका दहशतवाद्यांनी आयईडीने भरलेले वाहन सीआरपीएफच्या ताफ्यावर धडकवले, ज्यामध्ये ४० सैनिक ठार झाले. हल्ल्याच्या काही दिवसांनंतर, भारतीय हवाई दलाने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानच्या बालाकोटमधील जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले, यात मोठ्या संख्येने दहशतवादी ठार झाले.

२६ फेब्रुवारीच्या पहाटे हा हवाई हल्ला करण्यात आला आणि जम्मू-काश्मीरमधील भारतीय लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य करण्यासाठी दुसऱ्या दिवशी हल्ला करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न सतर्क भारतीय हवाई दलाने हाणून पाडला. या संघर्षात, विंग कमांडर अभिनंदन वर्धमान, मिग-२१ विमानातून पाकिस्तानी विमानांचा पाठलाग करत, पीओकेमध्ये गेले, जिथे त्यांचे विमान पाडण्यात आले. त्यांना पाकिस्तानने ताब्यात घेतले होते. त्यानंतर, भारताने निर्वाणीचा इशारा देताच, त्यांची सुटका करण्यात आली.

### काळा दिवस

● १४ फेब्रुवारी २०१९ ही तारीख भारतीय इतिहासातील त्या काळ्या दिवसांमध्ये समाविष्ट आहे, जी कोणीही विसरू शकत नाही. या दिवशी जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे देशाच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले ४० सीआरपीएफ जवान दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झाले. या आत्मघातकी हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदने स्वीकारली होती. या दुर्दैवी घटनेनंतर संपूर्ण देश शोकात आणि संतापाने भरलेला होता. दहशतवाद्यांना योग्य उत्तर मिळावे अशी प्रत्येक भारतीयाची इच्छा होती. भारतानेही बालाकोट एअरस्ट्राइकद्वारे कठोर कारवाई केली आणि पाकिस्तानला त्यांच्याच घरात घुसून धडा शिकवला.

### पुलवामा हल्ला कसा झाला?

● १४ फेब्रुवारी २०१९ रोजी, २५०० हून अधिक सीआरपीएफ जवानांचा ताफा श्रीनगर-जम्मू महामार्गावरून जात होता. दरम्यान, अवंतीपोरा जवळील गोरीपोरा भागात एका आत्मघातकी हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेली कार ताफ्यावर आदळवली. सैनिकांना प्रतिकार करण्याची संधीही मिळाली नाही. एका प्रचंड स्फोटात ४० शूर सैनिक शहीद झाले. या हल्ल्याचे पडसाद देशभर उमटले. सगळीकडे दुःख आणि संतापाचे वातावरण होते. हल्ल्यानंतर जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. हा हल्ला पुलवामा येथील आदिल अहमद दार नावाच्या दहशतवाद्याने केला होता.

### बालाकोट एअरस्ट्राईक

● पुलवामा हल्ल्याच्या बरोबर १२ दिवसांनी, २६ फेब्रुवारी २०१९ च्या रात्री, भारतीय हवाई दलाने दहशतवाद्यांच्या तळावर हल्ला केला. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील बालाकोट येथील जैश-ए-मोहम्मदच्या प्रशिक्षण शिबिरांवर हवाई हल्ला केला आणि त्यात अनेक दहशतवादी ठार झाले. या हल्ल्यात १००० किलोपेक्षा जास्त बॉम्ब टाकण्यात आले, ज्यामुळे जैश-ए-मोहम्मदचे तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. बालाकोट एअरस्ट्राइकनंतर पाकिस्तान पूर्णपणे हादरला. त्यांनी एअर स्ट्राईक झालाच नाही, असे दाखवण्याचा प्रयत्न केला.

## सीमेपलीकडून २०० कोटींचे हेरॉईन जप्त; सर्वात मोठी कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमृतसर ग्रामीण पोलिसांनी सीमेपलीकडून अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी कारमधून ३० किलो हेरॉईन जप्त केले. याची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात २०० कोटी इतकी आहे. २०२५ मधील ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे. पाकिस्तानातून अंमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी ड्रोनचा वापर केला जातो. अटक करण्यात आलेले आरोपी मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची तस्करी करतात.

या प्रकरणी घरिंडा पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तस्करी टोळीशी संबंधित इतर लोकांचाही शोध घेतला जात आहे. पंजाबमधील अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी आणि पंजाबला सुरक्षित करण्यासाठी पोलिस कटिबद्ध आहेत. ड्रग्जच्या बाबतीत पंजाबची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. त्याचबरोबर पाकिस्तानातील तस्करही पंजाबमार्गे अंमली पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न करतात. अमृतसरच्या आसपासच्या भागात पाकिस्तानी ड्रोन अनेकदा आढळतात.

त्याचबरोबर पंजाबमधील तरुण वर्ग चरस, अफू, कोकेन, अफू यांसारख्या अंमली पदार्थांमध्येही गुंतलेला आहे. ड्रग्ज वापरणाऱ्यांच्या यादीत पंजाब पहिल्या क्रमांकावर आहे. गृह मंत्रालयाने आयोजित केलेल्या सेमिनारमध्ये ही माहिती देण्यात आली. यात खुद्द पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पंजाब पूर्वी ट्रॅग्जचा ट्रान्झिट रूट होता पण आता तो उपभोगाचे ही केंद्र बनला आहे. विशेष एनडीपीएस कोर्ट स्थापन करण्यासाठी केंद्राच्या मदतीची गरज असल्याचे ते म्हणाले. याशिवाय सीमावर्ती भागात ५-जी जॅमिंग उपकरणे बसवावी लागतील.

### आकडेवारी काय सांगते?

● एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत पंजाब तिसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश पहिल्या तर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. आकडेवारी पाहिली तर पंजाबमधील ३० लाख लोक अंमली पदार्थांचे सेवन करत आहेत. पंजाबमध्ये दरवर्षी सुमारे साडेसात हजार कोटी रुपयांचा अमली पदार्थांचा व्यापार होतो.



## घुले १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी असलेल्या सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीय. सुदर्शन घुलेला आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याप्रकरणी १२ फेब्रुवारी रोजी केज न्यायालयात हजर करण्यात आले होते, त्यानंतर त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली होती.

शुक्रवारी पुन्हा एकदा केज न्यायालयात त्याला हजर केले असता, केज न्यायालयाने सुदर्शन घुलेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलीय.

सुदर्शन घुले याला न्यायालयीन कोठडीत असताना दोन वेळा पोलीस कोठडी देण्यात आली होती, त्यामध्ये सुदर्शन घुलेंचे व्हाईस सॅम्पलदेखील घेण्यात आलेत. २९ नोव्हेंबर रोजी आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याप्रकरणी ज्या फोनवरून कॉल केले, त्यामध्ये सुदर्शन घुले हा प्रमुख आरोपी आहे. या दरम्यान पोलिसांनी सुदर्शन घुलेचे व्हाईस सॅम्पल घेतले.

## ९८ टँकर परत पाठवले
## दूध भेसळीबाबत आता पर्यंतची सर्वात मोठी कारवाई



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात बहुतांश ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुधात भेसळ असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहे. भेसळयुक्त दुधामुळं जनतेच्या आरोग्यावर परिणाम होतोय. या पार्श्वभूमीवर भेसळयुक्त पदार्थांवर तसंच भेसळयुक्त मुंबईत येणाऱ्या दुधावर चाप बसवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग सक्रिय झाल्याचं बघायला मिळतंय. मागील दोन दिवसात मुंबईत येणाऱ्या ९८ दुधाच्या टँकरची तपासणी करण्यात आली. यात दुधाचा दर्जा कमी आढळलेल्या वाहनाला परत पाठवण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिलीय.

दुधात होत असलेल्या भेसळीच्या तक्रारी वाढत असल्यानं प्रशासनानं बुधवारी आणि गुरुवारी पहाटे मुंबईच्या चार चेक नाक्यांवर अचानक जाऊन मुंबईत येणाऱ्या दुधाच्या टँकरची तपासणी केली.

त्यानंतर पत्रकार परिषद घेत त्यांनी या कारवाई संदर्भात माहिती दिली. "आम्ही गेल्या दोन दिवसात मुंबई बाहेरील येणाऱ्या ९८ दुधाच्या टँकरची तपासणी केलीय. यात ९६ लाख ६ हजार ८३२ रुपये किंमतीच्या १ लाख ८३ हजार ३९७ दुधाच्या साठ्याची तपासणी करण्यात आली. ही आत्तापर्यंतची सर्वात मोठी कार्यवाही आहे," असं झिरवाळ यांनी सांगितलं.

## परपुरुषाचे प्रेम म्हणजे व्यभिचार नाही; न्यायालयाचा निकाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** एखाद्याची पत्नी पर पुरुषावर प्रेम करत असेल, तर तो व्यभिचार नाही. जोपर्यंत ती अन्य पुरुषासोबत शारीरिक संबंध ठेवत नाही, तोपर्यंत त्याला व्यभिचार म्हणता येणार नाही, असे मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती जी. एस. अहलुवालिया यांनी असे म्हटले आहे की, व्यभिचार तेव्हाच होतो जेव्हा शारीरिक संबंध असतात. एका पतीने न्यायालयात दावा केला होता की, त्याची पत्नी दुसऱ्या कोणाच्या तरी प्रेमात आहे. अशा परिस्थितीत तिला पोटगीचा अधिकार नाही. त्यावेळी हे निरीक्षण नोंदवण्यात आले.

भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या कलम १४४ (५) आणि सीआरपीसीच्या कलम १२५ (४) नुसार पत्नीवरील व्यभिचाराचे आरोप सिद्ध झाले तरच तिला पोटगीपासून वंचित ठेवता येईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने निकालात म्हटले आहे की, व्यभिचार सिद्ध करण्यासाठी शारीरिक संबंध सिद्ध करणे आवश्यक आहे. पत्नी कुणावर प्रेम करत असेल आणि शारीरिक संबंध ठेवत नसेल तर त्याला व्यभिचाराच्या श्रेणीत ठेवता येणार नाही.

कौटुंबिक न्यायालयाने पतीला दरमहा चार हजार रुपये पोटगी द्यावी लागेल, असा निकाल दिला होता. पती वॉर्ड बॉय म्हणून काम करतो आणि महिन्याला आठ हजार रुपये कमावतो. पत्नीचे दुसऱ्या कोणावर प्रेम असल्याचा दावा करत त्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. कलम २४ अन्वये आदेश दिल्यानंतर पत्नीला चार हजार रुपये पोटगी मिळत होती.

## संघ द्वेषी ममताला धक्का

### पश्चिम बंगालमध्ये होणार संघसभा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**कोलकाता :** कलकत्ता उच्च न्यायालयाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पश्चिम बंगालमध्ये सभा घेण्याची परवानगी दिली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत देखील या रॅलीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. पूर्व वर्धमान जिल्ह्यात १६ फेब्रुवारी रोजी ही रॅली होणार आहे. पोलिसांनी रॅलीला परवानगी नाकारली होती. यानंतर संघाने उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती अमृता सिन्हा यांनी मेळाव्यासाठी आयोजकांना सशर्त परवानगी दिली.

रॅलीला सशर्त परवानगी देताना न्यायमूर्ती अमृता सिन्हा यांच्या खंडपीठाने सांगितले की, आयोजक उपस्थितांच्या संख्येवर तसेच लाऊडस्पीकरच्या आवाजावर लक्ष ठेवतील. प्रस्तावित रॅलीच्या दिवशी रविवारी कोणतीही परीक्षा होणार नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

जिल्हा पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले की, पश्चिम बंगालमध्ये माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षा सुरू आहेत. अशा वेळी लाऊडस्पीकरचा वापर करता येत नाही.

### तयारी २०२६ विधानसभेची

● राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत सध्या पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. येथे ते तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी विशेष काम करत आहेत. संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना ते सातत्याने भेटत असतात. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पश्चिम बंगालमध्ये भाजपसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यात ते गुंतले असल्याचे मानले जाते. बांगलादेशातील हिंदूंवर जे अत्याचार होत आहेत, त्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भर देत आहे. पश्चिम बंगालची बांगलादेशला आंतरराष्ट्रीय सीमा लागून आहे. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराला भाजपने गांभीर्याने घेतले आहे.



# धगधगत्या मणिपूरमध्ये अखेर राष्ट्रपती राजवट लागू

### विषय

**मणिपूरमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय उलथापालथीदरम्यान गुरुवारी राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. या घटनेवरून भाजप आणि काँग्रेस यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. भाजप सरकारच्या अपयशामुळे राज्याची सामाजिक बांधणी पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे, तर मणिपूरमध्ये शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या दिशेने हा निर्णय आवश्यक पाऊल असल्याचे भाजपने म्हटले आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या टीकेनंतर भाजपही पूर्णपणे सक्रिय झाला आहे. मणिपूरच्या प्रादेशिक अखंडतेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी कठोर पावले उचलली जातील, असे पक्षाचे ईशान्य प्रभारी संबित पात्रा यांनी स्पष्ट केले. राष्ट्रपतींनी मणिपूर विधानसभेला स्थगित ठेवले आहे, याचा अर्थ भविष्यात केव्हाही विधानसभेचे पुनरुज्जीवन होऊ शकते. हा निर्णय पूर्णपणे राष्ट्रपतींच्या मर्जीवर असेल, असेही ते म्हणाले. अवैध घुसखोरीविरोधात भाजप कडक कारवाई करेल आणि राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी कटिबद्ध आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



काँग्रेस गेल्या २० महिन्यांपासून जी मागणी करत होती ती अखेरीस पूर्ण झाली. भाजप सरकारच्या धोरणांमुळे मणिपूर हिंसाचार आणि अराजकात बुडाले असून, राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. मणिपूरमधील घटनात्मक संस्था पूर्णपणे कोलमडल्याची कबुली खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच दिली होती. ३ मे २०२३ पासून आतापर्यंत ३०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून, ६० हजारांपेक्षा अधिक लोक विस्थापित झाले आहेत. मात्र, केंद्र सरकारने कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत.
- जयराम रमेश, काँग्रेस सरचिटणीस

### वाद कशामुळे झाला?

● मणिपूरमधील अशांततेचे एक प्रमुख कारण म्हणजे कुकी-जो समाजाने स्वतंत्र प्रशासनाची केलेली मागणी. मे २०२३ मध्ये राज्यात जातीय हिंसाचार उसळल्यापासून कुकी-जो संघटनांनी त्यांच्या बहुल भागात स्वतंत्र प्रशासनाची मागणी केली होती, ज्याला इम्फाळ खोऱ्यातील बहुसंख्य मेइतेई समुदायाकडून तीव्र विरोध केला जात आहे.

### राष्ट्रपती राजवट का लागू करण्यात आली?

● गृह मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी "घटनेच्या कलम 356 अंतर्गत हा निर्णय घेतला, कारण राज्य सरकार घटनेतील तरतुदींनुसार काम करण्यास असमर्थ होते." मणिपूरमध्ये सुरू असलेली राजकीय अस्थिरता आणि वांशिक हिंसाचार लक्षात घेता केंद्र सरकारने आता राज्यपालांमार्फत प्रशासकीय कामकाज करण्याचा निर्णय घेतला आहे.

» Selected

## छत्रपती संभाजी साहित्य संमेलन १२ तारखेला



**पुरंदर :** राज्यस्तरीय सोळावे छत्रपती संभाजी महाराज साहित्य संमेलन दि. १२ मार्च रोजी सासवड (ता. पुरंदर) येथे होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व जगदगुरु तुकोबाराय साहित्य परिषद यांच्या वतीने साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संमेलनाचे मुख्य प्रवर्तक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.

साहित्य संमेलनात उद्‌घाटन समारंभ, कथाकथन, पुस्तक प्रकाशन, पुरस्कार वितरण, ग्रथदिंडी, नाट्यप्रयोग, परिसंवाद, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. संमेलनाच्या नियोजनासाठी आयोजित केलेल्या बैठकीला राजाभाऊ जगताप, दत्तनाना भोंगळे, सुनिल लोणकर, शामराव मेमाणे, गंगाराम जाधव, सुनिल धिवार, दीपक पवार, संजय सोनवणे, दत्ता कड, प्रफुल्ल देशमुख, राजेश काकडे, अरविंद जगताप आदी उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या कऱ्हा काठावर साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनात राज्यभरातून लेखक, कवी मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत.

## पारोडीच्या सरपंचांवर अविश्वास ठराव मंजूर



**शिक्रापूर :** पारोडी (ता. शिरुर) ग्रामपंचायतीच्या सरपंच कमल शिवले यांच्याविरुद्ध ग्रामपंचायत सदस्यांनी तहसीलदार यांच्याकडे दाखल केलेल्या अविश्वास ठरावावर मतदान घेत अखेर आज पारोडीच्या सरपंच कमल शिवलेंवर अविश्वास मंजूर झाला आहे.

पारोडी ग्रामपंचायतच्या सरपंच कमल शिवले या ग्रामपंचायत सदस्यांना माहिती न देता मनमानी करत आहेत, विकास कामांबाबत सदस्यांना विश्वासात घेत नाहीत, विकास निधीचा वापर करताना पक्षपाती व एकतर्फी निर्णय घेत असल्याने सरपंच कमल शिवले यांच्यावर अविश्वास दाखल करावा, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य बजरंग सातकर, दत्तात्रय शिवले, पल्लवी शिवले, शशिकांत कोकरे, वर्षा येळे, अविनाश येळे, दिपाली कवीतके यांनी तहसीलदार यांच्याकडे केली होती. तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, ग्रामविकास अधिकारी वनिता माने, मंडलाधिकारी नंदकुमार खरात, तलाठी कोमल माने यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालयात अविश्वास ठरावावर मतदान घेण्यात आले. यावेळी अविश्वास ठरावाची मागणी करणाऱ्या सात सदस्यांसह उपसरपंच कविता टेमगिरे उपस्थित होते. मात्र, सरपंच कलम शिवले गैरहजर होत्या, यावेळी हात वर करुन मतदान घेण्यात आले असता, उपसरपंच कविता टेमगिरे या तटस्थ राहिल्या. तर अन्य सात सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने अविश्वास ठराव सात मतांनी मंजूर झाला असल्याचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी जाहीर केले. ग्रामपंचायत सदस्यांनी या वेळी जल्लोष केला.

**दाद मागणार...**

● पारोडी ग्रामपंचायत मध्ये माझ्या विरोधात अविश्वास ठराव घेण्यात आल्याबाबत नोटीस मला होती मात्र माझ्या वैयक्तिक कामामुळे मी उपस्थित राहू शकले नसून सदर निकालाच्या विरोधात आपण जिल्हाधिकारी तसेच वेळप्रसंगी न्यायालयात दाद मागणार असल्याचे सरपंच कलम शिवले यांनी सांगितले.

## इंदूबाई भुजबळ यांचे निधन



**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील जुन्या पिढीतील इंदूबाई काशिनाथ भुजबळ (८५) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, चार मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. महात्मा फुले समता परिषद पश्चिम महाराष्ट्र संघटक सोमनाथ काशीनाथ भुजबळ यांच्या त्या आई, तर शिक्रापूरच्या प्रथम महिला सरपंच चंद्रकला भुजबळ यांच्या सासूबाई आणि शिक्रपुरच्या विद्यमान उपसरपंच पूजा भुजबळ यांच्या त्या आजी सासू होत.

## भिगवण सरपंचपदी गुराप्पा पवार

**भिगवण:** भिगवण गावच्या सरपंचपदी गुराप्पा गंगाराम पवार यांची निवड झाल्याची माहिती निवडणूक अधिकारी दीपक कोकरे यांनी दिली. गुप्त पद्धतीने घेण्यात आलेल्या निवडणुकीत गुराप्पा गंगाराम पवार यांना १२, तर श्रीमती निर्मला हरिचंद्र पांढरे यांना ५ मते मिळाली. या निवडणुकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून दीपक कोकरे, तसेच तलाठी राहुल देवकर आणि ग्रामपंचायत अधिकारी भगीरथ परदेशी यांनी कामकाज पाहिले.

इंदापूर तालुक्याची राजकीय राजधानी समजल्या जाणाऱ्या भिगवण ग्रामपंचायतमध्ये कुंची कोरवी समाजाचा महाराष्ट्रातील पहिला सरपंच होण्याचा मान गुरप्पा पवार यांनी मिळविला आहे. भिगवण गावच्या राजकारणातील आजचा महत्वाचा दिवस म्हणून ओळखला जाणार आहे. अगदी सर्वसामान्य नागरिकाला गावच्या सरपंच पदाचा मान मिळाल्यामुळे राजकीयदृष्ट्या ही नवी नांदी मानली जात आहे.

# श्री खंडोबा महाराजांचा उत्सव उत्साहात

### उत्सवानिमित्त श्रींचे मंदिरावर : लक्षवेधी विद्युत रोषणाई, पुष्प सजावट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी:** श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट, मेदनकरवाडी मध्ये श्रींचे मंदिरात श्री खंडोबा महाराजांचा उत्सव उत्साहात सुरू करण्यात आला. रथ सप्तमी दिनी परंपरेने मानाचे गाडा पूजन झाले. श्री खंडोबा महाराजांचे उत्सवा निमित्त परंपरेने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे श्रींचे पुजारी अरुण तोडकर यांनी सांगितले.

उत्सवानिमित्त श्रींचे मंदिरावर लक्षवेधी विद्युत रोषणाई, पुष्प सजावट करण्यात आली आहे. श्री खंडोबा महाराज यांचा पुष्प सजावटीने सजलेला वैभवी मानाचा गाडा पुजन, भंडार वाहत पूजा देखील उत्साहात झाली. यावेळी भाविकांनी दर्शनास गर्दी केली. रांगा लावून श्रींचे तसेच मानाचा गाडा दर्शन घेतले.

श्री खंडोबा महाराज यांचे सेवेकरी म्हणून चऱ्होली, कुरूळी आणि चाकण या परिसरातून मानकरी येत असतात. राज्यातून भाविक नवसाचा देव पावतो म्हणून येत असतात. पहाटे पाच वाजल्या पासून ते संध्याकाळी श्री खंडोबा महाराज यांची पुजा व देवाची पदे रथ सप्तमी दिनी गायली गेल्याचे सामाजिक कार्यकर्ते नवनाथ भुजबळ यांनी सांगितले.

श्री खंडोबा महाराज मंदिराचे सेवेकरी अरूण तोडकर आणि गावातील लहान, थोर मंडळी रथसप्तमी ते माघ पौर्णिमा पर्यंत देवाची परंपरेने पूजा करतात. रथसप्तमी दिनी श्रींची पूजा, आरती झाल्या नंतर भाविकांना अन्नदान महाप्रसादचे वाटप करण्यात आले. श्री खंडोबा महाराज यांचा मानाचा गाडा रथ सप्तमी दिनी परंपरेने पुजन झाल्या नंतर उत्सवातील कार्यक्रम सुरू होतात.

रथसप्तमी ते माघ पौर्णिमा श्री खंडोबा महाराजांचा उत्सव या नऊ दिवसांमध्ये गाड्या ला भाविक पाणी घालण्याची परंपरा कायम जतन केली आहे. मेदनकरवाडीतील श्री खंडोबा देवस्थान राज्यात सर्व परिचित प्रसिद्ध श्रीक्षेत्र आहे. मेदनकरवाडीत श्री खंडोबा मंदिरा समोर रथ सप्तमी निमित्त बैल गाडा पूजन तसेच भाविकांनी दर्शनास गर्दी करून प्रथा परंपरांचे पालन करीत श्री खंडोबा महाराजांचा उत्सव परंपरेने सुरु झाला होता.

श्री खंडोबा महाराजांचा मुख्य उत्सव माघ पौर्णिमा दिनी साजरा झाला. त्या निमित्त पहाटे ४ ते ६ श्रींची महापूजा, दुपारी महाआरती, त्या नंतर बैलगाड्यांची मिरवणूक, सायंकाळी पाचच्या सुमारास बारा गाड्यांचा परंपरेने येळकोट येळकोट, जय मल्हारचे गजरात उत्सव साजरा झाला. मेदनकरवाडी ग्रामस्थासाठी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. यात चितपट कुस्त्यांचा जंगी आखाडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम देखील होत आहे. पंचक्रोशीतील गावाचे बैलगाडे, पैलवान, नागरिक, भाविकांनी या उत्सवास उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थ आणि ट्रस्टचे वतीने करण्यात आले होते. यास परिसरातून मोठा प्रतिसाद मिळाला. माघी पौनिमा निमित्त मेदनकरवाडी येथील श्री खंडोबाचा उत्सव उत्साहात परंपरेने साजरा झाला.यावेळी मंदिरांसह परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, पुष्प सजावट करण्यात आली होती. भाविकांनी मोठ्या उत्साहात तळी भांडार केला. आरती, अभिषेक,पूजा उत्साहात झाली. माघ पौर्णिमे निमित्त यात्रा परंपरेने साजरी झाली. यावेळी बारा गाड्यांचे पूजन झाले. भाविक, नागरिकांची श्रींचे दर्शनास आणि बारा गाडे उत्सव पाहण्यास मोठी गर्दी झाली होती. पंचक्रोशीतील भाविक श्रींचे दर्शनास आले होते. मेदनकरवाडी ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ तसेच श्री खंडोबा मंदिर देवस्थान पदाधिकारी यांनी चोख नियोजन करून उत्साहात रंग भरला. उत्सवाचे नियोजन प्रमाणे यशस्वी उत्सव होण्यास परिश्रम घेतले.

## कोहिंडे येथे दिले भेकराला जीवदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खेड :** विहिरीच्या पाण्यात पडलेल्या एक वर्षाच्या भेकराला शेतकऱ्याच्या सतर्कतेने जीवदान मिळाले. कोहिंडे बु. ता. खेड येथील रौंधळवाडी गावच्या शिवारात गुरुवारी ही जीवदयेची घटना घडली. येथील शेतकरी रामदास चिखले यांच्या शेतातील विहिरीच्या पाण्यात विजपंप सुरू करायला गेल्यावर हे भेकरू पोहोत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी लगेच वन अधिकाऱ्यांना संपर्क साधला. राजगुरुनगर वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यादवराव जाधव यांनी तातडीने रेस्क्यू पथक पाठवले. या पथकाने घटनास्थळी जाऊन भेदरलेल्या आणि पाण्यात पोहुन दमछाक झालेल्या भेकराला बाहेर काढले. बाहेर आल्याबरोबर भेकराने झेप घेत डोंगर पठारावर पलायन केले. वनपरिक्षेत्र अधिकारी यादव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल प्रशांत जाधव, अंकुश बुट्टे, विशाल केदारी, कैलास दाभाडे, विश्वनाथ गिजरे यांनी रेस्क्यु पथकात सहभाग घेतला. तर शेतकरी रामदास चिखले यांसह ग्रामस्थ संदिप भागे, जिवन खंडे, अक्षय खंडे, रमेश कदम, उत्तम चिखले यांनी वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना सहकार्य केले.

परिसरात बिबट्या, हरीण , भेकर, सांबर, वानर, रानडुक्कर तसेच मोर असे पशू पक्षी मोठया प्रमाणात वावरताना आढळतात. खाद्य, पाणी यांच्या शोधात हे वन्य प्राणी, पक्षी मानव वस्तीकडे येऊ लागले आहेत. आज विहिरीत पडलेले भेकर देखील त्याचाच भाग असल्याचे मानले जात आहे.

## लाकडी ड्रम भरलेल्या ट्रकला आग

**आळंदी :** येथील उर्से येथून मुंबई पुणे महामार्गावरून निगडी ट्रान्सपोर्टनगर येथे जाणाऱ्या केबलसाठी लागणाऱ्या लाकडी ड्रमने भरलेले एका मालट्रकला गुरुवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास आग लागली. चालकाने सावधगिरी बाळगत देहूरोड पोलीस ठाण्यात ट्रक घातला. पोलिसांची धावपळ झाली. लागलीच तेथील पाण्याने ट्रक विझवण्यात आली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. सुमारे एक तास उलटून गेल्या नंतरही कॅन्टोन्मेंट बोर्ड अथवा इतर कोणतेही अग्निशामक वाहन आले नव्हते.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, उर्से येथील फिनोलेक्स केबल कंपनीतून केबल गुंडाळण्यासाठी असणारे लाकडी ड्रम घेऊन आझाद हिंद ट्रान्सपोर्ट कंपनीची एमएच १४ एएस ८२२९ हा मालट्रक मुंबई पुणे महामार्गावरून निगडी ट्रान्सपोर्टनगर येथे जात होता. देहूरोड पोलीस ठाणे पासून एक किलोमीटर अंतरावर असणाऱ्या सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयापाशी या ट्रकला अचानक आग लागली. आग थोडक्यात असताना गाडीतून धूर निघत असल्याचे पाहून, ट्रकच्या पाठीमागे असणारे दुचाकीस्वार कैलास पाटील व गोकुळ पाटील यांनी चालकाला सावध केले.

## पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलन उत्साहात संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेडचे सुपुत्र कवी नामदेव ढसाळ यांच्या अलौकिक साहित्याचा गौरव करणारे पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलन मुंबई येथे मंगळवारी संपन्न झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन झाले. संमेलनाध्यक्षपदी म. भा. चव्हाण तर स्वागताध्यक्ष अशोक टाव्हरे हे होते. संयोजन राजू खंडीझोड यांनी केले. कार्यक्रमस्थळाचे 'भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे साहित्यनगरी' असे नामकरण करण्यात आले होते.

८९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी ओघवत्या शैलीत नामदेव ढसाळांचे साहित्य व दलित पँथरचे कार्य विशद केले. गोलपिठापासून सुरू झालेला साहित्यप्रवास हा विश्वसाहित्यिक म्हणून अलौकिक असल्याचे मत व्यक्त केले. संमेलनाध्यक्ष चव्हाण यांनी नामदेव ढसाळांच्या कर्मभुमीत अशोक टाव्हरे यांनी परिश्रम घेऊन आयोजित केलेले साहित्य संमेलन वाचनसंस्कृती वृध्दींगत होण्यासाठी मोलाचे ठरणार असल्याचे सांगितले. स्वागताध्यक्ष टाव्हरे यांनी प्रास्ताविकात या साहित्य संमेलनाचे दुसरे वर्ष असून यानिमित्त कवीसंमेलन, परिसंवाद याद्वारे नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध केले असल्याचे विचार मांडले.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कार्यावर पीएच.डी करणारे साहित्यिक डॉ. विलास तायडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच कुलस्वामिनी स्मरणिका, अशोक टाव्हरे यांच्या "आठवणीतील कोरोना" या कवितासंग्रहाचे तसेच केंद्रीय मंत्री गडकरी साहेबांच्या कार्यावरील "विकासाचा राजमार्ग" व "हायवे ऑफ डेव्हलपमेंट" या पुस्तकांच्या पुढील आवृत्तीचे प्रकाशन झाले.

याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक कांताराम सोनवणे, ललिता सबनीस, प्रकाश शितोळे, अनंत धनसरे, विजय कानवडे, निशिगंधा साकोरे, संजना मगर, अक्षता गोसावी तसेच उद्योजक राजेश मुलचंदानी, दशरथ पानमंद, नारायण मेघाजी लोखंडे यांचे वंशज गोपीनाथ लोखंडे, प्राचार्य सुनील टाव्हरे, चंद्रकांत सोनवणे, श्री अंबिका देवस्थानचे अध्यक्ष एकनाथ साबळे, कनेरसरच्या सरपंच सुनीता केदारी, दिलीप माशेरे, संतोष शेटे, अक्षय गायकवाड, कल्याणी पवार आदी मान्यवर व रसिक उपस्थित होते.

## सणसवाडीत अतिक्रमणांवर अखेर हातोडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी येथे पुणे अहिल्यानगर महामार्गावर दैनंदिन व औद्योगिक वाहतूकीमुळे दररोज वाहतूक कोंडी चौकात पुणे महानगर विकास प्राधिकरणच्या अतिक्रमण विरोधी कारवाई पथकाने बुधवारी दिवसभरात तब्बल १०५ बेकायदा गाळे व टपऱ्या सपाट केले. सणसवाडीतील महामार्गाने त्यामुळे मोकळा श्वास घेतला आहे.

**कारवाई**

सणसवाडी येथे दोनशेहून अधिक लहान मोठ्या कंपन्या, मोठ्या संख्येने कामगार व स्थानिक राहत असून दररोज रांजणगाव ते कारेगावपासून ये जा करणारी औद्योगिक वाहतूक तसेच पुणे संभाजीनगर महामार्ग वाहतूकमुळे सणसवाडी चौक सतत वाहनांच्या वर्दळीत राहतो. गेल्या काही दिवसांपासून येथील मुख्य चौकात मोठ्या संख्येने भाजी विक्रेते, वडापाव, चायनिज, स्वीटहोमसह अनधिकृत टपऱ्यांना पेव फुटल्याने, चौक अरुंद होत एकसारखी वाहतूक कोंडी होत होती.

पुणे महानगर विकास प्राधिकरणासह सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शिक्रापूर पोलिस यांनी जेसीबी, पोकलेन, क्रेन, वीस मंजूर सह तीनही विभागाचे दहा अधिकारी, पंधरा कर्मचाऱ्यांनी बुधवारी संयुक्त कारवाई करत मुख्य चौकातील महामार्गापासून दोन्ही बाजुंना ३० ते ५० फुट एवढ्या अंतरातील सर्व अतिक्रमण काढून टाकले. या कारवाई दरम्यान एकाही राजकीय पदाधिकाऱ्याने यात हस्तक्षेप केला नाही.

## मोकळा श्वास...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे

सणसवाडी : सणसवाडी येथील मुख्य चौकातील अतिक्रमणांवर मोठी कारवाई करण्यात आली. त्यामुळे रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

## खडिक्रशरच्या धुळीमुळे नागरिक त्रस्त



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** बेडशिंग (ता. इंदापूर) येथे स्टोन क्रेशर चालत आहेत. हे क्रशर चालू असताना येथे मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट तयार होत असतात. या लोटांमुळे परिसरातील नागरीक, शेतकऱ्यांची पिके, जनावरे यांचे आरोग्य धोक्यात येत आहे. परिसरातील नागरिकांनी याबाबत संबंधित विभागाकडे तक्रार करूनही, त्यांची दखल घेतली जात नसल्याचे नागरिकांची तक्रार आहे.

स्टोन क्रेशरच्या तसेच खडी वाहतूक करणारी मोठमोठी वाहने क्रेशर ते इंदापूर बाह्य वळणाकडे सतत येजा करत असतात. या मोठमोठ्या वाहनांमुळे बेडशींग ते इंदापूर बाह्यवळणापर्यंतच्या रस्त्याच्या लगतच्या घरांना तसेच पिकांना व या रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना या वाहनांच्या धुळीचा त्रास होत आहे. या सर्व बाबींची संबंधित विभागाने त्वरित दखल घेऊन, परिसरातील नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

### खेड पंचायत समितीच्या माध्यमातून मंजुरी पत्राचे वाटप

## कडबा-कुट्टीसाठी खेडमधील ३२२ शेतकऱ्यांची निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खेड :** जिल्हा परिषद निधी सन २०२४-२५ अंतर्गत ७५% (डीबीटी) योजनेअंतर्गत कडबा कुट्टी यंत्र खरेदीसाठी खेड तालुक्यातील ३२२ शेतकऱ्यांची निवड झाली आहे. या शेतकऱ्यांना खेड पंचायत समितीच्या माध्यमातून मंजुरी पत्राचे वाटप आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले.

जिल्हा परिषद निधी सन २०२४-२५ अंतर्गत ७५% योजनेत निवड झालेल्या लाभार्थी शेतकऱ्याला साहित्य अनुदानावर थेट लाभ हस्तांतरण थेट पूर्व संमती देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत २ एचपी इलेक्ट्रीक कडबाकुट्टी यंत्र (मोटारसह) १७,५३० रुपयांचे अनुदान उपलब्ध झाले आहे. तालुक्यातील ३२२ शेतकरी लाभार्थी आहेत. कडबाकुट्टी यंत्र घेण्यासाठी २४ हजार रुपये मंजूर झाले असून, लाभार्थींना जिल्हा परिषदेकडून ७५ टक्के म्हणजे ५६ लाख ४४ हजार ६६० रुपये अनुदान मिळणार आहे.

आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते निवडपत्र खेड पंचायत समितीमध्ये लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी विशाल शिंदे, पंचायत समिती कृषी सोनाली पवार, विस्तार अधिकारी आर पी चांदगुडे, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील भोईर, शिवप्रकाश वांगस्कर. सरपंच परिषदेचे अध्यक्ष मनोहर पोखरकर,चंद्रकांत भालेराव, राहुल मलघे, संतोष राक्षे, दत्ता सातपुते यांच्यासह मोठ्या संख्येने लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे यांनी सांगितले, खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना कडबा कुट्टी घेण्यासाठी निधी मिळावा यासाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे कडे पाठपुरावा केला. दौंड तालुक्यातील ३२३ आणि खेड तालुक्यातील ३२२ शेतकरी पात्र झाले आहेत. खेड तालुक्यात शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे असून त्यांच्याकडे दुभत्या जनावरांसह इतर जनावरांची संख्या जास्त आहे. त्यांना कडबाकुट्टी यंत्राची गरज होती. डीबीटी तत्वावर तालुक्यातील शेतकऱ्यांना आज पत्र देण्यात आले आहे. त्यांनी चांगल्या दर्जाचे कडबाकुट्टी मशीन खरेदी करावे.

#रा

» Selected

## टँकर आडवा आल्याने कारचा चक्काचूर



**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील पुणे-नगर महामार्गावर कार समोरून अचानकपणे भरधाव टँकर आडवा आल्याने झालेल्या अपघातात कारचा चक्काचूर होऊन तिघे गंभीर जखमी, तर तिघे किरकोळ जखमी झाले. या अपघातात कारच्या पुढील भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला. शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे भास्कर भानुदास भगत या टँकर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिक्रापूर येथील पुणे-नगर महामार्गावरुन सोमनाथ मिसाळ हे त्यांची मुलगी, नात तसेच चालक मित्र यांच्या सोबत त्यांच्या कारमधून अहमदनगरच्या दिशेने जात असताना बजरंगवाडी येथे अचानकपणे टँकर भरधावपणे रस्त्यावर आला. यावेळी मिसाळ यांची कार टँकरच्या खाली शिरली. या अपघातात सोमनाथ हरिबा मिसाळ (वय ७२, रा. बऱ्हाणपूर ता. भूम जि. धाराशिव), कार चालक सोहम संजयकुमार शहा (रा. बऱ्हाणपूर ता. भूम जि. धाराशिव) तसेच टँकर चालक भास्कर भानुदास भगत (रा. लोणीकंद ता. हवेली) हे गंभीर तर सोमनाथ मिसाळ यांची मुलगी विद्या बळीराम लोंढे, नात स्वामिनी बळीराम लोंढे व श्रुती बळीराम लोंढे हे किरकोळ जखमी झाले. या अपघातात कारच्या पुढील भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला. सोमनाथ हरिबा मिसाळ यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी भास्कर भानुदास भगत या टँकर चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## जिल्हा दूध संघाच्या अध्यक्षपदी ॲड. स्वप्निल ढमढेरे; जल्लोषात मिरवणूक



**शिक्रापूर :** तळेगाव ढमढेरे येथील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते ॲड. स्वप्निल बाळासाहेब ढमढेरे यांची पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाली असून, निवडीनंतर ढमढेरे यांची गावातून जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. तळेगाव ढमढेरे येथील पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे संचालक व जिल्हा राष्ट्रवादी क्रिडा संघटनेचे अध्यक्ष असलेले शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते ॲड. स्वप्निल ढमढेरे यांची जिल्हा दूध संघाच्या अध्यक्षपदी निवडीनंतर तळेगाव ढमढेरे येथे त्यांचे जल्लोषात स्वागत करत कार्यकर्त्यांकडून फटाक्यांची आतषबाजी व गुलाल उधळत करत एकामेकांना पेढे भरवून गावातून जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. स्वप्निल ढमढेरे यांचे त्याच्या राहत्या घरी तसेच मिरवणुकी दरम्यान ठीक ठिकाणी औक्षण करण्यात आले.

जिल्हा दूध संघाचे संचालकपद स्वप्निल ढमढेरे यांचे वडील बाळासाहेब ढमढेरे यांनी ३७ वर्षे संचालकपद भूषविले मात्र त्यांचे अध्यक्षपदाचे अपूर्ण राहिलेले स्वप्न माझ्या माध्यमातून पूर्ण झालेले असून, उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून मला मिळालेल्या संधीचे सोने करेन, तसेच दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटीबध्द असल्याचे जिल्हा दूध संघाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष स्वप्निल ढमढेरे यांनी सांगितले.

## रामलिंग यात्रेला महाशिवरात्रीपासून प्रारंभ; तहसिल कार्यालयात बैठक

**शिरूर :** पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील शिरुर शहरासह पंचक्रोशीचे आराध्य दैवत प्रभू श्री रामलिंग महाराजांच्या महाशिवरात्रीला होत असलेल्या यात्रा महोत्सवास यंदा 51 वर्षे पूर्ण होत असल्याने यात्रेची जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. तीन दिवस चालणाऱ्या यात्रा उत्साहाच्या नियोजनाची बैठक शिरूर तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शिरूर शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर श्री रामलिंग मंदिर असून, या मंदिरातील शिवलिंगाची स्थापना खुद प्रभू श्री रामचंद्रांनी केल्याची आख्यायिका आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला या देवस्थानची मोठी यात्रा भरते. दि. २५ फेब्रुवारीला शिरूर येथून रामलिंग येथे पालखीचे प्रस्थान होत आहे . दि. २६फेब्रुवारी रोजी रामलिंग येथे महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रेचे आयोजन केले जाते. लाखो भाविक भक्त या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येत असतात. दि. २७ फेब्रुवारी या दिवशी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजित केली जाणार आहे.

# सुर्वे समितीचा अहवाल सादर करणार

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आदेश







■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत सुर्वे समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल, त्यासाठी आवश्यक अहवाल संबधित विभागाने तयार करावेत, असे आदेश जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.

दौंड तालुक्याशी निगडीत जलसंपदा विभागाच्या विषयांबाबत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार राहुल कुल यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बैठक आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीत तालुक्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या जलसिंचन योजनांच्याबाबत मंत्री विखे यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली. यावेळी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे व अस्तरीकरण करणे या कामासाठी सुमारे ४३८.४८ कोटी रुपयांच्या कामाला राज्य मंत्रिमंडळाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल मंत्री विखे यांचे तालुक्याच्या वतीने सत्कार करीत आमदार कुल यांनी आभार मानले.

विखे म्हणाले की, खडकवासला ते फुरसुंगी बंदनळी कालवा कामासाठी राज्य शासनाकडून २२०० कोटी रुपये निधी मंजूर केला असून त्याचे कार्यारंभ आदेश दिला आहे. त्यासाठी आवश्यक पर्यावरण व वन विषयक मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहे. तातडीने काम सुरु करण्याचे आदेशही दिले. जुना मुठा उजवा कालवा (बेबी कॅनॉल) अस्तरीकरण व दुरुस्तीसाठी १८० कोटी रुपये राज्य शासनाकडून मंजूर केले असून त्याची सुरु असलेली कामे गतिमान करावीत व शेतकऱ्यांच्या आवर्तनावर परिणाम होणार नाही याची देखील काळजी घावी, अशा सूचनाही केल्या आहेत. यावेळी अपर मुख्य सचिव दीपक कपूर, कार्यकारी संचालक अतुल कोपोले, प्रकल्प समन्वयक संजय बेलसरे, मुख्य अभियंता हनुमंत गुनाले, हनुमंत धुमाळ, जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मौजे कुपटेवाडी, (ता. दौंड) येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईन करणेसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे १७.४३ लाख निधी उपलब्ध झाला असून, पुढील महिनाभरात सर्वेक्षण पूर्ण करावे तसेच नव्याने समविष्ट करायचे तलाव समाविष्ट करून जास्तीत जास्त वंचित भागाला पाणी द्यावे अशा सूचना केल्या. चिबड, खारवट व पाणथळ शेतजमिनी निर्मूलनासाठी धोरण ठरविणे कार्यवाही सुरु आहे.

### वंचित भागाला पाणी द्यावे

● पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मौजे कुपटेवाडी, (ता. दौंड, जि. पुणे) येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाइपलाइन करणेसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे १७.४३ लक्ष निधी उपलब्ध झाला असून, पुढील महिनाभरात सर्वेक्षण पूर्ण करावे तसेच नव्याने समविष्ट करायचे तलाव समाविष्ट करून जास्तीत जास्त वंचित भागाला पाणी देण्यात यावे अशा सूचना केल्या.

### उजनीसाठी नवे बॅरेजेस

● दौंड (जि. पुणे) तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅक वॉटर क्षेत्रात नवीन बॅरेजेस बांधणेसाठी सुधारित धोरण ठरविण्याची मागणी केली आमदार राहुल कुल यांनी केली असुन त्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली असून, यामुळे दौंड, शिरूर, श्रीगोंदा, कर्जत, करमाळा परिसरातील शेतकऱ्यांना देखील याचा फायदा होणार असल्याने त्यावर तातडीने कार्यवाही करावी असे आदेश मंत्री विखे पाटील यांनी दिले. मुळा मुठा व भीमा नदीवर अस्तित्वातील सर्वच बंधारे बॅरेजेसमध्ये रूपांतर करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांना मान्यता द्यावी, असे आदेश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

# आळंदीतील पाण्याची समस्या कायम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रापैकी आळंदी हे प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. सद्यस्थितीत आळंदीत रस्ते विकास व विविध ठिकाणी सुशोभीकरणाची विकास कामे पूर्ण होत असली तरी पाण्याची समस्या अजून ही सुटली नाही. गावात नदी असून ती जल प्रदूषणामुळे उपयोगी पडत नाही. व गावात दिवसेंदिवस पाण्याच्या समस्येत अजून वाढच होताना दिसून येत आहे.

आळंदी शहरामध्ये पाणीपुरवठा होत असताना खेड विभागात विभाग टप्प्या नुसार दोन दिवस तर हवेली विभागात एक दिवस असा सद्यस्थितीत पाणीपुरवठा होत असून म्हणजेच तिसऱ्या दिवशी आळंदीकरांना (पाणीपुरवठ्याची मर्यादा वेळ) दीड तास पाणीपुरवठा होत आहे. त्यात ही समस्या उद्भवल्यास चौथ्या दिवशी पाणीपुरवठा होत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून या अवेळीत होणाऱ्या पाणीपुरवठ्या बाबत वेळोवेळी म्हणेणे मांडले जाते. शहरात पाणी पुरवठ्याचे टप्पे ठरले असून त्या टप्प्यात त्या भागास दीड तास पाणीपुरवठा गेला जातो. पाइपलाइन फुटणे, मुख्य केंद्रावरील दुरुस्ती अशा समस्या उद्भवल्यास शहरात पाणी पुरवठा अजून उशिराने होत असतो.

डिसेंबर २०१९ मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी समीर भूमकर व पाणीपुरवठा अधिकारी अक्षय शिरगिरे यांच्या कालावधीत आळंदी शहराला दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय झाला.त्यावेळेस काही लोकप्रतिनधीं सुद्धा या दिवसाआड पाणीपुरवठाला संमती दर्शवली होती. इंद्रायणी नदीचे होणारे वारंवार जलप्रदूषण व त्या जल प्रदूषणामुळे उद्भवणाऱ्या समस्या यामुळे दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय घेतला गेला त्यास ५ वर्षे होऊन गेली आहेत.

भामा आसखेड धरणातील पाणी कुरुळी जॅकवेलमधून १४ फेब्रुवारी २०२२ रोजी आळंदी शहरात प्राथमिक सराव चाचणीद्वारे पाणी दाखल झाले.

### दोन दिवसांआड पाणी पुरवठा

● शहरात दिवसाआड पाणीपुरवठा होत होता त्यात आता या काही गेल्या महिन्यांपासून आळंदीकरांस तिसऱ्या दिवशी (पूर्ण दोन दिवस होऊन त्यानंतर) पाणीपुरवठा होत आहे. तर अडचणी आल्यास चौथ्या दिवशी पाणीपुरवठा होत आहे. दिवसाआड होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या या वेळेत बदल झाल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहे. दोन दिवसानंतर तिसऱ्या दिवशी शहरात नागरिकांना दीड तासच पाणी भेटत असल्याने पाण्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

# खडकवासलाचे उन्हाळी आवर्तन रखडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कालवा सल्लागार समितीची बैठक न झाल्याने खडकवासला धरणातून सोडण्यात येणारे शेतीसाठीचे उन्हाळी आवर्तन रखडले आहे. कडकडीत उन्हामुळे दौंड, हवेली, इंदापूरसह जिल्ह्यातील ६६ हजार हेक्टर शेतीसह परिसरातील लाखो नागरिक आवर्तनाअभावी तहानलेली आहेत.

सल्लागार समितीची बैठक तातडीने घेऊन या महिनाअखेरीस उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार असल्याचे खडकवासला जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे. खडकवासला धरणसाखळीत गुरुवारी सायंकाळी १८.६३ टीएमसी (६३.२० टक्के) इतका पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीपेक्षा धरणसाखळीत यंदा सुमारे २ टीएमसी अधिक पाणी आहे.

गेल्या वर्षी सद्य:स्थितीत धरणसाखळीत १६.८६ टीएमसी (५७.८४ टक्के) इतका पाणीसाठी होता. खडकवासला धरणातून शेतीसाठीचे आवर्तन बंद असल्याने सध्या केवळ वरसगाव धरणातून ६०० क्युसेक पाणी खडकवासलात सोडण्यात येत आहे. एवढेच पाणी पुणे शहर परिसरातील नागरिकांसाठी सोडण्यात येत असल्याने खडकवासला धरणातील पाण्याची पातळी ३६ टक्क्यांवर खाली गेली आहे.

जानेवारीमध्ये खडकवासलातून शेतीचे रब्बी आवर्तन बंद करण्यात आले. त्यानंतर जवळपास दोन महिने शेतीचे पाणी बंद असल्याने धरणसाखळीत सध्या गतवर्षीपेक्षा अधिक पाणीसाठा शिल्लक आहे.

दौंड, हवेलीसह खडकवासलाच्या लाभ क्षेत्रातील उन्हाळी आवर्तनाचे पाणी सोडण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

# लग्नसराईमुळे अडगळीतले जाते बाहेर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** सध्या दगडी जात्याचा वापर लग्नकार्या शिवाय होतच नाही. पूर्वीच्या काळी महिला पहाटेच्या वेळी उठून जात्यावर दळण दळायच्या. परंतू आता मात्र घरोघरी घरघंटी (इलेक्ट्रिक पिठाच्या गिरणी) दिसतात. त्यामुळे जात्याचा वापर अजिबात होत नाही. त्यामुळे जुनी दगडी जाती अडगळीतच पडून असतात. परंतू सध्याच्या लग्नसराईच्या हंगामात मात्र ही जाती आता बाहेर आल्याचे चित्र दिसत आहे.

लग्नसराईमुळे जुन्या जात्यावरची गाणी सध्या ग्रामीण भागात कानावर पडू लागली आहेत. भारतीय समाजात १६ संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यापैकी एक म्हणजे लग्न सोहळा. एक संस्कार म्हणून आपल्याकडे लग्नकार्य केले जाते. ग्रामीण भागात या सोहळ्याची लगबग औरच असते. लग्न समारंभात हळदीचा अगदी महत्त्वाचा कार्यक्रम असतो. अलिकडे हळदीचा कार्यक्रम देखिल पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. आता त्यासाठी अंगणात सजावट, विद्यूत रोषणाई केली जाते.

### जात्यावरची गाणी

**"जात्या ईसवरा तुला सुपारीचा डाव**
**गं सईबाई,पार्वती साठी नवरा झाला महादेव।**
**"हळद कशी कशी पिवळी माझी ओटी,**
**गं सईबाई रुक्मिणी बाईला बांधिते कपाळपट्टी।**
**"मांडवाच्या दारी नवरी कशाला वाकली,**
**गं सईबाई रुक्मिणीबाईची साडी तोड्याला गुंतली॥**

## "जात्या ईसवरा तुला सुपारीचा डाव"

छायाचित्र - रोहित खुडे.



राष्ट्रसंचार EXCLUSIVE

रांजणी लगीनघाई: सध्या लग्नसराई सुरू झाल्याने घरातील अडगळीमध्ये ठेवलेली दगडी जुनी जाती बाहेर काढली जात आहेत. लग्नसराईत दगडी जात्यांवर हळद दळताना महिला वर्ग.

# सायबर कॅफेमध्ये अश्लील चाळे

## चालकाविरोधात गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**शिक्रापूर :** सायबर कॅफेमध्ये अश्लील वर्तन करण्यास मुभा देणाऱ्या शहरातील रेव्हन्यू कॉलनीतील 'द स्टीम रुम कॅफे' चालकावर पोलीसांनी कारवाई करत ऋषीकेश रामदास ढवळे (वय २३, रा. ढवळगाव ता. श्रीगोंदा जि.अहील्यानगर) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना शिरूर शहरातील वेगवेगळ्या कॅफे चालकांनी त्यांच्या कॅफेमध्ये अवैध पार्टीशन केली असून, शाळेतील व कॉलेजमधील मुले-मुली तेथे येत असभ्य व अश्लील वर्तन करत असल्याची माहीती मिळाली होती. त्यानुसार महिला पोलीस हवालदार जाधव पो.कॉ. शिंदे, पो.कॉ थोरात पो.कॉ आव्हाड यांनी साध्या वेषात शहरातील रेव्हेन्तू कॉलनी येथील द स्टीम रुम कॅफे येथे जावुन नाष्टा ऑर्डर केला. तेथे ते बसले असता, त्यांना काही मुले व मुली येवुन पार्टीशन केलेल्या रूममध्ये अश्लील चाळे करताना दिसून आले.

याबाबत शिरूर पोलीस स्टेशनचे पो.कॉ रविंद्र बापुराव आव्हाड यांनी कॅफे चालक ऋषीकेश रामदास ढवळे याच्या विरुध्द शाळकरी मुलामुलींना अश्लील वर्तन करण्यास मुभा दिल्याबद्दल गुन्हा दाखल केला.

## पुरंदरमधील शेतकऱ्यांचा प्रश्न, अपेक्षित पाण्यापासून वंचित

# जानाई शिरसाई योजना नेमकी कोणासाठी?



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर:** राज्य शासनाने पुरंदर, दौंड आणि बारामती तालुक्यातील शेतीच्या पाण्यासाठी तयार केलेल्या जानाई शिरसाई योजनेसाठी नुकतेच ४८३ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यातून योजनेतील वितरीकांना बंद पाइपलाइनमधून पाणी देण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे; परंतु योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत पुरंदरच्या वाट्याला अपेक्षित पाणी मिळालेच नाही. शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे धरणातून पाणी सोडले जाते खरे, मात्र पुरंदरच्या शेतकऱ्यांना पाण्याचा लाभच मिळत नसेल आणि दुष्काळाला कायमच तोंड द्यावे लागत असेल तर या योजनेचा फायदा कोणासाठी, हा प्रश्न आता पुरंदरचे शेतकरी उपस्थित करीत आहेत.

खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर ही धरण साखळी शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावे यासाठी उभारण्यात आली होती. मात्र मागील १० वर्षांत योजनेला खडकवासला धरणातून कधीच पाऊण टीएमसीपेक्षा अधिक पाणी उपलब्ध झालेले नाही.

### वीर धरणातील पाण्याकडे दुर्लक्ष

● गुंजवणी, भाटघर, वीर नदीतून नीरा नदीत पाणी वाहत जाते. तर नीरा नदीतून दरवर्षी तब्बल १०० टीएमसी पाणी कर्नाटकमध्ये जाते. मात्र याकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. त्याऐवजी तेच पाणी उचलून जेजुरीच्या नाझरे धरणात सोडल्यास तेथून पुरंदरच्या पूर्व भागातील दुष्काळी गावांसह बारामती तालुक्यातील दुष्काळी भागाला देणे शक्य आहे. त्यातून परिसरात मोठमोठे बंधारे बांधता येईल आणि बंधारे, तलाव मधून शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याचाही कायमचा प्रश्न मिटण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाने जानाई शिरसाई योजनेसाठी मंजूर केलेले ४३८ कोटी नीरा नदीवरील प्रकल्पासाठी द्यावेत, अशी मागणी होत आहे.

### पुण्याची तहान भागेना...

● जसजशी पुण्याची वाढ होत गेली तसा शेतीला मिळणारा पाण्याचा साठा कमी कमी होत गेला. खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर या चार धरणांची पाणीसाठा क्षमता २९ टीएमसी आहे. पुण्याला ११.५ टीएमसी पाणी पिण्यास मंजूर आहे; मात्र सध्या पुण्याला २०.७८ टीएमसी पाणी दिले जाते. याशिवाय पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात होते. त्यात आता महापालिकेने आपली हद्दवाढ करून ३४ गावे नव्याने महापालिकेमध्ये समाविष्ट केलेली आहेत. याचा अर्थ भविष्यात शेतीला दिल्या जाणाऱ्या पाण्यावर मोठ्या प्रमाणावर गंडांतर येणार हे निश्चित. खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर या चार धरणातील पाणीसाठा क्षमता २९ टीएमसी असून यापैकी तब्बल २१ टीएमसी केवळ पुण्याला पिण्यासाठी दिले जाते. तसेच पुढील दहा वर्षांचा विचार केल्यास लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढणार असून संपूर्ण २९ टीएमसी पाणी पुण्यालाच लागणार आहे. मग शेतीला कधी पाणी मिळणार ?

#रा

RASHTRA SANCHAR/ PUNE/ Marathi/ RNI Reg. No. MAHMAR/2023/89220
शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५
राष्ट्रसंचार १२
BREAKING NEWS AND MORE www.rashtrasanchar.com @rashtrasanchar



"भारतीय संघात के. एल. राहुल व रिषभ पंत हे दोन अव्वल दर्जाचे यष्टिरक्षक संघामध्ये आहेत. एकाच वेळी दोन्ही खेळाडूंना संघात स्थान देण्यात येऊ शकत नाही. सध्या तरी एक नंबरचा यष्टिरक्षक के. एल. राहुलच आहे. रिषभ पंतने संधी मिळण्याची प्रतीक्षा करायला हवी. यशस्वी जयस्वाल याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत ठसा उमटवला होता. त्यामुळे इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय लढतीत त्याला खेळवावे लागले. एका लढतीतील कामगिरीने यशस्वीच्या खेळाची तुलना करू नये, हे मला मान्य आहे; पण श्रेयस हा महत्त्वाचा खेळाडू आहे. चॅम्पियन्स करंडकाआधी खेळाडूंच्या खेळाची चाचपणी करण्यासाठी फक्त तीनच लढती आमच्याकडे होत्या. श्रेयस हा तीनही लढतींमध्ये खेळला, ही चांगली बाब आहे. जसप्रीत बुमरा चॅम्पियन्स करंडकासाठी संघात नाही आहे.

— गौतम गंभीर

Nippon india Mutual Fund
Wealth sets you free

Mutual Fund Investor Awareness Program

To increase awareness about Mutual Funds, we conduct Investor Awareness Programmes (IAPs) across the country. Schedule of upcoming IAP is as mentioned below:

| Date | Time | Location |
|---|---|---|
| 15th Feb, 2025 | 07:00 PM | Pune |

Venue: Hotel Orbett, 238/2, Apte Rd, Shivajinagar, Pune, Maharashtra - 411004.
Name: Sumit Rathod | Mob. No.: 8433598437
Nippon Life India Asset Management Limited | CIN : L65910MH1995PLC220793
Good gets better
Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

# श्रीलंकेचा मोठा विजय

## कांगारूचा पराभव : श्रीलंकेने मालिका विजयाची केली नोंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**कोलंबो :** चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या संघाला धक्क्यांमागून धक्के बसताना दिसत आहेत. पॅट कमिन्स, जोश हेझलवूड, मिचेल स्टार्क, मिचेल मार्श व मार्कस स्टॉयनिस या स्टार खेळाडूंनी चॅम्पियन्स ट्रॉफीतून माघार घेतली आहे. त्यामुळे दुसऱ्या फळीतील खेळाडूंसह दोन वेळच्या विजेत्यांना चॅम्पियन्स ट्रॉफीत उतरावे लागणार आहे. या संघाला सराव मिळावा यासाठी श्रीलंकेविरुद्ध दोन वन डे सामन्यांच्या मालिकेचे आयोजन केले गेले. त्यात ऑस्ट्रेलियाला सपाटून मार खावा लागला. ऑस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या वन डे सामन्यांत १७४ धावांत तंबूत परतला.

प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ५० षटाकंत ४ बाद २८१ धावा केल्या. श्रीलंकेने पहिली वन डे जिंकून मालिकेत आधीच १-० अशी आघाडी घेतली होती. आज कुशल मेंडिसने ११५ चेंडूंत ११ चौकारांसह १०१ धावांची खेळी केली. त्याला निशान मदुष्का ( ५१) व कर्णधार चरिथ असलंका ( ७८) यांच्या अर्धशतकांची साथ मिळाली. जनिथ लियानागेने २१ चेंडूंत ३२ धावांची नाबाद खेळी करून धावसंख्येत हातभार लावला.

ऑस्ट्रेलियाच्या बेन डॉरशूस, आरोन हार्डी, सीन एबॉट, ॲडम झम्पा यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचे फलंदाज ढेपाळले. कर्णधार स्टीव्ह स्मिथ ( २९), जॉश इंग्लिस ( २२) व ट्रॅव्हिस हेड ( १८) हे संघाकडून सर्वाधिक धावा करणारे फलंदाज ठरले. ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ २४.२ षटकांत १०७ धावांत तंबूत परतला. श्रीलंकने १७४ धावांनी हा सामना जिंकला आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धचा हा त्यांचा सर्वात मोठा विजय ठरला.


श्रीलंकेच्या दुनिथ वेलालागेने ४, तर असिथ फर्नांडो व वनिंग हसरंगा यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. या सामन्यानंतर महेश थिक्षणा म्हणाला, गेल्या दोन सामन्यांमधील संघाच्या कामगिरीबद्दल खरोखर आनंदी आहे.

संघातील आत्मविश्वास आणि वातावरण खरोखरच छान आहे. त्यांच्याकडे ७ किंवा ८ उजव्या हाताचे गोलंदाज होते, आमच्याकडे एक उत्तम लेग-स्पिनर आणि एक डावखुरा फिरकी गोलंदाज आहे, त्यांनी आमच्यासाठी काम केले.

## न्यूझीलंडला चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी मोठा धक्का!

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ सुरू होण्यास आता काही दिवसच शिल्लक आहेत, पण त्याआधी संघ आपल्या अधिकृत पथकांमध्ये काही बदल करताना दिसून येत आहेत, ज्यामध्ये आता न्यूझीलंड संघातील एका नावाचाही समावेश करण्यात आला आहे. किवी संघाला स्पर्धा सुरू होण्यापूर्वीच वेगवान गोलंदाज बेन सीयर्सच्या रूपाने मोठा धक्का बसला आहे. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे तो संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे. न्यूझीलंड क्रिकेटने बेनच्या जागी बदली खेळाडूचे नाव जाहीर केले आहे. किवी संघ नुकताच पाकिस्तानमध्ये पोहोचला आहे.

## इन्फोसिस, केपीआयटी, युबीएस उपांत्य फेरीत !!



**पुणे :** टीआरपीएस मॅनेजमेंट, अतुल ट्युटोरीयल्स् आणि लायन्स् क्लब पुणे रहाटणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तर्फे पहिल्या 'टीआरपीएस कॉर्पोरेट करंडक' टी-२० क्रिकेट स्पर्धेत इन्फोसिस, केपीआयटी आणि युबीएस या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव स्पर्धेच्या उपांत्य फेरीमध्ये प्रवेश केला. हिंजेवाडी येथील फोरस्टार मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये संदीप देवोल याने केलेल्या ७५ धावांच्या जोरावर युबीएस संघाने ब्रिटीश पेट्रोलियम संघाचा ५३ धावांनी सहज पराभव केल. संदीप याने फटकावलेल्या ७५ धावांमुळे युबीएसने पहिल्यांदा फलंदाजी करताना १५१ धावांचे आव्हान उभे केले होते. याला उत्तर देताना ब्रिटीश पेट्रोलियम संघाचा डाव ९८ धावांवर मर्यादित राहीला. पार्थ गायकवाड याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर केपीआयटी संघाने बॉश संघाचा १०१ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळताना केपीआयटी संघाने शुभम झापडेकर याच्या नाबाद ७७ धावांच्या जोरावर १६८ धावांचे लक्ष्य ठेवले. याचा पाठलाग करताना बॉश संघाचा डाव ६७ धावांवर गडगडला. आशय पालकर याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे इन्फोसिस संघाने विप्रोचा पराभव केला.



१० फेब्रुवारी रोजी एडवोकेट प्रसन्न दादा जगताप माजी महापौर पुणे महानगरपालिका यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित स्नेही व मान्यवर यांच्या हस्ते दादा व त्यांच्या पत्नी प्रसन्न जगताप यांचा सत्कार करण्यात आला यावेळी त्यांना सोन्याचा मुलांना दिलेली गाय वासरू ची तेजोमय मूर्ती प्रदान करण्यात आली त्यावेळी त्यांचे स्नेही किशोर कुलकर्णी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोल्हापूरच्या स्वाती शिंदचे सुवर्ण स्वप्न साकार; मल्लांनी केली २ रौप्य व ६ कांस्य पदकांची कमाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** कोल्हापूरच्या जिगरबाज स्वाती शिंदेने गेली दशकभर ऊराशी बाळगलेले राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकाचे स्वप्न उत्तराखंडात साकार केले. आदर्श पाटीलला रौप्य पदकावर समाधान मानाने लागले.

रोशनाबाद येथील योगस्थळ हॉलमधील कुस्ती मैदानात महाराष्ट्राच्या यशाचा जल्लोष शेवटच्या दिवशीही घुमला. ५३ किलो वजन गटात स्वाती शिंदेने मध्य प्रदेशच्या पुजा जाटला ५-१ गुणांनी नमवून स्पर्धेतील महाराष्ट्रासाठी कुस्तीतील एकमेव सुवर्णयश संपादन केले. उपांत्य फेरीत कुस्तीला २५ सेकंद बाकी असताना दंगल चित्रपटाची आठवण करून देणारा ४ गुणांचा साईट थ्रो मारून स्वातीने हरियाणाच्या ज्योतीला नमवून कुस्तीशौकिनांची मने जिंकली होती.

मध्य प्रदेशची आंतरराष्ट्रीय कुस्तीगीर पूजा जाट विरूध्द स्वाती शिंदने कडवी झुंज दिली. पहिल्या फेरीमध्ये स्वातीत केवळ १ गुणांनी आघाडीवर होती. दुसऱ्या फेरीमध्ये स्वातीने भारंदाज डावावर सलग ४ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली. लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय कुस्ती संकुल प्रशिक्षक दादा लवटे यांच्या मार्गदर्शन स्वातीला मिळत आहे.

अंतिम लढतीत तुफानी कुस्ती करीत स्वातीन मैदान गाजवले. ७४ किलो फ्रीस्टाईल गटात कोल्हापूरचा आदर्श पाटील सेनादलाचा जयदिप १०-० गुणाने पराभूत व्हावे लागले. हरिद्वार येथे संपलेल्या कुस्ती स्पर्धेत १ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्य अशी ९ पदकांची लूट महाराष्ट्राच्या मल्लांनी केली. स्वाती शिंदेने सुवर्ण, भाग्यश्री फंड, आदर्श पाटीलने रौप्य, तर अक्षय डेरे, हर्षवर्धन सदगीर, अमृता पुजारी, हितेश सोनावणे , दिग्विजय भोंडवे, पै.अश्लेशा बागडे, आदर्श पाटील यांनी कांस्य पदकावर नाव कोरले.

## दिल्ली कॅपिटल्स महिला संघाचा पीवायसी येथे कसून सराव



**पुणे :** महिला प्रीमियर लीग (डब्लूपीएल) टी २० क्रिकेट स्पर्धेसाठी दिल्ली कॅपिटल्स महिला संघाची पूर्वतयारी व सराव शिबिर पुण्यातील पीवायसी हिंदू जिमखाना मैदानावर १ ते १० फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अत्यंत उत्साहात पार पडले. या शिबिरात दिल्ली कॅपिटल्सच्या सर्व प्रमुख महिला खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ऑस्ट्रेलियाची कर्णधार व पाच वेळा महिला विश्वचषक जिंकणारी आंतरराष्ट्रीय महिला खेळाडू मेग लॅनिंग हिच्या नेतृत्वाखाली फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षचा सराव पीवायसी हिंदू जिमखानाच्या सुसज्ज मैदानावर अत्यंत नियोजनबद्धरित्या पार पडला. यावेळी खेळाडूंनी प्रख्यात प्रशिक्षक जोनाथन बॅटी यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव केला व पीवायसीच्या सर्व सुविधांचा पुरेपूर वापर केला. शिबिराच्या अखेरच्या टप्प्यात शनिवार, ८ फेब्रुवारी व रविवार ९ फेब्रुवारी २०२५ रोजी भारताचा माजी कर्णधार सौरभ गांगुली याने शिबिराला भेट दिली. दिल्ली कॅपिटल्सच्या सर्व प्रमुख फलंदाजांनी गांगुलीच्या देखरेखीखाली नेटमध्ये फलंदाजीचा विशेष सराव केला. यावेळी गांगुलीने प्रत्येक महिला फलंदाजाला खेळाचे बारकावे समजून सांगत सूचना केल्या. सर्व महिला खेळाडूंनी सौरभ गांगुली यांच्या मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त केले. सौरभ गांगुली व दिल्ली कॅपिटल्सच्या सर्व खेळाडूंनी पीवायसी हिंदू जिमखानाच्या मैदानाची आणि तेथील सर्व सरावाच्या सुविधांची प्रशंसा केली. या सुविधा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असून त्यामुळे डब्लूपीएल स्पर्धेची कसून तयारी करणे आम्हाला शक्य झाले, असे या खेळाडूंनी सांगितले. दिल्ली कॅपिटल्स संघाच्या सरावाचे आयोजन व समन्वय साधण्यासाठी पीवायसीचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, मानद सचिव दिपक गाडगीळ, सह सचिव सारंग लागू यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी अभिषेक ताम्हाणे, नंदन डोंगरे आदी उपस्थित होते. दिल्ली कॅपिटल्सच्या या सराव शिबिरामुळे पुण्यातील क्रिडा विश्वाची मान पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे उंचावली आहे.

# भारतीय संघ कोणताही सराव सामना खेळणार नाही; बीसीसीआयने का दिला नकार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील अखेरचा सामना १२ फेब्रुवारी रोजी संपल्यानंतर भारतीय संघ आता थेट २० तारखेला खेळताना दिसणार आहे. चॅम्पियन्स स्पर्धेसाठी कोणताही सराव सामना न खेळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एरवी बहुराष्ट्रीय स्पर्धा असली की एक-दोन सराव सामन्यांचे नियोजन केले जाते. येत्या १९ तारखेपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स स्पर्धेसाठीही १४ ते १७ फेब्रुवारी यादरम्यान काही सराव सामने आयोजित करण्यात आले आहेत, पण बीसीसाआयने सराव सामन्यांसाठी कोणताही रस दाखवलेला नाही.

इंग्लंडविरुद्धची मालिका नुकतीच संपलेली आहे आणि भारतीय संघ १५ तारखेला दुबईला दाखल होत आहे. त्यामुळे लगेचच सराव सामना खेळणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले.

यजमान पाकिस्तानने मात्र सराव सामने खेळण्यात आघाडी घेतली आहे. पाकिस्तान शहीन्स या नावाने त्यांनी संघ तयार केले आहेत. अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडही सराव सामने खेळणार आहे.

भारतासह इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियानेही सराव सामन्यांसाठी नकार दिला आहे. इंग्लंडचा संघ भारताविरुद्ध नुकताच खेळलेला आहे, तर ऑस्ट्रेलिया संघ श्रीलंकेत दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर तीन एकदिवसीय सामने खेळला आहे. चॅम्पियन्स स्पर्धेत भारत-पाक सामना २३ तारखेला नियोजित आहे. या सामन्यासाठी मोहम्मद हुरारिया पाक संघाचा कर्णधार असणार आहे. पाकचा संघ हा सामना बांगलादेशविरुद्ध दुबईत खेळणार आहे. पाकचा संघ मायदेशात तिरंगी एकदिवसीय मालिका खेळत आहे.

## योगेश व्हिक्टर्स, रिस्क्राईब, साची सुपरकिंग्ज् संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डीर तर्फे आयोजित 'लायन्स् प्रीमियर लीग' २०२४-२५ टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत योगेश व्हिक्टर्स, रिस्क्राईब आणि साची सुपरकिंग्ज् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी आगेकूच केली.

हिंजेवाडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर आणि सहकानगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूलच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सागर नाईक याने फटकावलेल्या ५५ धावांच्या जोरावर योगेश व्हिक्टर्सने एसके वॉरीयर्सचा १० धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळताना योगेश व्हिक्टर्सने १५६ धावांचे आव्हान उभे केले होते. याला उत्तर देताना एसके वॉरीयर्सचा डाव १४६ धावांवर मर्यादित राहीला. गौरव बाबर याची नाबाद ५४ धावांची खेळी आणि विपुल जेऊरकर याने केलेल्या ४७ धावा एसके संघाला विजय मिळवून देऊ शकल्या नाहीत. प्रशांत तेलंगे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे रिस्क्राईब संघाने रूद्र वॉरीयर्सचा ५ गडी राखून सहज पराभव केला. प्रशांत याने ३१ धावांमध्ये २ गडी बाद केले आणि फलंदाजीमध्ये नाबाद ४६ धावांची खेळी केली. रूद्र वॉरीयर्सने दिलेल्या १७५ धावांचे लक्ष्य रिस्क्राईब संघाने १९ षटकात व ५ गडी गमावून पूर्ण केले. प्रशांत याच्यासह राजेंद्र मदणे याने नाबाद ४४ धावांची खेळी करून संघाला विजयी केले.

# डॉ. मनीषा कोंढरे यांना विद्यापीठातर्फे उत्कृष्ट शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालिका पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. मनीषा कोंढरे यांना सन २०२४-२५ चा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे उत्कृष्ट शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालिका पुरस्कार (शहरी क्षेत्र) तसेच डॉ. वृषाली दंडवते यांना सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार (शहरी क्षेत्र) प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्कारांचे वितरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७६ व्या स्थापना दिन सोहळ्यात संपन्न झाले. मा. ना. श्री चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तांत्रिक शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख अतिथी होते आणि त्यांनी ऑनलाइन माध्यमातून शुभेच्छा दिल्या. तसेच, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बोरमणे, सहसचिव श्री सुरेश शिंदे या पुरस्कार वितरण सोहळ्याचा वेळी उपस्थित होते. एआयएसएसएमएस सोसायटीचे सचिव मालोजीराजे छत्रपती यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच खजिनदार श्री अजय पाटील, गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष श्री. विश्वास बाजीराव पाटील आणि व्यवस्थापकीय समिती चेअरमन श्री. भगवानराव बाबुराव साळुंखे यांनीही पारितोषिक विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

"या प्रतिष्ठेच्या कामगिरीचा सम्मान झाल्यामुळे एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगची शैक्षणिक, क्रीडा आणि एकूणच विद्यार्थी विकासातील उत्कृष्टतेसाठी अतूट बांधिलकी अधोरेखित होते.

## पृथ्वीराज आणि शिवराज पुन्हा एकाच मैदानात उतरणार

# जामनेर आंतरराष्ट्रीय कुस्तीयुद्धासाठी सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** जळगावच्या जामनेर तालुक्यात येत्या १६ फेब्रुवारीला आंतरराष्ट्रीय कुस्तीयुद्ध रंगणार आहे. देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ, उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड, शिवराज राक्षेसह भारतातील नामवंत पैलवान आंतरराष्ट्रीय पैलवानांशी भिडण्यासाठी सज्ज झाले आहेत. या दंगलसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऑलिम्पिक विजेता रवी कुमार दिया, ऑलिम्पियन नरसिंग यादव, कॉमनवेल्थ विजेता राहुल आवारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने रंगणाऱ्या कुस्तीत ५० महिला खेळाडूंच्या कुस्त्याही खेळविण्यात येणार आहेत.

ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री कोळी एस्टोनियाच्या युरोपियन चॅम्पियन मार्टा पाजूलाशी भिडेल. महाराष्ट्र केसरी अमृता पुजारीची गाठ रोमानियन ऑलिम्पियन कॅटालिना क्सेंटशी पडेल.

या स्पर्धेच्या निमित्ताने ९ देशांचे नामांकित मल्ल जामनेर गाठणार असून या महाकुंभाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ इराणच्या जलाल म्हजोयूबशी पंगा घेणार आहे तर उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड रोमानियाचा युरोपियन विजेता फ्लोरिन ट्रिपोनशी लढणार आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र केसरीत पराभवामुळे पेटून उठलेला शिवराज राक्षेही आपली ताकद दाखवण्यासाठी जामनेर गाठणार आहे. ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीसह अनेक महाराष्ट्र केसरी आणि उपमहाराष्ट्र केसरी आंतरराष्ट्रीय पैलवानांना धोबीपछाड देण्यासाठी मैदानात उतरण्यासाठी जोरदार तयारी करत आहेत. भारतासह फ्रान्स, मोल्दोवा, उझबेकिस्तान, रोमानिया, एस्टोनिया, इराण, ब्राझील आणि जॉर्जिया या देशांचे ऑलिंपियन, जागतिक विजेते, अर्जुन पुरस्कार विजेते, हिंद केसरी, रुस्तुम ए हिंद, भारत केसरी, महाराष्ट्र केसरी आणि उप-महाराष्ट्र केसरी असे नामांकित पैलवान सहभागी होणार आहेत.

#रा